मेहता मराठी ग्रंथजगत

जून, २०१९
पृष्ठे १३२ किंमत : रु.१५
वर्ष एकोणिसावे
अंक सहावा

कर्वेनगर येथे **मेहता पब्लिशिंग हाऊस** आणि **'घरटं – द फर्स्ट इनिंग्ज हाऊस'** यांच्या संयुक्त विद्यमाने वाचनकट्ट्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी उपस्थितांशी संवाद साधताना **प्रमुख वक्ते अनिरुद्ध पाठक.**

कर्वेनगर येथे आयोजित उन्हाळी शिबिरात बालक-पालक असा गप्पागोष्टींचा कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. **मेहता पब्लिशिंग हाऊस** आणि **'घरटं – द फर्स्ट इनिंग्ज हाऊस'** यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात बालगोपाळांशी गप्पागोष्टी करताना **बालसाहित्यिक राजीव तांबे**.

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जून २०१९ ◆ वर्ष एकोणिसावे ◆ अंक सहावा

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

संपादन साहाय्य
अंजली पटवर्धन

अंकाची किंमत १५ रु.
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस
मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

— अनुक्रमणिका —

संपादकीय	४
दिनविशेष	१०
उपक्रम	१८
संस्मरण	
भूमिकन्या	२२
पावसाआधीचा पाऊस	३४
नेताजी	४४
केतकरवहिनी	६२
संस्कार	८६
चौंडकं	१०८
अभिप्राय	
मयादा : इराकची कन्या	१२२
डिंभक	१२६

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

संपादकीय

संस्मरण काही साहित्यकृतींचे

ग्रंथनिर्मिती हे सदैव आनंद आणि नावीन्याचा प्रत्यय देणारं काम. हा आनंदानुभव आम्ही चार दशकांहून अधिक काळ घेत आहोत. आमच्या समृद्ध ग्रंथदालनाकडे बघताना आम्हाला अर्थातच अभिमान वाटतो. या ग्रंथसंपदेतून आमच्या मेहता मराठी ग्रंथजगत या मासिकासाठी मोजक्याच ग्रंथांची निवड करणं हे आमच्यासाठी आव्हानच असतं. तरीही या निवडीनंतर त्या त्या विवक्षित साहित्यकृतीचं-साहित्यिकाचं मोठेपण आम्हाला प्रभावित करतं आणि हे मोठेपण वाचकांपर्यंत पोचवण्याचा आमचा प्रयत्न असतो. या वेळेला आम्ही निवडलेल्या साहित्यकृती आहेत, 'भूमिकन्या', 'पावसाआधीचा पाऊस', 'नेताजी,' 'केतकरवहिनी', 'संस्कार', 'चौंडकं.' या सगळ्या साहित्यकृती हा स्वतंत्र समीक्षेचा विषय आहे आणि त्या त्या वेळेला त्यांची समीक्षा झालीही आहे; पण एक वाचक म्हणून या साहित्यकृतींचा पुन:प्रत्यय घेणं नक्कीच आनंददायी असतं.

आमच्या या ग्रंथर्मितीच्या प्रवासाची सुरुवात डॉ. आनंद यादव यांच्या 'माळावरची मैना'या कथासंग्रहाने झाली आणि आनंद यादव-मेहता पब्लिशिंग हाऊस हे एक अतूट समीकरण बनलं. या अतूट समीकरणातून डॉ. यादव यांची जी साहित्यसंपदा आकाराला आली त्यातील एक साहित्यकृती आहे 'भूमिकन्या.' ग्रामीण कथांचा हा संग्रह आहे. त्या कथासंग्रहातील 'लेक लगनाची' ही कथा या अंकात आम्ही समाविष्ट केली आहे. एका गरीब घरातील लग्नायोग्य मुलीला पाहुणे बघायला येतात, हा प्रसंग डॉ. यादव यांनी या कथेत जिवंत केला आहे. या प्रसंगातून ग्रामीण भागातील दारिद्र्य आणि तेथील समाजजीवनाचंही वास्तव दर्शन घडतं. ग्रामीण बोलीमुळे ही कथा मनाला भावते.

'पावसाआधीचा पाऊस' हा शान्ता शेळके यांचा 'कथासंग्रह.' यातील

'चोरबाजार' ही कथा या अंकासाठी निवडली आहे. चोरबाजाराचं वर्णन शान्ताबाईंनी त्यांच्या खास लालित्यपूर्ण शैलीत केलं आहे. या वर्णनातून त्या वाचकांना चोरबाजारात सहज फिरवून आणतात.

उमा कुलकर्णी हे मेहता पब्लिशिंग हाऊसशी दाट स्नेहाने जोडलं गेलेलं आणखी एक नाव. एस.एल.भैरप्पा, शिवराम कारंत इ. कन्नडमधील दिग्गज साहित्यिकांच्या साहित्यकृती मराठीत आणणाऱ्या उमाताईंची ओळख एक कुशल अनुवादक अशी आहे; पण 'केतकरवहिनी'सारखी स्वतंत्र कादंबरी लिहून, त्यांनी स्वतंत्र लेखनातही स्वत:ची ओळख निर्माण केली. 'केतकरवहिनी' ही कादंबरी केतकरवहिनी या कर्तृत्ववान आणि खंबीर स्त्रीची कहाणी आहे. स्वातंत्र्यानंतर बदललेले जमीनविषयक कायदे आणि त्यातून निर्माण झालेले खटले, यातून केतकरवहिनींच्या पतीचा खून झाला होता. जगण्यासाठी इतर मार्ग उरले नाहीत तेव्हा वहिनींनी या खटल्यांमध्ये लक्ष घातलं आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्या खटल्यांना तोंड देत मुलांच्या बाबतीतल्या सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. प्रथमपुरुषी निवेदनातून साकारलेली ही कादंबरी केतकरवहिनींच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू दर्शवते. त्यांची विशिष्ट प्रसंगांतील भावांदोलनं प्रथमपुरुषी निवेदनामुळे प्रभावीपणे अधोरेखित होतात.

यू. आर. अनंतमूर्ती यांची 'संस्कार' ही कादंबरी भाष्य करते ब्राह्मण्यावर आणि एकूणच धर्म या संकल्पनेवर. या कादंबरीचा अनुवाद केला आहे र. शां. लोकापूर आणि वि. ग. कानिटकर यांनी. नारणप्पा नावाचा एक ब्राह्मण आजाराने मरण पावतो. त्याला मूलबाळ नसतं. त्यामुळे त्याचे अंत्यसंस्कार कुणी करायचे, हा प्रश्न उभा राहतो. मद्यपान, शूद्र जातीतील स्त्रीशी अनैतिक संबंध या गोष्टींमुळे नारण्णपाचं ब्राह्मण्य शिल्लक राहिलं नाही, असं त्याच्या नातेवाइकांचं म्हणणं असल्यामुळे ते त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यास तयार नसतात. त्याच गावातील प्राणेशाचार्य हे वेदविद्यासंपन्न बुजुर्ग ब्राह्मण. एखाद्या मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार करणारं कुणी नसेल, तर ते ब्राह्मणाने करावेत, असं धर्मशास्त्रात सांगितलेलं असतानाही, नारणप्पाच्या एकूणच वाईट वर्तनामुळे प्राणेशाचार्यही त्याच्यावर अंत्यसंस्कार करणं धर्मबाह्य तर ठरणार नाही ना, या भीतीने ग्रस्त होतात. या एकाच घटनेतून जो मानसिक संघर्ष उभा राहतो, त्याचंच चित्रण या संपूर्ण कादंबरीत केलं आहे आणि ते मुळातून वाचण्यासारखं आहे.

'नेताजी' ही वि. स. वाळिंबे यांची बहुचर्चित कादंबरी. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या संपूर्ण जीवनाचं अगदी जवळून दर्शन घडविणारी ही कादंबरी आहे. या कादंबरीतून सुभाषबाबूंचं तेजस्वी व्यक्तिमत्त्व वाचकांना अनुभवता येतं. स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्यासाठी स्वत:चं जीवन पणाला लावलेले सुभाषबाबू याचं मनोज्ञ चित्रण या कादंबरीतून केलं गेलं आहे. स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतलेल्या अन्य नेत्यांच्या तुलनेत सुभाषबाबूंचं वेगळेपण ही कादंबरी वाचताना अधोरेखित होत राहतं. इतिहास आणि व्यक्तिचित्रण या दोन्ही दृष्टीने ही कादंबरी उल्लेखनीय आहे.

राजन गवस हे सामाजिक आशयाला भिडणारे साहित्यिक. 'चौंडकं' ही त्यांची कादंबरी देवदासींच्या जीवनावर प्रकाश टाकते. सुली या भल्या घरातल्या मुलीला केवळ अनिष्ट प्रथेमुळे देवदासी केलं जातं. देवदासी म्हणून जगताना तिच्या स्त्रीसुलभ भावनांचा कोंडमारा होतो. तिच्या कुटुंबालाही खूप काही भोगावं लागतं. सुलीचं आणि तिच्या कुटुंबाचं भोगणं वाचकांना अस्वस्थ करून टाकतं.

तर अशा नामवंत साहित्यिकांच्या साहित्यकृतींचं हे संस्मरण आम्हाला जीवनाची विविध रूपं दाखवून जातं. त्या त्या साहित्यिकाने आपल्या जीवनानुभवाला, नेताजींसारख्या व्यक्तित्वाला, ब्राह्मण्यावरून उठलेल्या गदारोळाला, केतकरवहिनींच्या संघर्षाला दिलेलं शब्दरूप आम्हाला खिळवून ठेवतं. जीवनाला भिडणारी दर्जेदार साहित्यकृती कधीच जुनी होत नसते, याचं पुनश्च भान देणारं हे संस्मरण आहे, हे निश्चित!

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

अधिक माहितीसाठी संपर्क

wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

मेहता पब्लिशिंग हाऊस

amazon

GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर-थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

www.amazon.in

play.google.com

eBooks

Online पुस्तके खरेदी करा

www.mehtapublishinghouse.com

१६ जून ते १५ जुलै २०१९
दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

१६ जून - जागतिक पितृदिन

'चिकन सूप फॉर द फादर्स सोल, भाग - १', 'चिकन सूप फॉर द फादर्स सोल, भाग - २', 'चिकन सूप फॉर द फादर ॲन्ड सन सोल, भाग - १', 'चिकन सूप फॉर द फादर ॲन्ड सन सोल, भाग - २', 'चीपर बाय दी डझन', 'वपु', 'वपु सांगे वडिलांची कीर्ती', 'पितृऋण' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १२००/- । सवलत किंमत ७४९/-
१६ जून ते १७ जून

---

१७ जून - ना. रा. वडनप यांचा जन्मदिन

'बुद्धिबळ शिका', 'बुद्धिबळाचा ओनामा', 'बुद्धिबळाचा श्रीगणेशा', 'चतुरंग (बुद्धिबळातील) सापळे', 'सुसंघटित मारा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ७९५/- । सवलत किंमत ४९९/-
१७ जून ते १८ जून

---

१७ जून - संत कबीर यांचा जन्मदिन

'भक्तीत भिजला कबीर', 'म्हणे कबीर दिवाणा', 'मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही!', 'साद घालतो कबीर', 'ऐका संतांनो', 'प्रेमरस... कबीरांचा!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १०२०/- । सवलत किंमत ६४९/-
१७ जून ते १८ जून

---

१९ जून - बेबी हालदार यांचा जन्मदिन
'आलो-आंधारि' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-
१९ जून ते २० जून

२० जून - रॉबर्ट क्रेस यांचा जन्मदिन
'द वॉचमन' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १७९/-
२० जून ते २१ जून

२० जून - डॉ. मीना शेटे-संभू यांचा जन्मदिन
'ची रनिंग', 'चिकन सूप फॉर द फादर ॲन्ड सन सोल, भाग - १', 'चिकन सूप फॉर द फादर ॲन्ड सन सोल, भाग - २', 'द मॅन इन द वुडन हॅट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ९६०/- । सवलत किंमत ५४९/-
२० जून ते २१ जून

२१ जून - स्वाती चांदोरकर यांचा जन्मदिन
'अनाहत', 'आणि विक्रमादित्य हरला!', 'सेलिब्रेशन', 'दहाव्या रांगेतून', 'एक पायरी वर', 'फॉरवर्ड अँड डिलिट', 'गोल गोल राणी', 'हिज डे', 'काळाकभिन्न', 'पवित्रम्', 'शेष', 'उत्खनन', 'वपु', 'युथनेशिया', 'मीरा एक वसंत आहे', 'मीरा श्यामरंगी रंगली', 'मीरेची मधुशाला', 'मीरेच्या प्रेमतीर्थावर', 'मृत्यायुषी', 'मृत्यूचं अमरत्व', 'नानक निरंकारी कवी', 'नानक परमात्म्याचा नाद ओम्कार', 'नानक संसारी संन्यस्त', 'नानक सूर संगीत एक धून' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ४१३०/- । सवलत किंमत २३४९/-
२१ जून ते २२ जून

२१ जून - जागतिक संगीत दिन
'मायकल जॅक्सन : एक जादू आणि बेधुंदी!', 'मंद्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १२६५/- । सवलत किंमत ७१९/-
२१ जून ते २३ जून

२१ जून - जागतिक योगा दिन
संच १ - 'आपण आपले ताणतणाव - एक चिंतन', 'आरोग्यासाठी योग', 'पाठदुखी घालविण्यासाठी योगसाधना', 'फिट फॉर ५०+ फॉर विमेन', 'ची रनिंग', 'ध्यानसूत्र', ''स' सुखाचा!', 'चिंता सोडा सुखाने जगा', 'पाणी : एक अद्‌भुत उपचारपद्धती', 'धन्वंतरी घरोघरी', 'चला जाणून घेऊ या! चालणे',

'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', 'HEALTHY HABITS FOR A FIT FAMILY' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २२७०/- । सवलत किंमत १३९९/-
संच २ - 'निरामय यशासाठी ध्यान', 'द माइंड जिम', '२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी', 'स्थूलतेला करा टाटा', 'स्वत:चा शोध', 'अर्थाच्या शोधात', 'मनावर विजय', 'एकच पेला शिवाम्बूचा', 'चला जाणून घेऊ या! तंदुरुस्ती', 'चला जाणून घेऊ या! आयुर्वेदाद्वारे आहार आणि आरोग्य', 'पीस, लव्ह ॲन्ड हीलिंग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १७९०/- । सवलत किंमत ११४९/-
संच ३ - 'चिंतामुक्त जीवन', 'कार्यमग्न, व्यस्त लोकांसाठी योगसाधना', 'सर्व वयोगटांसाठी योगसाधना आणि ध्यानधारणा', 'फिट फॉर ५०+ फॉर मेन', 'हसत-खेळत ध्यानधारणा', 'प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स', 'सुंदर मन', 'अन्नपुराण–आयुर्वेदिक, आधुनिक', 'लव्ह, मेडिसिन आणि मिरॅकल्स', 'चला जाणून घेऊ या! योगविद्या', 'सौंदर्य आणि तारुण्य टिकविण्यासाठी योगसाधना', 'THE ART OF AGEING' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १९४०/- । सवलत किंमत १२४९/-
२१ जून ते २३ जून

---

२२ जून - डॅन ब्राऊन यांचा जन्मदिन
'एन्जल्स ॲण्ड डेमन्स', 'डिसेप्शन पॉईंट', 'डिजिटल फॉर्ट्रेस', 'द दा विंची कोड', 'द लॉस्ट सिम्बॉल', 'इन्फर्नो' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २९१०/- । सवलत किंमत १७४९/-
२२ जून ते २३ जून

---

२२ जून - महादेव मोरे यांचा जन्मदिन
'चेहऱ्यामागचे चेहरे', 'चिताक', 'एकोणिसावी जात', 'माणसं – अशीही', 'मत्तीर', 'झोंबडं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १२४५/- । सवलत किंमत ७४९/-
२२ जून ते २३ जून

---

२५ जून - सुधा रिसबूड यांचा जन्मदिन
'अंतरिक्षाचा वेध', 'गार्डिअन', 'कल्पित-अकल्पित', 'रिचर्ड फाईनमन : एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ७८०/- । सवलत किंमत ४९९/-
२५ जून ते २६ जून

२५ जून - शशी पाटील यांचा जन्मदिन
एकच पेला शिवाम्बूचा' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-
२५ जून ते २६ जून

२६ जून - छत्रपती शाहू महाराज जयंती
'छत्रपती राजर्षी शाहू महाराज', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे', 'राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे', 'राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे', 'राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ९८०/- । सवलत किंमत ६४९/-
२६ जून ते २८ जून

२६ जून - पर्ल बक यांचा जन्मदिन
'काळी' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १४९/-
२६ जून ते २७ जून

२७ जून - राम प्रधान यांचा जन्मदिन
'पहिली फेरी?(१९६५ भारत-पाक युद्ध)', 'वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध', 'माझी वाटचाल : मेटकॉफ हाउस ते राजभवन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १०४५/- । सवलत किंमत ६४९/-
२७ जून ते २८ जून

२७ जून - ई. आर. ब्रेथवेट यांचा जन्मदिन
'टू सर, विथ लव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-
२७ जून ते २८ जून

२८ जून - पूर्णिमा कुंडेटकर यांचा जन्मदिन

'चाय, चाय', 'लव्हिंग नॅटली', 'पीस, लव्ह ॲन्ड हीलिंग', 'द डान्स ऑफ अँगर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ९५०/- । सवलत किंमत ५९९/-
२८ जून ते २९ जून

३० जून - दिनकर जोषी यांचा जन्मदिन
'अ-मृत पंथाचा यात्री', 'अंकरहित शून्याची बेरीज', 'अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम', 'कालपुरुष', 'महाभारतातील मातृवंदना', 'महाभारतातीलपितृवंदना', 'महामानव सरदार पटेल', 'रामायणातील पात्रवंदना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १५२०/- । सवलत किंमत ९४९/-
३० जून ते १जुलै

३० जून - करण बजाज यांचा जन्मदिन
'कीप ऑफ द ग्रास' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-
३० जून ते १जुलै

१ जुलै - जागतिक विनोद दिन
'कसं बोललात! भाग १ ते ७', 'हसाल तर वाचाल', 'फुकट', 'खुमासदार अत्रे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
मूळ किंमत १०३५/- । सवलत किंमत ५९९/-
१ जुलै ते २ जुलै

१ जुलै - मीना कर्णिक यांचा जन्मदिन
'अरुणाची गोष्ट' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-
१ जुलै ते २ जुलै

२ जुलै - जागतिक UFO दिन
'पृथ्वीवर माणूस उपराच!', 'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!', 'अंतराळवीर सुनीता विल्यम्स', 'स्वप्नाकडून सत्याकडे...(कल्पना चावलाची कहाणी)' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत २९९/-
२ जुलै ते ३ जुलै

४ जुलै - योगिनी वेंगुर्लेकर यांचा जन्मदिन
'शत्रूशी दोन हात' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २४९/-
४ जुलै ते ५ जुलै

४ जुलै - जीन सॅसन यांचा जन्मदिन
'ग्रोईंग अप बिन लादेन', 'मयादा - इराकची कन्या', 'युवराज्ञी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८७०/- । सवलत किंमत ४९९/-
४ जुलै ते ५ जुलै

६ जुलै - रेखा बैजल यांचा जन्मदिन
'अज्ञेय', 'प्रस्थान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १६९/-
६ जुलै ते ७ जुलै

११ जुलै - रिमल चंगेडे यांचा जन्मदिन
'आजचा मेनू' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १०९/-
११ जुलै ते १२ जुलै

११ जुलै - झुंपा लाहिरी यांचा जन्मदिन
'द नेमसेक' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २७०/- । सवलत किंमत १४९/-
११ जुलै ते १२ जुलै

११ जुलै - जेन गार्डम यांचा जन्मदिन
'द मॅन इन द वुडन हॅट' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १७९/-
११ जुलै ते १२ जुलै

१२ जुलै - जागतिक मलाला दिन
'मी मलाला' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १४९/-
१२ जुलै ते १३ जुलै

१३ जुलै - माधुरी शानभाग यांचा जन्मदिन
'ॲज आय सी... भारतीय पोलीस सेवा...', 'ॲज आय सी... नेतृत्व आणि

प्रशासन', 'ॲज आय सी... स्त्रियांचे सक्षमीकरण...', 'जेआरडी : एक चतुरस्त्र माणूस', 'स्वप्नाकडून सत्याकडे... (कल्पना चावलाची कहाणी)', 'कीप ऑफ द ग्रास', 'स्मार्ट लीडरशिप', 'द जॉय ऑफ कॅन्सर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १३००/- । सवलत किंमत ७४९/-

१३ जुलै ते १४ जुलै

१३ जुलै - बाजीप्रभू बलिदान दिन

'पावनखिंड', 'श्रीमानयोगी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ६९०/- । सवलत किंमत ४४९/-

१३ जुलै ते १४ जुलै

१४ जुलै - सुषमा शाळिग्राम यांचा जन्मदिन

'अतरापी', 'महाभारतातील मातृवंदना', 'महाभारतातीलपितृवंदना', 'महामानव सरदार पटेल', 'अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम', 'कालपुरुष', 'तिमिरपंथी', 'चला जाणून घेऊ या!गुडघेदुखी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १५००/- । सवलत किंमत ९४९/-

१४ जुलै ते १५ जुलै

१४ जुलै - मुग्धा गोखले यांचा जन्मदिन

'चला जाणून घेऊ या!अस्थमा', 'चला जाणून घेऊ या!उच्च रक्तदाब', 'चला जाणून घेऊ या!बद्धकोष्ठता', 'मिरॅक्युलस इफेक्ट्स ऑफ ॲक्युप्रेशर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ४७५/- । सवलत किंमत २४९/-

१४ जुलै ते १५ जुलै

१५ जुलै - अनंतराव खरात यांचा जन्मदिन

'शर्यती-स्पर्धा-खेळ' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-

१५ जुलै ते १६ जुलै

आमचे लेखक-अनुवादक यांच्या जन्मदिनानिमित्त तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.
(किमतींमध्ये बदलाची शक्यता.)

२री आवृत्ती

नाइट

एली वायझल

अनुवाद

आशा कर्दळे

किंमत : १७०/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या नाझी भस्मासुराने लक्षावधी ज्यूंचा क्रूर नरमेध केला. त्या क्रौर्याच्या कहाण्या आजही काळीज फाडून टाकतात. हिटलरच्या छळछावण्यांमध्ये आणि तुरुंगांमध्ये ज्या ज्यूंनी अमानुष छळ सोसला आणि त्या मृत्यूच्या सापळ्यांमधूनही वाचून जे जिवंत राहिले, त्यांचे अनुभव म्हणजे वाहती जखम आहे. अशीच एक भळभळती जखम म्हणजे 'नाइट' हे पुस्तक. डॉ. एली वायझेल यांना वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी ऑशवित्झ आणि बुशेनवाल्ड इथल्या नाझींच्या तुरुंगात नेण्यात आले. त्यांचे आई-वडील, लहान बहीण - सर्वांनाच जर्मनांनी पकडून नेले. त्या तुरुंगामधल्या यमयातनांमधून फक्त डॉ. एली वायझेल वाचले. आपल्या प्राणप्रिय आई-वडील-बहीण यांचे मृत्यू त्यांना कोवळ्या वयात सोसावे लागले. हा सगळा विदारक अनुभव त्यांनी या पुस्तकात कमालीच्या प्रत्ययकारी भाषेत मांडला आहे. हे पुस्तक म्हणजे सखोल जीवनचिंतन आहे. स्वतःच्या दुःखाच्या वर्णनाबरोबर मानवी स्वभावावरील त्यांचे भाष्य अत्यंत अर्थघन आहे. पुस्तकाच्या पानापानांमध्ये त्या काळरात्रींचा जिवंत अनुभव ठासून भरला आहे.

उपक्रम

कर्वेनगर येथे रंगला वाचनकट्टा

पुणे : कर्वेनगर येथे नुकतेच मेहता पब्लिशिंग हाऊस आणि 'घरटं – द फर्स्ट इनिंग्ज हाऊस' यांच्या संयुक्त विद्यमाने वाचनकट्ट्याचे आयोजन करण्यात आले होते. 'वाचाल तर वाचाल' म्हणजेच तुम्ही वाचन केले तर तुम्हाला विविध गोष्टी कळतात आणि वैचारिक वृद्धी होते. त्यामुळे वाचन हे अतिशय आरोग्यदायी असते,' हा संदेश या वाचनकट्ट्याच्या सुरुवातीला देण्यात आला.

त्यानंतर 'घरटं' या डे केअरच्या बालगोपालांनी स्वागत गीत गायले. त्यानंतर डेक्कन कॉलेजचा विद्यार्थी अमोघ वैद्य याने 'मोंटुकले दिवस' या गोष्टीचे अभिवाचन केले. या अभिवाचनानंतर उपस्थितांपैकी काही जणांनी त्यांना आवडलेल्या पुस्तकाबद्दल मनोगत व्यक्त केले. त्यानंतर या कार्यक्रमातील प्रमुख वक्ते अनिरुद्ध पाठक यांनी उपस्थित वाचकांशी संवाद साधला. लहान मुलांना वाचनाची गोडी कशा प्रकारे लावावी, तसेच आपल्या जीवनात पुस्तक किती महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, याबद्दल बोलताना ते

म्हणाले, 'मोबाईल हे आपल्या सर्वांना मिळालेलं शस्त्र आहे आणि या शस्त्राचा वापर कसा करायचा हे आपल्या हातात असतं. त्यामुळे वाचन करत असतानाही आपण केलेलं वाचन आपणास कशा प्रकारे उपयोगी पडेल हा विचार करावा. अनुभव सांगावे. विशेषत: लहान मुलांना सवय लावताना प्रथम आपण त्या सवयीचे अनुकरण करावं.'

उपस्थित वाचकांनी या कार्यक्रमात वाचनाबद्दल आपले अनुभव सांगितले. या कार्यक्रमाची सांगता शंकर पाटील यांच्या 'धिंड' या कथेच्या अभिवाचनाने करण्यात आली. दारूबंदी असतानाही दारू प्यायलेल्या एका माणसाची गावात काढलेली धिंड, या विषयावर आधारित ही कथा अतिशय गमतीदार आहे. त्यामुळे या कार्यक्रमात रंगत आली.

उन्हाळी शिबिरात बालक-पालक गप्पागोष्टी

पुणे : कर्वेनगर येथे आयोजित उन्हाळी शिबिरात बालक-पालक असा गप्पागोष्टींचा कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. 'लहान मुलांसह वावरताना लहान होऊन वागलात तर मुलांना सहज जिंकता येतं,' हा संदेश या कार्यक्रमातून दिला गेला. मेहता पब्लिशिंग हाऊस आणि 'घरटं – द फर्स्ट इनिंग्ज हाऊस' यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अगदी शिशुवर्गातील बालगोपाळांपासून चौथी पाचवापर्यंतचे विद्यार्थी या कार्यशाळेस उपस्थित होते. या कार्यशाळेत बालसाहित्यिक राजीव तांबे यांनी बाळगोपाळांशी मनमुराद गप्पा मारत पालकांनाही संगोपनाचे धडे दिले. लहान लहान खेळांमधून मुलांचे मनोरंजन करत खेळाविषयीची त्यांची आवड कशी वाढवायची यावर त्यांनी भर दिला. अक्षरांपासून शब्द आणि शब्दांपासून वाक्यं कशी सहज बनवता येतात, हे पालकांना समजवत त्यांनी मुलांनाही त्यात सहभागी करून घेतले. मुलांची कल्पनाशक्ती वाढविण्यासाठी त्यांना मोकळे सोडा, प्रयत्न करू द्या. मुले चुकली तर रागावू नका. इंग्रजी भाषेप्रमाणेच मराठी भाषेतील पुस्तकेही मुलांना वाचायला द्या. मातृभाषादेखील शुद्ध होण्याकडे लक्ष द्यावे, असे तांबे यांनी सांगितले. मुलांना एखाद्या गोष्टीची सवय ही जबरदस्ती करून नाही, तर त्यात तुमचा

सहभाग असल्यास सहज लागेल. गणितासारखा विषय सहज, सोप्या पद्धतीने कसा मांडता येईल, हे त्यांनी एका खेळाद्वारे दाखवून दिले.

मुलांची मानसिक वाढहोण्याकरता प्रोत्साहन अतिशय आवश्यक असते; कारण त्याच प्रेरणेतून प्रयत्नांना यश येते, ही गोष्ट पालकांना या कार्यक्रमातून समजली. त्यामुळे मुलांप्रमाणेच पालकांनीही प्रश्न विचारत, प्रश्नांना उत्तरे देत या बालक-पालक कार्यक्रमात उत्साही सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाला पालकांची लक्षणीय उपस्थिती होती. मुलांच्या संगोपनाबाबत त्यांच्या वाढत चाललेल्या जागरूकतेचे दर्शन, या कार्यक्रमातून घडले.

मुलांनी अनुभवली 'गोष्टींची गंमत आणि चित्रांची संगत'

पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस आणि जस्ट बुक्स लायब्ररी, कोथरूड यांच्या संयुक्त विद्यमाने, नुकतंच लहान मुलांसाठी कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. मयूर कॉलनी येथील जस्ट बुक्स लायब्ररी येथे पार पडलेल्या या कार्यशाळेत लहान मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. श्रद्धा नातू-कुंटे यांनी या मुलांना 'एका खट्याळ राक्षसाची गोष्ट' सांगितली. या गोष्टीतला राक्षस, राक्षसाच्या खोड्या, हनुमान आणि मुलं या सर्वांची गंमत ऐकण्यात मुलं चांगलीच रमली होती. 'राक्षस आपला दोस्त आहे. तो

कधीच आपल्याला त्रास देत नाही,' अशी भावना ही गोष्ट ऐकल्यानंतर मुलांनी व्यक्त केली.

उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये लहान मुलं विविध शिबिरांत सहभागी होतात. मुलांचं वाचन वाढावं, त्याचबरोबर चित्रकलेसारख्या कलेकडे त्यांनी आकर्षित व्हावं, याकरिता या कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यशाळेत शिक्षिका गौरी इंदलकर यांनी मुलांना सुरवंट आणि फुलपाखराच्या जन्माची गोष्ट सांगितली. या गोष्टीनंतर मुलांना या गोष्टीमधील राक्षस आणि सुरवंट अशी दोन चित्रं काढण्यास सांगितली. मुलांनी आपली कल्पकता आपल्या चित्रात दाखवली. यानंतर ज्यांची चित्रं उत्तम होती, अशा मुलांना मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'फ्रँकलिन' या मालिकेतील पुस्तके भेट म्हणून देण्यात आली.

या कार्यशाळेत उपस्थित पालकांनीही पाल्यांसह गोष्टी ऐकण्याचा आनंद घेतला.

◆

संस्मरण

भूमिकन्या



डॉ. आनंद यादव

ह्या कथा जनसामान्य स्तरातील स्त्रीचे सर्वांगीण दर्शन घडविणाऱ्या, वास्तवाचे प्रखर भान असलेल्या, आशयसमृद्ध आणि कलासंपन्न स्वरूपाच्या आहेत. भूमिकन्यांचे शोषण त्यांच्या जन्मापासूनच सुरू असते. 'मुलगी जन्मल्याचे' दुःख घरादाराला मनोमन होते. तेव्हापासूनच मुलीच्या आयुष्याची काळजी तिच्या आईला विशेष घेरते. अपुऱ्या जीवन-सुविधांच्या कुटुंबात तर बालिका, कुमारी, युवती, गृहिणी, वृद्धा या सर्वांनाच अपुरेपणाची, अभावग्रस्ततेची आणि त्यामुळे होणाऱ्या मानसिक व शारीरिक उपासमारीची झळ सतत आणि जास्तीत जास्त सोसावी लागते.

स्त्रीजीवनातील नाट्य, कारुण्य, संघर्ष, काव्य, अन्याय, उपेक्षा, छळ, वेदना, दुःखे, शोषण इत्यादी विविध पैलूंवर या कथा चैतन्याचा प्रकाश टाकतात. संवेदना-समृद्ध प्रतिमा, भेदक संवाद, भाषेची अनेकविध भावरूपे, निवेदनाची विविध अंगे, मार्मिक आणि अर्थपूर्ण शब्दयोजन इत्यादींचे योजन मांडणीत जागोजागी प्रत्ययाला येते. यांच्यामुळे कथेची अभिव्यक्ती कलासंपन्न होते. जीवनमूल्ये आणि वाङ्मयीन कलामूल्ये यांचा उत्कृष्ट मेळ घालणाऱ्या या कथा म्हणूनच वाचकमनावर खोलवर परिणाम करतात. स्त्रीवेदनेचा वेद ठरावा, अशा योग्यतेच्या या कथा खूप काही सांगून, सुचवून जातात.

('भूमिकन्या' पुस्तकातून)

लेक लगनाची

आई कुठनं बाहीरनं लगालगा आली. तिच्या हातात तीन-चार मोठ्या पुड्या हुत्या.

''दिन्याऽ''

''हंऽ!''

''घुमू नको. चाटकन मळ्याकडं पळत जा आणि गौरीला बलवून घेऊन ये.''

''कशाला?''

''घाटलास का आडमोडा? इस्तू पडला तुझ्या तोंडात. ऊठ आगूदर नि पळ. आताच्या आता ये म्हटलंय म्हणावं. त्यांस्नीबी घटकाभरानं या म्हणावं. गौराला पाव्हणं बघाय येणार हाईत, म्हणून सांग. न्हईतर हूंऽऽऽ म्हणून कण्या हादडून बाजल्यावर पडतील मुडद्यागत घोरत.''

दिन्या पळाला.

अशा वक्ताला चाटकन पळालं तर बरं, न्हाईतर पाठीत धपाटं बसत्यात. आईच्या डोस्क्यात काय तरी इचार येऊन बसला म्हंजे ती अशी वागती. त्यापर्माणं समदं हुईस्तवर तिचं असं वागणं असतं. एकदा ते झालं की मग तिचं बोलणं सलाम पडतं.

चुलीम्होरं बसून तिनं पुड्या सोडल्या. वंजळ भरंल एवढा साखऱ्या आणला हुता. मूठभरून च्याची पूड. हळद, बडीशेप, धडप्याच्या गठड्यात फवं. फुड्यांतलं चुलीमागच्या बारक्या बारक्या डब्यांत भरता भरता तिनं मला हाक मारली.

''भैऱ्याऽऽ''

''ओऽऽ''

''तुझी झाली का न्हाई हजामत अजून?'' मी हजामत करून आलो हुतो. खरं हजामतीचं निमित्त काढून घराकडं आलो हुतो, ते तिला खपलं न्हवतं.

मी मऊ आवाजात म्हणालो, ''झाली की. मी आता चाललोच मळ्याकडं.''

''आता जाऊ नको मळ्याकडं. तासभर घरात ऱ्हा. पाव्हणं येणार हाईत. घरात कोण तरी बापय-माणूस असू दे.''

मला तेवढंच बरं वाटलं. सफा झालेल्या डुईवरनं हात फिरवत मी चौकटीला टेकून बसलो.

''बसू नको. पिशवी घेऊन जगदाळ्याच्या मावशीकडं जा. तिला चार-पाच कप-बशा दे म्हणावं.''

'हूं' म्हणून मी उठलो.

''थांब. घाई करू नकोस. तिला म्हणावं, तासाभरात परत करती. कपबशीला जरासुदीक धक्का लागू देत न्हाई. पाव्हणं येणार हाईत, तवा घटकाभर द्याच.''

''बरं.'' मी उठलो नि पिशवी गुंडाळून घेत बाहीर पडलो. बाहीर पडतापडता आतनं आवाज आला, ''तिचा दाल्ला असंल तर आत जाऊन माग रं. तिचा दाल्ला उगंच ख्यास मारतोय तिच्यावर.''

''बरं बरं.''

कपबशा जाऊन आणूस्तवर तिनं कंबळाकीच्या घरातली चांगली चांगली चार-पाच लुगडी आणली हुती. पेटीतलं आपल्या लग्नातलं ठेवणीचं लुगडं काढलं हुतं. त्या समद्यांच्या घड्या अडदाणीवर एकाला एक लावून दिसतील अशा ठेवल्या हुत्या.

आलेल्या कपबशा अबदार हातानं अंधारातल्या दिवळीत एकावर एक पालथ्या घातल्या नि कप आतल्या बाजूला मांडून ठेवलं.

कांबरायची घोंगडी उजेडात नेऊन बघितली तर जुनीपानी झालेली. तिच्या दशा तुटलेल्या. मधी मधी भसकं पडत चाललेलं...तिच्या कपाळावर अट्या पडल्या.

सणगर गल्लीला जाऊन दत्तू सणगरांकडनं तिनं दोन घोंगडी मागून आणायला सांगितलं. मी तसाच गेलो. दत्तूमाला सांगितलं. आदूगर त्यो द्यायलाच तयार हुईना. पाव्हणं गौरीला बघाय येणार हाईत म्हणून सांगितल्यावर त्येच्या बायकूनंच दोन घोंगडी काढून दिली.

''घाण करशील बघ.''

''छे छे! जशीच्या तशी आणून देतो. घटकाभर हातरायची नुसती. पाव्हणं गेलं की लगीच परत करतो.''

कशीबशी घेऊन आलो. गंगी रडत हुती. ती हुंबऱ्यावर बसली

हुती. म्हणून तिच्या पाठीत दणका बसला हुता.

''आणलास?''

''आणली.''

''हातरा ती सोप्यात. पाव्हणं येतील इतक्यात.''

मी ती हातरायला गंगीला बलवून घेतलं नि एकाला एक लावून सोप्यात पसरून टाकली.

''सोपा लोटला काय?'' बाहीर येता येता ती म्हणाली. तिची घाई चालली हुती नि घाईत आवाज चढत हुता.

''न्हाई?- न्हाईतर मग गल्लीतला आणि जरा कचरा आणून सोप्यात उकीरडा करा आणि त्येच्यावर घोंगडी हातरा.''

तिचं असलं बोलणं मला कळत हुतं. गापदिशी मी दोन्ही घोंगडी गोळा केली नि तावातावानं गंगीला म्हणालो,

''गंगे, सोपा लोटून घे.''

ढेंगेतनं परकूर वडून घेऊन तिनं बेंबटाबुडी खवलं नि आतला साळुता आणला. फुरूक फुरूक शेंबूड वडत सोपा लोटला. मी पुन्ना घोंगडी हातरली. जरा बरं दिसलं. घोंगड्यावर जाऊन बसावं असं वाटलं. भिंताडाला टेकून असा बसतोय तवर शेजारच्या राधामावशीच्या घरातनं आई आलीबी.

तिच्या पदराबुडी काय तरी हुतं ती ते आतच घेऊन गेली.

''भैऱ्या, हिकडं ये.'' तिची चुलीम्होरनं हाक आली. मी गेलो.

''हे पैसे घे नि पानं, सुपारी, नि कात आण. पळत जा नि पळत ये. वकोत हुईत चाललाय.''

मी बाजारात जाऊन समदं आणलं.

परत येऊन बघतोय तर आईनं पेटीतली समदी भांडी काढून देवावरच्या फळीवर वळीनं मांडून ठेवलेली. खोली भरल्यागत दिसाय लागली हुती.

दगडी उंबऱ्यावर जाऊन मी वरुट्यानं दोन्ही सुपाऱ्या फोडल्या. तवर आईनं आत किमया केली. तिनं राधामावशीच्या हितनं पानपुड्याचा पितळी डबा आणला हुता. त्यात पान, कात, बडीशेप ठेवली हुती. मी जाऊन सुपारी त्यात ठेवली. चुना आईनं त्यातनंच आणला हुता. बाकीचा डबा राधामावशीनं मोकळा करून दिला हुता.

डबा तिनं घोंगड्यावर आणून मधी ठेवला. मागं सरली नि मधल्या चौकटीला

धरून हुबी ऱ्हायली. डब्याकडं बघाय लागली. तवर भित्तीकडंला बसलेली गंगी त्या डब्याजवळ जाऊन त्येच्यावरनं अबदार बोटं फिरवाय लागली.

''हात लावू नको गं, गंगे. लोकांचा डबा हाय. उगंच घाण करू नगं.''

गंगी भित्तीकडंला जाऊन गुडघं पोटाजवळ घेऊन बसली. पाव्हण्यागत चकचकीत डबा घोंगड्याच्या मधी ठुमकत बसला...राधामावशीचा दाल्ला कायम ह्यातनं पान खातोय. तालेवार हाय. घरात पोत्याची घडुशी. दुधाची चार म्हसरं. पाच-सा बैलांचा घरचा मळा...आम्ही रोजगारी. आवंदाच चौथाई भागानं भटाचा मळा केलाय. त्योबी एवढा एवढासा. सालभर राबायचं नि भट काय देईल ते घेऊन यायचं...सालभर हक्काचा रोजगार मिळत हुता. लोकाच्या हितं राबायचं ते मळ्यात राबायचं. समद्या घरादाराला करंल तेवढं काम मिळत हुतं.

''गंगे, हिकडं ये.'' आईनं तिला सोप्यात हाक मारली. झिंज्या मागं सारंत गंगी जरा भेदरूनच आईकडं गेली. आई काय करणार त्येचा अंदाजच तिला लागत नव्हता. आई आपली केसं विचरत हुती. केसातनं फणी खसाखसा बटा चिरत फेरतेली... आई आपली डुई इचराय अशी कवा बसलीच नव्हती. आज ती तशी बसलेली बघून जरा गंमतच वाटली. मलाबी जरा आपलं तोंड, हात-पाय धुऊन घ्यावं, असं वाटलं. मी उठलो नि परड्यात गेलो.

गंगी आईच्या फुड्यात झिंज्या सोडून बसली हुती. आईनं आपला बुचडा आवळून बांधला हुता. केसं डुईसंग चापून बसली हुती.तिनं गंगीच्या डुईवर तेल थापलं नि तिच्या केसांत फणी घुसविली.

हात-पाय पुसत पुसत मी बाहीरच्या सोप्यात गेलो. दारात येऊन गल्लीच्या टोकाकडं सजावारी नजर टाकली. तर साताठ माणसं नि त्येंच्याबरोबर एक बाई येतेली दिसली. चटाकदिशी आत आलो नि आईला सांगितलं,

''आई, माणसं आली वाटतं.''

''आली काय!''

तिनं चटाचटा गंगीच्या कवा न्हाई ते दोन येण्या दोन्ही बाजूला घातल्या. जवळच्या घोंगड्याच्या दोन दशा तोडून त्या बांधून टाकल्या.

''तोंड खळबळून मग बाहीर जा, गं गंगे.''

''हं!''

''घुमत जाऊ नको. सरळ बोलत जा. 'बरं' म्हणत जा. पै-पाव्हणं येत्यात.'' आईनं असं बोलता बोलता आपलं तोंड खळबळून घेतलं नि ठळक कुक्कू लावून ती चटक्यानं बाहीर आली.

माणसं दारात ठेपली.

''आलासा? या.''

दाराच्या आतल्या बाजूला झराझरा धुळीत माखलेल्या पायताणांचा ढीग पडला. पानाच्या डब्याच्या भोवतीनं पाव्हणं बसलं. दोन-तीन पाव्हण्यांनी जरीचं नि कोशे पटकं घातलं हुतं. मिशा कापलेल्या एकाजणानं सैल घळगा कोट घातला हुता. नक्कीच कुणाचा तरी मागून आणलेला असणार.

आईनं त्यातल्या पाव्हणीबाईला नि मला आत हाक मारली. पाव्हणीबाई मधल्या सोप्यात भिंतीला टेकून आपलं गठळं फुड्यात घेऊन बसली. तिच्यासमोर आमची अडदाणी. अडदाणीवर लुगड्याच्या घड्या, सोप्यातनं स्वयंपाक-घरात बघितलं की देवाऱ्याचं कपाट दिसतेलं. कपाटावर फळी. फळीवर पितळंची भांडी वळीनं फळीभरून मांडलेली. पाव्हणीचं मन घर बघून थंडगार हुणारं असं वाटलं. हे सगळं दिसंल अशा बेतानंच आईनं तिला बसवलं हुतं.

''पाण्याची बारडी, तांब्या न्हे जा रं.''

मी आत जाऊन एक घागर बारडीत वतली नि तांब्या-बारडी घेऊन बाहीर आलो. पाव्हण्यांनी हात-पाय धुतलं. दारातला दांडगा दगूड भिजला. उन्हाळा हुता. तापला हुता. धडप्यानं पाव्हण्यांनी हात-पाय पुसून घेतलं नि पानाचा डबा उघडला. मला बरं वाटलं.

मी आत गेलो. आई परड्याकडं गेली हुती. तिकडं जाऊन तिला हरखून सांगिटलं, ''आई, पाव्हण्यांनी पानाचा डबा उघडला.''

''बरं झालं. तू पाव्हण्यांत जाऊन बोलत बस.''

तिनं असं सांगितल्यावर मला अवघडल्यासारखं झालं. तिचं डोळं मळ्याच्या वाटंवरनं हलत नव्हतं. मी तिकडं बघितलं, तर गौरी नि दिना चढसपवून माळ उतरताना दिसली.

''आली वाटतं.'' मी तिथंच थांबून बोललो.

''आली- तू जाऊन बस जा बघू घटकाभर. काय तरी बोलत बस,

तवर गौरी येऊन पोचंल.''

''बरं.'' ...मी 'हूं' म्हणून घुमलो न्हाई.

मी पाव्हण्यांत जाऊन बसलो. काय बोलायलाच येईना. गप बसलो. पाव्हण्यांनी पानांचं देठ खुडायला, मांडीवर पानं पुसायला सुरुवात केली हुती. एकजण गुळगुळीत दाढी नि हजामत केलेला हुता. सैल कोटवाला. त्योच गौरीला बघायला आला असावा. मी त्येच्याकडं अधनंमधनं उगचच बोलत बसलो. पान खाल्लेल्या त्येच्या दातावर पानांचं तांबडं किटान मावंना झालं हुतं. डोळं बैलाच्या डोळ्यांगत मोठं. तांबारलेलं. गळ्यात चांदीचं चार-पाच शिवाजी काळ्या दोऱ्यात गाठवून बांधलेलं.

घटकाभर बसलो. माझ्यासंगं कुणी बोलंचना नि मलाबी काय कुणासंगं बोलायला येईना. उठलो नि कायतरी निमित्त काढून परड्यात गेलो.

परड्यात गौरी आली हुती. तिनं भांड्यांच्या बुट्टीवर ठेवलेला जळणाचा बिंडा गोठ्यात एका बाजूला टाकलेला दिसला. चपल्या दारातच पायरीकडंला सरकून लावल्या हुत्या.

तेवढ्या खुणंवर मी जेवणाच्या घरात गेलो. गौरी जरा बाजूला बसून डोसकं इचरत हुती. तिचं डोसकं तेलानं चपचपीत झालेलं दिसत हुतं.

आई जर्मनचं भुगुणं चुलीवर ठेवून फोडणी देत हुती. तळणाऱ्या कांद्याचा वास नाकात घुसत हुता. भिजलेलं फवं ताटात पसरलं हुतं. माझ्या तोंडाला उगचच पाणी सुटत गेलं. कवा न हुणारा पर्कार आज चुलीवर चढत हुता.

गौरीनं परड्याकडं जाऊन हात-पाय, तोंड धुतलं. त्येच्यावरनं तेलाचा हात फिरवला. ते तुकतुकीत दिसू लागलं. परड्याकडंच जाऊन तिनं भित्तीतल्या भिंगात बघून कपाळाला मेण-कुक्कू लावलं. पाव्हणीच्या देखत अडदाणीवरचं लुगडं आणून तिला आईनं नेसायला दिलं.

''आरं, आतच कशाला बसतोस? जा की बाहीर.''आईनं मला आठवण करून दिली.

मी अवघडल्या पायांनी पाव्हण्यांत जाऊन पुन्ना बसलो. सगळं पाव्हणं पाठीचं कणं ताठ करून बसलं हुतं. पानं अर्धीनिम्मी उडाली हुती. चुन्याची बोटं घोंगड्याला पुसली हुती...आता दत्तू सणगर नि त्येची बायकू बोंबलणार.

कुणाचा ऊस कसा हाय, कुणाचा मळा कसा हाय, ह्येच्यावर

४थी आवृत्ती

सागरतीरी

ध्रुव भट्ट

अनुवाद

अंजनी नरवणे



किंमत : १६०/-रु.

पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

रात्री त्या शेतकऱ्याच्या कुटुंबात मी राहिलो. खुल्या आकाशाखाली काथ्याच्या खाटेवर पडल्या पडल्या मी विचार करत होतो. दोन-तीन दिवसांपूर्वी तर मी माझ्या परिचित वातावरणात माझ्या आप्तेष्टांबरोबर होतो. आज या अगदी नवख्या जागेची ओळख झाली. एका संध्याकाळच्या या ओळखीत असं काही अनुभवलं जे माझ्या आयुष्याचा न विसरणारा भाग बनून गेलं. छोटी जानकी माझी जणू खूप वर्षांच्या ओळखीची वाटू लागली! उद्या मी इथून पुढे जाईन, पुन्हा कधी या सगळ्यांना भेटेन की नाही तेही ठाऊक नाही.

जानकी, वालबाई अन् तिचा नवरा यांचा निरोप घेताना मला वाईट वाटेल का? वाईट कदाचित् नाही वाटणार पण उदास नक्की वाटेल.

असं का होतं? एवढ्याशा ओळखीत एवढी जवळीक वाटणं हे माझ्या नागरी संस्कृतीत बसतच नाही, माझ्या संवर्धनात अशा वाटण्याला जागाच नव्हती, मग या इवल्या दुनियेबद्दल मला का एवढी जवळीक वाटतेय?

बोलणी निघाली हुती. सैल कोटवाला अधनं-मधनं मधल्या दाराकडं बघत हुता... पाव्हण्यांनी बराच कढधरला हुता.

आई बाहीर आली. पाव्हणीबाईबी बाहीर येऊन आडुशाच्या पडदीला टेकून बसली.

गौरी ठळक गुलाबी लुगड्यात कांदाफवं घेऊन आली. पाच बशांत नि दोन वाडग्यांत फवं घाटलेलं ताट तिनं समद्यांच्या मधी ठेवलं. अगदी वासू भटाच्या पोरीला दावतानाचा पर्कार घरात चालला हुता. मला आत आत आईची गंमत वाटत हुती.

''ही माझी लेक बघा. गौरा.''

सगळं पाव्हणं टकामका बघाय लागलं. कुणी बघिटली, कुणी न्हाई तवर गौरी आत गेली.

समद्यांनी फवं बकाबका खायाला सुरुवात केली...

आई भटाच्या हितं दूध घालती. तिथं पाव्हणं, न्हाई तर कोणतरी आलं म्हंजे कांदा-फवं करत्यात. तिनं ते ऐनवक्ती जाऊन भटाच्या हितं दोन-चारदा खाल्लं हुतं. आमच्याकडंबी कोण तरी पाव्हणं आल्यावर ती कांदा-फवं करती. पर हटकून दर डावाला तेलच कमी पडतं. खरं म्हंजे परवडतच न्हाई. घरात तेवढं तेलच नसतंय. मग फवं हॉटेलातल्या फव्यागत हुणार कसं? शिवाय आईचा तिखटाला हात सैल. चटणी भरपूर पडली हुती. तरी पाव्हणं बकाबका खाईत हुतं. तांब्यातलं पाणी अधनं-मधनं पीत हुतं.

फवं झाल्यावर आई बशा घेऊन आत गेली नि गौरी पुन्हा च्या घेऊन आली. दोनदा येणं-जाणं झालं.

पाव्हणं च्या पिऊ लागलं. आई काय-बाय, काय-बाय पाव्हणीसंगत बोलत हुती.

च्या पिणं झाल्यावर मी कपबशा घेऊन आत गेलो.

''आई, तुला गौरी आत बलवती बघ.'' बाहीर येऊन मी आईला सांगितलं नि ती आत गेली. मी पाव्हण्यांत जाऊन बसलो.

आईनं पाट बाहीर आणला. उगवतीला तोंड करून पाव्हण्यांच्या फुडं मांडला. पाव्हण्यांचं बोलणं आपूआप कमी झालं. सगळं सावरून बसलं. सैल कोटवाल्यानं आपला कोट दोन्ही हातांनी आपल्या अंगाभवतीनं आवळला नि त्यो मागं सरकून ताठ बसला.

गौरी पाटावर येऊन बसली. खाली मान घालून...गळ्यात आईचं

मणी दिसलं. कपाळाला ठळक कुक्कू. चेहरा तुकतुकीत. पायांत जुन्या मासूळ्या नि जोडवी घातलेली. हातांत काकणांमागं आईच्या पितळी पाटल्या. गुडघ्याच्या खालपतोर दोन्ही पायांवर नेसलेलं लुगडं...बरी दिसली. तिला अशी नटलेली मी पैल्यांदाच बघत हुतो. तिचं नाकबी सरळ हुतं, ते ध्येनात आलं. तिचा गव्हाळ रंग ध्येनात आला. माझं मन सुपाएवढं झालं.

सैल कोटवाल्याचे डोळं तिला बघायला बचकंएवढं झालं हुतं.

बघणं झालं. इचारणं झालं. कुक्कू लावण झालं. पाया पडणं झाल्यावर गौरी आत गेली.

पाव्हणं एकमेकांकडं बघत बसलं. खुशीनं बोलू लागलं. सैल कोटवाल्याचा चेहरा उमलून आला हुता. उद्या माणूस सांगावा घेऊन लावून देतो म्हणून घटका-तासानं पाव्हणं उठलं.

आईचा आवाज सलाम पडला. डुईवरचा दीस मावळतीकडं सरकत कासरा-दोन कासरं गेला हुता.

''भैरू, आटीप आता, त्येंनी मळ्यातच ऱ्हायलं वाटतं. आलंच न्हाईत. राखणीला ऱ्हायलं जणू. भट फेरी मारायचा एखाद्या वक्ती. चटाचटा समदं आवरा नि मळ्याकडं जाऊ या.''

मी घोंगड्यावरची चुन्याची बोटं वल्ल्या बोळ्यानं पुसली नि घोंगडी देऊन आलो.

सोपा हुता तसा दिसू लागला. आईनं राधामावशीचा पानाचा डबा, पान, सुपारी, कात, बडीशेप काढून पोचता केला. गौरीनं अंगावरचं समदं काढून ठेवलं. मळ्याकडनं येताना तिच्या अंगावर जे जुन्यार हुतं तेच नेसलं. न्हाणीत बसून कपबशा धूत हुती. तवर आईनं कंबळाकीची लुगडी परत केली. गंगी जर्मनच्या भुगुण्याला चिकटलेलं फवं चटाचटा टोचून खाईत हुती.

मी कपबशा देऊन आलो. आईनं फळीवरची भांडी गोळा करून पेटीत टाकली. घरासारखं घर दिसू लागलं.

''चला आता मळ्याकडं.''

समद्यांनी पायांत खेटरं चढवली नि घराला कुलूप घाटलं. दारातला दगूड उनानं कवाच वाळून गेला हुता.

आईच्या डुईवर माळव्याच्या मोकळ्या बुट्ट्या हुत्या. उद्या बाजार.

आज माळवं तोडायचं हुतं. लगालगा समद्यांचंच पाय आईबरोबर हुतं. गंगी तर पळतच येत हुती.

चालता चालता मी म्हणालो, ''एकाएकीच कसं हे पाव्हणं आलं?''

ती म्हणाली, ''ते एक इपरीतच घडलं. मी दुकानला चालली हुती. तोडकराच्या गल्लीच्या शेंड्याला येऊन बघिटलं, तर जानबा गोनुगड्याच्या दारासमोर ईसभर माणसं गपगार हुबी आणि घरात तर राडरड मोकाट चाललेली. सहज म्हणून मी चौकशी केली तर जानबाचा दमेकरी म्हातारा चुलता मेल्याचं कळलं. आरंऽऽ देवाऽ!'' म्हटलं नि फुडं चालली.

फुडं चाळीसभर पावलांवर परगावची चारपाच माणसं गोनुगड्याच्या घराकडं लांबनंच बघत हुबी ऱ्हायलेली दिसली. नटूनथटून आलेली. चार बापय माणसं नि एक बाई. ती बाई माझ्याकडं लांबनंच एकटक बघू लागली. त्यांतल्या एकाचाबी चेहरा मला वळखीचा वाटंना. मी आपली बाईकडं बघत बघत फुडं चालली, तर तिनंच मला हळू हाक मारली, ''बाई, तुम्ही चौकशी केलेल्या त्या घरात रडारड कसली?''

मी म्हटलं, ''गोनुगड्याचा म्हातारा मेला! आजारी हुता दम्यानं.''

''म्हंजे जानबा गोनुगड्याचा बाऽ काय?'' एकानं इचारलं.

मी म्हटलं, ''बा न्हवं, जानबाचा चुलता हुता त्यो मेला. तुम्ही कोण? गावातलं दिसत न्हाईसा.'' मी सजावारी चौकशी केली.

म्हणालं, ''आम्ही जानबाच्या लेकीला बघायला आलो हुतो. त्येची 'लेक लग्नाची हाय' म्हणून कळलं हुतं. 'आज या' म्हणालं हुतं. येऊन बघतोय तर हे चितार दिसलं. ...पैल्या पावलालाच ठेच! काय करायचं?''

मी इचारलं, ''कोणच्या गावचं?''

तर म्हणालं, ''लांगनूरचं.''

मग मी सगळी चौकशी केली. तर सगळं कूळमूळ, जातगोत जमतंय, असं दिसलं.

म्हणून त्यांस्नी म्हटलं, ''तसं काय मानू नका. योगायोगाच्या गोष्टी असत्यात त्या. जानबाच्या लेकीच्या नशिबात आजचा दीस चांगला दिसत न्हाई. आता आलाईसा तर 'पैल्या पावलाला ठेच' असं म्हणू नका. माझीबी लेक लगनाची हाय. आलाईसा तसं 'तिला' बघून जावा. योग असला तर तिच्यासंगं जमंल. वाटलंच तर जानबाच्या लेकीलाबी सुताक सपल्यावर पुन्ना

बघून जावा.'' असं म्हणून मी आमची कुळीमुळी, जातगोत, घरदार, धंदादस्तूर सगळं सांगिटलं. तर कबूल झालं. 'आलोय तर काळ्या रामाच्या देवळात जाऊन देवदर्शन घेऊन तसंच येतो' म्हणालं.

मी म्हटलं, ''या.''

आईचं हे बोलणं ऐकून मी जरा चिडूनच तिला इचारलं, ''अशा पाव्हण्यांस्नी गौरीला दाखवायची एवढी काय घाई उडाली हुती?''

समजुतीच्या सुरात आई म्हणाली, ''बाबा भैरूबा, किती केलं तर 'लेक लगनाची नि बेडी मणाची.' आईचं मन तुला न्हाई कळायचं. तुझा बाऽ म्हणणाऱ्यानं तर अजून त्येच्या लेकीसाठी एकबी 'जागा' आणला न्हाई का कवा गावोगाव जाऊन चौकशीबी करून आला न्हाई. ...असंच जर चालत ऱ्हायलं तर लेकीचं लगीन हुब्या जल्मात तरी हुईल काय? ...मला तिच्या लगनाचा नुसता घोर घोर लागून ऱ्हायलाय. लगनाचंबी एक वय असतं. ते मागं पडलं, लेक 'जून' झाली, तर तिला कोण पदरात घेईल काय? -म्हणून मी धडपड केली. एखाद्या वक्ती असंल तिच्या नशिबात तर जमून जाईलबी. ...गोनुगड्याच्या लेकीचा योग नसंल नि माझ्या लेकीचा योग असंल म्हणूनबी एखाद्या वक्ताला ह्या दैवाच्या गाठी पडल्या असतील.'' आईच्या मनातली गौरीबद्दलची काळजी, घोर, खळबळ नि उचंबळ बाहेर पडली.

माळ आला हुता. उभा चढलागलेला. गंगीनं आपली खेटरं हातात घेतली नि ती चढचढाय लागली. गौरीचा चेहरा घामानं भिजला हुता. आईचं डोळं कुठल्या तरी तंदरीत बुडून गेलं.

चढचढता चढता ती काळजीनं म्हणाली, ''एवढं केल्यासारखं पोरगीला पसंत केली तर बरं हुईल. ...न्हाईतर आजचा दीस फुकटातच गेला म्हणायचा.''

...मलाबी गौरीची काळजी लागून ऱ्हायली. तिच्या नशिबातला रोजगार सुटंल, असं वाटत न्हवतं. ...तिला बघाय येणाऱ्यानंबी कोट मागूनच आणला हुता. शेवटाला खुरप्याचं लगीन खुरप्यासंगंच हुणार, असं दिसत हुतं.

◆

संस्मरण

पावसाआधीचा पाऊस



शान्ता ज. शेळके

माणसाच्या मनात खोलवर पाहण्याचा सहजपणा शान्ताबाईंच्या लेखनात नेहमीच दिसून येतो.

'निसर्गाकडे परत' आयुष्याकडे बघण्याचा एक वेगळाच दृष्टिकोन दाखवतो. वागण्या-बोलण्यात नक्की खरं-खोटं काय हे कधी कधी समजणं कठीण असतं, असं 'भूलभुलय्या' सांगून जातो. समाजात वावरताना आपल्या स्वभावाचे, व्यक्तिमत्त्वाचे काटे आपण किती सहज खुडून टाकतो ते 'गुलाब, काटे, कळ्या' मधून जाणवत राहतं.

अति काम करणं ही एक समस्या होते आहे ते 'वर्कोहोलिक' तीव्रतेनं दाखवून देतो. स्वातंत्र्यदेखील कधीतरी नकोसं वाटतं असं 'मनातला किल्ला' दाखवतो. छोट्याशा प्रसंगातून लहानपणीच अपयशांना, सत्याला कसं सामोरं जायचं याची 'ओळख' होते. मानवी स्वभावाचे असे विविध पैलू दाखवतानाच 'चोरबाजार'मधून लेखिका आपल्याला वास्तवाकडे नेते.

सामान्य माणसाची नस न् नस पकडत हा 'पावसाआधीचा पाऊस' चिंब आनंदानुभव देतो.

(‘पावसाआधीचा पाऊस’ पुस्तकातून)

चोरबाजार

काल मी चोरबाजार पाहिला.

छे छे. या शब्दात कसलीही कोटी मला अभिप्रेत नाही. किंवा चोरबाजार नावाचा एखादा हिंदी चित्रपट वगैरे मी पाहिला असेही नाही. (काला बाजार नावाचा एक सिनेमा बऱ्याच वर्षांपूर्वी पाहिल्याचे आठवते. तसा ‘चोरबाजार’ नावाचा सिनेमा निघाला असणेही अशक्य नाही.) चोरबाजार म्हणजे अगदी खराखुरा चोरबाजार मी पाहिला असेच मला म्हणायचे आहे.

त्याचे असे झाले. माझा एक विद्यार्थीमित्र आहे. बरेच दिवस तो मला म्हणत होता, ‘‘बाई, आपण एकदा चोरबाजार बघायला जाऊ या.’’ पण तो योग काही येत नव्हता. कारण चोरबाजारात म्हणे शुक्रवारी जावे लागते. त्या दिवशी तिथे फेरीवाले येतात आणि बाजारही त्याच दिवशी भरगच्च असतो. वेळ दुपारी तीननंतर सोयीची असते. मुख्य म्हणजे तिथली घाण, गर्दी, गिऱ्हाइकांचे बोलणे, आवाजांचा कल्लोळ या कशाची पर्वा न करता (आणि वाट न चुकता) पाय तुटेपर्यंत भटकायची तयारी ठेवावी लागते. या साऱ्या अटी पाळून आणि माझ्या अन् माझ्या विद्यार्थिमित्राच्या सवडीच्या वेळा जमवून मग चोरबाजारात आम्ही जायला हवे होते. हे इतके दिवस काही जमले नाही. काल मात्र ते अचानक जमले. सतीश – माझा विद्यार्थिमित्र – माझ्याकडे आला. त्याला सवड होती. मला सवड होती. दिवस शुक्रवारचा होता. मुख्य म्हणजे कधी नव्हे ती मनमुराद भटकण्याची मला लहर आली होती. सतीश मला म्हणाला, ‘‘आज जाऊ या बाई, चोरबाजार बघायला?’’ मी मागला पुढला विचार न करता म्हटले, ‘‘चल जाऊ या.’’ आणि आम्ही निघालो.

चोरबाजाराचा नेमका पत्ता सांगणे अवघड आहे. महंमह अली रोडवरून क्रॉफर्ड मार्केटच्या दिशेने तुम्ही निघाला आहात अशी कल्पना करा. जाता जाता ऐन मुसलमानी वस्तीच्या अंतरंगात जेव्हा आपण येऊन पोहोचतो तेव्हा उजवीकडच्या रस्त्याला लागायचे आणि चालता चालता पहिल्या की दुसऱ्या अरुंद रस्त्याने उजवीकडेच पुन्हा आत शिरायचे. यानंतर

अनेक आडव्या, उभ्या, एकमेकींना छेदून जाणाऱ्या आणि अगम्य रीतीने परस्परांत गुरफटलेल्या गल्ल्यांच्या अद्‌भुत चक्रव्यूहात आपण सापडतो. हाच चोरबाजार. आता हा पत्ता काही मला नेमका देता आलेला नाही हे उघड आहे. पण याहून जास्त नेमका पत्ता मला सांगताही येणार नाही. मुळातच मुंबईच्या रस्त्यांचे, त्यांच्या नावांचे माझे ज्ञान मर्यादित आहे. त्यातून चोरबाजार तर अशा अवघड ठिकाणी वसलेला आहे की यापेक्षा त्याचा जास्त अचूक ठावठिकाणा मला समजावून सांगता यायचा नाही.

तर असे आम्ही चोरबाजारात शिरलो. पहिल्या गल्लीत मी पाऊल टाकले मात्र; काळाचे चक्र जणू उलट दिशेने भर्रकन फिरले आणि पन्नाससाठ वर्षांपूर्वीच्या काळातल्या मुंबईत मी उभी आहे असा मला भास झाला. पण हेही विधान तितकेसे खरे नव्हे. कारण चोरबाजारात साठसत्तर वर्षांपूर्वीच्या जुन्या अद्‌भुत चिजा जशा जागजागी मांडून ठेवलेल्या दिसत होत्या तसे तऱ्हेतऱ्हेचे ट्रॅन्झिस्टर्स, कुकिंग रेंज, परदेशी काचसामान, मूल्यवान सेंट्‌सच्या रिकाम्या बाटल्या, टेलिफोनचे दर्शनी सांगाडे, अगदी अलीकडच्या काळातल्या हिंदी आणि इंग्रजी चित्रपटांतल्या गाण्यांच्या कॅसेट टेप्स, अशा आधुनिक वस्तूही तिथे सर्वत्र दिसून येत होत्या. जुन्यानव्यांचे ते विचित्र मिश्रण चक्रावून टाकणारे होते. प्रत्येक दुकानदारासमोर गिऱ्हाइकांची गर्दी होती. माणसे आपापसांत बोलत होती. वाद घालीत होती. एखाद्या दुकानाच्या दाराशी बांधलेली गोजिरवाणी बकरी छोट्या मुलाने भरवलेली कोवळी पाने लुबुलुबु खात होती. एखादा मुसलमान चट्टेरी पट्टेरी लुंगी सावरीत निर्विकारपणे इकडून तिकडे जात होता. मुसलमानी रंगीबेरंगी मिठाया मोठाल्या ताटांतून मांडलेल्या होत्या. काचेच्या बरण्यांत बिस्किटे, नानकटाई भरून ठेवलेली होती. एका दुकानदाराच्या दुकानाच्या फळीवर एक लेकुरवाळी मांजरी आपल्या एकुलत्या एका पिलाला वळण लावीत होती. एका दुकानासमोर 'अलीबाबा आणि चाळीस चोर' या 'अरेबियन नाइट्‌स' मधल्या कथेतूनच अलगद उचलून आणल्यासारखा वाटावा असा भलाथोरला रांजण ठेवलेला होता. नाना प्रकारच्या आवाजांचा एकच गुंतवळा झाला होता. आणि दुकानादुकानातून रेडिओ, ट्रॅन्झिस्टर, टेपरेकॉर्डर चालू होते. माणसांच्या चित्रविचित्र गोंगाटातून अचानक एखादी भरदार आवाजातली कवाली कानांवर येई. कधी बेगम अख्तरच्या दर्दभऱ्या ठुमरीचे काळजाला भिडणारे सूर उमटत तर कधी, अगदी जुन्या,

विस्मृतप्राय चित्रपटामधल्या एखाद्या गाण्यातली लताची भिरभिरती सुरेल तान जिवाचे पाणी पाणी करून टाकी. सारे अजब, अनोखे, अद्‌भुत होते. आपण मुंबईत आहोत की दुसऱ्याच एखाद्या अपरिचित दुनियेत आलो आहोत तेही कळत नव्हते.

चोरबाजारातल्या गल्ल्या अरुंद आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दुकानदारांनी जमिनीवरच ठिकठिकाणी आपला माल मांडून ठेवला असल्यामुळे त्या आणखीच अरुंद वाटत होत्या. एका दुकानदाराच्या पुढ्यात बरेच काचसामान होते. तुटलेल्या झुंबराचे पैलूदार लोलक एका भल्या थोरल्या काचेच्या थाळीत मांडून ठेवले होते. पलीकडे सेंटच्या बाटल्यांचा ढीग पडला होता. एकेकाळी त्या बाटल्यांतून भारी भारी परदेशी सेंट्स् भरून ठेवलेले होते. आता तो सुगंध उडून गेला होता. तरीही एखाद्या बाटलीचे झाकण उघडून पाहिले तर तो मंदपणे जाणवत होता. मनात आले, या बाटल्या, कधी कुठल्या निमित्ताने कुणी कुणाला दिल्या असतील. कुठल्या कुठल्या भारी वस्त्रप्रावरणांवर हे सुगंध फवारले गेले असतील. कुठले समारंभ, मेजवान्या, मैफली या सुगंधांनी दरवळून गेल्या असतील. कुठल्या नाजुक, कोमल, उदास आठवणी अजूनही या बाटल्यांभोवती घोटाळत असतील. बाटल्यांचे आकार तरी किती विविध प्रकारचे होते. उंच निमुळत्या, गोल बसक्या, त्रिकोणी आणि षट्‌कोनी, पैलूदार तशाच नितळ. एकेकाळच्या खाजगी बाटल्या, कुणीतरी जिवापाड जपलेल्या अन् जिवाभावाच्या माणसाला दिलेल्या, आता बिचाऱ्या भर बाजारात उघड्यावर येऊन पडल्या होत्या. काचेच्या वस्तूंची मला खूप आवड आहे. पण त्या बेवारशी बाटल्यांना हात लावावासा वाटेना. त्यांच्याकडे बघताना मन खिन्न झाले. त्या बाटल्यांच्या जोडीलाच इतरही किती सुरेख काचसामान तिथे होते. इराणमधले देखावे चित्रित केलेली एखादी बशी, उंच कळीदार आकाराचा गर्द हिरव्या रंगाचा एक पेला, शिंपल्याच्या आकाराचे एक चिमुकले तबक, दाढीवाल्या चिनी माणसाचे चित्र रेखाटलेल्या मातकट रंगाचा एक अतिशय सुबक असा काचेचा सट आणि अशाच इतर कितीतरी चिजा तिथे अस्ताव्यस्त विखुरल्या होत्या. एका रुंद फुलदाणीवर साबुदाण्यासारखी नक्षी होती आणि त्यावर हिरव्या पांढऱ्या रंगाचे नुसते ओघळ सोडून त्यातून सुंदर पानाफुलांचे चित्र निर्माण केले होते. पण इतकी साजरी वस्तू अखंड नव्हती. एका बाजूने तिला तडा गेला होता. मी कितीतरी

वेळ त्या फुलदाणीकडे नुसती बघतच राहिले. तिच्यावरून नजर हलवावीशी वाटेना. सतीश मला म्हणाला, ''बाई, इथेच किती वेळ थांबणार? पुढे चला ना, अजून आपल्याला खूप गमती गमती बघायच्या आहेत.''

मी पुढे चालू लागले. एखाद्या दुकानात नुसते फर्निचर भरलेले दिसे. पारशी लोकांच्या घरीच कदाचित बघायला मिळतील अशी सुरेख कपाटे, अलमाऱ्या, छोटी टेबले, टीपॉय अशा सलग वस्तूंबरोबर पलंगाचा एकच नक्षीदार पाय, एखाद्या मोडक्या खुर्चीची नुसतीच मखमलीने मढवलेली पाठ, एखाद्या कपाटाचा मोडका सांगाडा अशा चिजाही तिथे होत्या; त्याच्या पुढच्या दुकानात सारे लोखंडी सामान भरलेले दिसले. एका माणसाला कवेत धरून उचलता येणार नाही असा अजस्र लोखंडी साखळीपासून तो नखभर चिमुकल्या खिळ्यापर्यंत हजार प्रकारच्या लोखंडी वस्तू तिथे दिसल्या. लोखंडाच्या जोडीला पोलादी सामानाची दुकानेही होती. दुकानदाराच्या पुढ्यात चाकूचेच एक शंभर नमुने असतील. शिंगाच्या मुठीचे, रुंद पात्याचे, निळसर रंगाने चमकणारे हिंस्र सुरे तिथे होते, तशाच लोणी देखील नाजुकपणे कापतील अशा मायाळू सुऱ्याही तिथे दिसल्या. चिमुकले दुहेरी पात्यांचे चाकू, नेलकटर्स, छोट्या कात्र्या आणि मोठ्या कात्र्या इथपासून तो विविध आकाराच्या सुयांपर्यंत अनंत रूपांनी पोलाद तिथे नटलेले होते.

पण चाकूकात्र्यांसारख्या वस्तूंत मला फारशी गोडी नव्हती. म्हणून मी जवळच्या पितळी सामानाच्या दुकानाकडे वळले. अहाहा! त्या वस्तू बघताना मन एकदम मधली अनेक वर्षे ओलांडून भूतकाळात शिरले. स्टेनलेस स्टीलने आपल्या जीवनावर जेव्हा आक्रमण केले नव्हते त्या काळातल्या अनेक ओळखीच्या वस्तू मला तिथे भेटल्या. पितळेच्या नाजूक परड्या रिकाम्या पडल्या होत्या. पण मला त्यांत कण्हेरी, तगर, प्राजक्ताची फुले भरलेली दिसू लागली. पितळी कोयऱ्या उघडून बघताना हळदकुंकवाचा ओळखीचा वास नाकात शिरला. उंच देखण्या पितळी समयांतून अचानक ज्योती तेवू लागल्या, वळवळत्या नागाने उचललेल्या मस्तकावरच पाच पाकळ्या उमलवलेली एक सुरेख समई तर मला फारच आवडली. कापूर जाळण्यासाठी बनवलेल्या चिमुकल्या कापूरदाण्या, गंधाळी, छोट्या मोठ्या घंटा, निरांजने, पितळेची किंवा तांब्यांची संपुष्टे-अशा वस्तू एकमेकींच्या आधाराने तिथे गुण्यागोविंदाने बसल्या होत्या. नुसती उदबत्त्यांची घरे तर

पाचपन्नास असतील. त्या वस्तू पाहताना मन एकदम माझ्या माहेरच्या देवघरात जाऊन पोहोचले. कापूर उदबत्त्यांचा, फुलांचा, गंधाचा वास नाकाभोवती दरवळू लागला. इतकेच नाही तर वृद्ध कापऱ्या आवाजात आजी म्हणे त्या जुन्या गाण्याच्या ओळीही कानांभोवती रुंजी घालू लागल्या, 'पंढरपूर परगणा। सोन्याच्या वेशीला बाई मोत्याचा पाळणा!'

देवघरातल्या या वस्तूंच्या जोडीला ब्राह्मणी घरात दिसून येणारी पितळेची तबके, सुबक आकाराचे चंबू, लोट्या, तीर्थोटल्या, पळ्या आणि पंचपात्रे या वस्तूही तिथे विपुल होत्या. तांब्याचे जड गडवे आणि त्यावर तिरपी बसलेली फुलपात्रे होती. तांबे आणि पितळ यांच्या पट्ट्या एकमेकांशेजारी जडवून केलेला एक गडवा तर इतका सुंदर दिसत होता. मी तो उचलून पाहिला आणि दचकले. आजच्या काळातल्या चार गडव्यांच्या वजनाइतके त्या एका गडव्याचे वजन असेल. मी भीत भीत दुकानदाराला किंमत विचारली. तो म्हणाला, ''पचास रुपिया पडेगा.'' पन्नास रुपये. मी गडवा मुकाट्याने खाली ठेवून दिला.

इतका वेळ माझी नजर या वस्तूंवरच खिळून राहिली होती. पण आता मी आजूबाजूला पाहू लागले. जरा पलीकडे तऱ्हेतऱ्हेचे देव ठेवले होते. कटीवरी हात विटेवरी उभा असा 'पंढरीचा देव सावळा' तिथे होता. तशी कुर्त्याने एकटी उभी राहिलेली रखुमाईही होती. तांब्यापितळेचे अनेक लहानमोठे टाक तिथे विखुरलेले होते. मी देशावरची, त्यामुळे खंडोबा, म्हाळसा, मारुती असे देव मला चटकन ओळखता आले. पण माझ्या पाहण्यात कधी न आलेल्या देवांचे टाकही तिथे खूप होते आणि तऱ्हेतऱ्हेचे, अतिशय देखणे, गोजिरवाणे बाळकृष्ण तिथे रांगेने ठेवले होते. त्यातला पुढले दोन्ही हात जमिनीवर टेकून उत्सुकतेने वर बघणारा एक रांगता बाळकृष्ण तर इतका गोड होता. 'तळवे तळहात टेकतु। डाव्या गुडघ्याने रांगतु। तो म्या रंगनाथु। अंगणी देखिला सये' हा नामदेवांचा अभंग मला आठवला. मला तो बाळकृष्ण घेण्याची फार इच्छा झाली. काय वाटेल ती किंमत देऊन तो बाळकृष्ण घ्यायचा असे मी ठरवले. इतक्यात एक विचित्र विचार मनात आला. कुणाच्या घरचे, कुणाच्या देव्हाऱ्यातले हे देव असतील? कुठल्या प्रसंगाने बिचाऱ्या मालकाने हे देव विकायला काढले असतील? घरावर काही आपत्ती कोसळली असेल? मालक देशोधडी लागला असेल? की घराण्याचाच निर्वंश झाला असेल? मला जास्त विचार

करवेना आणि तो बाळकृष्णही खरेदी करवेना. मनाच्या तळातून अशुभ, अभद्र शंकांचे मोहोळ घोंघावत उठले. त्या गोड बाळकृष्णाची मनोमन क्षमा मागून, त्याचा निरोप घेऊन मी पुढे सरकले.

चार वाजून गेले होते. बाजार ऐन भरात आला होता. माणसांची गर्दी वाढत चालली होती. त्यातच कपबश्यांचे मिनार हातावर सावरीत हॉटेलमधील बाहेरवाली पोरे इकडून तिकडे जात होती. माझा घसा सुकला होता. पण त्या कळकट चहाच्या दर्शनानेच पोटातून ढवळून आले. एवढ्या गर्दीत एक हातगाडीवाला रंगीत सरबते विकीत उभा होता तर दुसऱ्याने हातगाडीवर चक्क फोडलेला फणस ठेवून गऱ्यांची विक्री सुरू केली होती. पिक्या फणसाच्या कुंद वासाने डोके फिरून गेले. मी लगबगीने पुढे सरकले आणि इतर दुकानांसमोरून हिंडू लागले. दुकानदारांसमोरच्या वस्तूंत काय होते विचारण्यापेक्षा काय नव्हते हे विचारणे जास्त सोयीचे ठरेल. एका जडीबुट्टीवाल्या हकीमासमोर तऱ्हेतऱ्हेचे शंख होते. रुद्राक्षांच्या माळा होत्या. पाचपन्नास आकारप्रकारांच्या मुळ्या होत्या. तावीज होते. दात विचकलेली कवटी होती आणि विचकलेल्या तोंडाचे कोल्ह्याचे नुसते मस्तकही होते. पोवळ्यांच्या माळा होत्या. रंगीबेरंगी खडे होते. आणि दवा भरून ठेवलेल्या लहानमोठ्या बाटल्या तर असंख्य होत्या. ''दवाई लेलो, अक्सीर इलाज देखो!'' अशी वाक्ये तो इतक्या वेगाने आणि सफाईने बोलत होता की त्याच्या तोंडात लहानसा ट्रॅन्झिस्टर चालू ठेवलेला असावा अशी मला शंका आली.

त्याच्याच शेजारी एक अगदी तरुण, कमालीचा देखणा पोऱ्या समोर प्लास्टिकच्या फडक्यावर सामान मांडून बसला होता. त्याच्याजवळ परदेशी कॅमेरे होते. ट्रॅन्झिस्टर होते. मूल्यवान सेंट्सच्या भरलेल्या बाटल्या होत्या. जपानी स्वस्त आणि सुबक वस्तू तर अनेक होत्या. फाउंटनपेने होती, जीनतानच्या गोळ्या होत्या. चित्रविचित्र आकाराच्या लाकडी व धातूच्या पेट्या होत्या. या वस्तू जुनवट नव्हत्या. त्यांच्यावर नवेपणाची झिलई होती. चोरबाजारात त्या चिजा शोभत नव्हत्या. दुकानदारालाही आपल्या वस्तूंच्या वेगळेपणाची जाणीव होती. त्यांचा रास्त अहंकार होता. एक भाबडे गिऱ्हाईक एका फाउंटनपेटच्या किंमतीबद्दल वाद घालू लागले तेव्हा तो तरुण पोरगा उद्धटपणे त्याला म्हणाला, ''भाईजी, चाहे तो चीज खरीद लो नहीं तो आग जाईये। मेरा टाईम खराब मत करो। चट मंगनी पट ब्याह ये यहाँ का कानून

४थी आवृत्ती

रेशीमगाठी

कांचन काशिनाथ घाणेकर

किंमत : १७०/-रु.

पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

'नाथ हा माझा' हा माझ्या हातून लिहून झालेला पहिलाच ग्रंथ. यात मी माझे पती डॉ. काशिनाथ घाणेकर यांची सहवास-स्मरणं शब्दबद्ध केली आहेत.

या ग्रंथानंतर मी माझ्या वाचकांपुढं उभी आहे एक नवं पुस्तक घेऊन. या पुस्तकात सोळा लेख आहेत. ही सारी व्यक्तिचित्रंच आहेत – अगदी जयप्रभा स्टुडिओचंही! या पंधरा व्यक्तींपैकी एक माझी आई – जिच्याशी जन्मामुळं गाठ पडली, तर डॉ. काशिनाथ घाणेकरांशी लग्न झाल्यामुळं. उरलेल्या तेरा व्यक्तींशी मात्र माझ्या रेशीमगाठी जुळलेल्या आहेत. रेशमासारख्या मृदू-मुलायम, सुखद आणि पक्क्या. एकदा पडलेल्या या गाठी इतक्या घट्ट आहेत, की पुन्हा कधी त्या सैल झाल्याच नाहीत. या सर्व व्यक्ती उत्तुंग, कर्तृत्वशाली आणि प्रदीर्घ कारकीर्द पाठीशी असलेल्या आहेत. मात्र हे लेख त्यांच्या कार्यकर्तृत्वाचं मूल्यमापन करणारे नाहीत. मी त्यांच्या सहवासात आल्यावर मला ते कसे भावले, त्यांचे ठसे माझ्या मनावर कसे उमटत गेले, याचं हे प्रांजळ कथन आहे. हे सारेच लेख वेळोवेळी उठलेल्या ऊर्मींमुळं लिहिले गेले आहेत.

या सर्व मंडळींनी मला इतकं भरभरून दिलं आहे, की त्यांच्याविषयीच्या माझ्या भावना केवळ कृतज्ञतेच्या आहेत. माझं सद्‌भाग्य म्हणूनच ही मंडळी माझ्या जीवनात आली आणि त्यांच्या परीसस्पर्शानं माझं अवघं जीवनच उजळून गेलं.

– कांचन काशिनाथ घाणेकर

है!'' त्याची बोलण्याची ऐट, रुबाब, उलटे वळवलेले केस मी बघतच राहिले. हिंदी चित्रपटसृष्टी सोडून हा हिरो इकडे चोरबाजारात कुठे वाट चुकला ते मला कळेना.

आता मी भराभर दुकाने मागे टाकू लागले. काही दुकानांत नुसते रेडिओ व ट्रॅन्झिस्टर भरलेले होते. जुन्या जुन्या चित्रपटांतल्या कितीतरी रेकॉर्ड्स तिथे होत्या. आणि या साऱ्या आधुनिक पसाऱ्यात विशोभित दिसणारे कर्ण्याचे जुने ग्रामोफोन उदासवाणी कळा पांघरून अंग चोरून बसले होते. एका दुकानात साड्यांच्या काठाला लावण्याच्या भरजरी लेसेस होत्या. बनारसी शालूचे काठ होते. आणि लहान मुलांचे कपडेही होते. एका ठिकाणी नुसत्या वॉशबेसिन्सचा ढिगारा पडला होता. एका दुकानदारापाशी मण्यांच्या माळा, बांगड्या, कर्णभूषणे आणि रंगीबेरंगी खडे होते. आजकाल दुर्मिळ झालेल्या राजवर्खी खड्यांचे विविध आकार कापून ठेवलेले होते. वाटल्यास कर्णभूषणे करावी. वाटल्यास अंगठीत बसवावे. वाटल्यास लॉकेट करून गळ्यात घालावे. पण त्या सर्व पसाऱ्यात एका गोष्टीने माझे लक्ष वेधून घेतले. हिरव्या रंगाच्या चिनी दगडाचा-जेडचा-एक अतिशय देखणा गणपती होता तो. रुंद कान, बारीक डोळे, लंबोदरावर वळलेली सोंड, मांडीची बैठक सारे कसे जिथल्या तिथे होते. तो सुबक रेखीव गणपती पाहताना भान हरपले. मी दुकानदाराला किंमत विचारली. तो म्हणाला, ''सिर्फ पावनासो रुपिया.'' पाऊणशे रुपये. मी त्या मूर्तीकडे पुन्हा बघू लागले. तीन साडेतीन इंच उंचीची मूर्ती होती. असेलही पाऊणशे रुपये किंमत. या मूर्ती महाग असतात हे मला ठाऊक होते. मी मुकाट्याने पुढे चालू लागले. सतीश हळूच मला म्हणाला, ''बाई, जरा घासाघीस करायची होती.'' ''घासाघीस?'' मी आश्चर्याने विचारले, ''म्हणजे काय झालं असतं?'' ''तो आला असता पंचवीस तीस रुपयांपर्यंत खाली.'' ''चल!'' मी म्हटले, ''पंचाहत्तरचे पंचवीस कसे करील तो? खुळ्यासारखं बोलू नकोस काहीतरी.'' ''न करायला काय झालं बाई?'' सतीश हसून म्हणाला, ''चोरबाजार आहे हा. इथं कुठलीही चीज केवढ्याही कमी किमतीत मागता येते.'' सतीशने सांगितले पण मला धीर होईना. दुकानदार फटदिशी काही बोलला तर? मी आपली पुढे निघाले.

आणि अचानक काय झाले कुणास ठाऊक. सतीश हरवला. किंवा मी हरवले म्हणा पाहिजे तर. थोडक्यात सांगायचे तर त्याची माझी चुकामूक

झाली. मी कावरीबावरी होऊन इकडे तिकडे पाहू लागले. हा मुलगा आता इथे होता अन् एवढ्यात गेला कुठे? मला त्याचा फार राग आला. त्याबरोबर आतून खूप भीतीही वाटली. तो जर सापडला नाही तर? या चक्रव्यूहातून बाहेर कसे पडायचे? भोवतालचा एकूण एक चेहरा अनोळखी. परका. मला भयंकर असुरक्षित वाटू लागले. मुंबईत इतर कुठल्याही जागी, कुठल्याही अनोळखी रस्त्यावर हा अनुभव मला आला नव्हता. मग इथेच इतकी भीती का वाटावी कळेना. पण भीती वाटली खरी. मी जिथल्या तिथेच उभी राहिले. डोळ्यांत जीव आणून सतीशला शोधू लागले. पण त्याचा कुठे पत्ता नाही. अशी पाच एक मिनिटे गेली असतील. पण तेवढा वेळही मला किती दीर्घ वाटला. मनातल्या मनात मी देता येतील तेवढ्या शिव्या सतीशला देऊन घेतल्या. आणि...अचानक तो मला समोर दिसला. तोंडभर हसू आणि हातात पाचसहा रंगीबेरंगी चित्रांची कार्डे. ''अरे होतास कुठे तू?'' मी चिडून विचारले. ''हा काय त्या पलीकडच्या दुकानदारासमोर तर उभा होतो. घाबरायचं कशाला बाई?'' सतीश म्हणाला, ''माझं तिथून तुमच्यावर लक्ष होतं.'' ''बरं बरं! समजलं शहाणपण!'' मी म्हणाले, ''पुरे झाला चोरबाजार. चल आता घरी जाऊ या.'' ''हे काय, आपण निघालोच आहोत की आता इथून. हा मोठा रस्ता लागला बघा!'' सतीश म्हणाला.

खरेच, आम्ही दोन पावले टाकली असतील नसतील तो गल्ली संपली आणि आम्ही एकदम मोठ्या रस्त्यावर आलो आहोत असे मला दिसले. हा चमत्कार कसा घडला ते मला कळेना. चोरबाजाराची रंगीबेरंगी मोहमयी अद्‌भुत दुनिया क्षणार्धात दृष्टीआड झाली होती आणि माझे ओळखीचे, सुरक्षित, सभ्य जग माझ्याभोवती पुन्हा उभे राहिले होते.

सतीशने हात करून टॅक्सी थांबवली. टॅक्सीत बसल्यावर मी म्हणाले, ''कसली एवढी खरेदी केलीस?'' ''मांजराची चित्रं विकत घेतली तुमच्यासाठी'' सतीश म्हणाला, आणि त्याने ती रंगीत कार्डे माझ्या हातात दिली. ''संपला चोरबाजार,'' मी म्हटले, ''हिंडता हिंडता पाय दुखायला लागले.'' ''चोरबाजार संपला नाही बाई'' सतीश हसत म्हणाला, ''खरं म्हणजे आता इथूनच चोरबाजार सुरू झालाय.''

टॅक्सी महंमदअली रोडवरून घराच्या दिशेने धावत होती.

संस्मरण

नेताजी



वि. स. वाळिंबे

सुभाषबाबूंना प्रथम प्रतीची प्रज्ञा लाभली होती. मॅट्रिकच्या परीक्षेत ते कलकत्ता विद्यापीठात दुसरे आले. अशा आपल्या या बुद्धिमान मुलाने वरिष्ठ सरकारी अधिकारी होऊन सुखासीन कालक्रमणा करावी, असे जानकीबाबूंना त्याच्या वडिलांना वाटणे स्वाभाविक होते. म्हणूनच जानकीबाबूंनी सुभाषला इंग्लडला धाडले आय.सी.एस.च्या परीक्षेला बसायचे ही अट त्याच्याकडून मान्य करवून.

त्या परीक्षेचा निकाल सुभाषबाबूंनाही अनपेक्षित ठरला ते नुसते उत्तीर्ण झाले नव्हते, चौथे आले होते. आय.सी.एस. होणे म्हणजे हात स्वर्गापर्यंत पाहोचणे असे मानले जाणाऱ्या त्या काळात एखादे चिठोरे भिरकावून द्यावे तशी या मनस्वी युवकाने लाखमोलाची सनद झिडकारून टाकली. चित्तरंजनदास यांचे सहकारी म्हणून सुभाषबाबूंनी राजकारणात प्रवेश केला. गांधीजींसंबंधी अतीव आदर असूनही, त्यांच्या मार्गाने जाऊन स्वातंत्र्य युद्धातील अखेरची लढाई जिंकणे अशक्य आहे, अशी खात्री होताच आपला हा विचार व्यक्त करायला सुभाषबाबू संकोचले नाहीत.

सुभाषबाबूंना परिणामांची पूर्ण जाणीव होती. आणि तरीही त्यांनी कर्तव्यच प्रमाण मानले. असे निग्रही आणि निर्धारी व्यक्तिमत्त्व एवादेच. 'नेताजी' या चरित-कहाणीचा त्यासाठीच प्रपंच. सत्य हे कधीकधी कल्पितापेक्षाही अद्‌भुत भासते. वि.स. वाळिंबे यांनी आपल्या ओघवत्या आणि चित्रदर्शी निवेदनशैलीने शब्दबद्ध केलेल्या या चरित-कहाणीच्या पानापानावर त्या अद्‌भुताचा प्रत्यय येतो.

('नेताजी' पुस्तकातून)

'स्वातंत्र्याचा झेंडा फडकत ठेवा'

सुभाषबाबू नेपल्सला पोहोचताच त्यांना 'द इंडियन स्ट्रगल'ची पहिली प्रत पाहायला मिळाली. ते हरखून गेले. आजारपणामुळे हे पुस्तक लिहून पुरे होते की नाही आणि पुरे झाल्यावर सरकार ते धडपणे प्रसिद्ध करून देते की नाही, या विवंचनेने त्यांना काही काळ व्यग्र केले होते. सुभाषबाबू आपल्या त्या पहिल्यावहिल्या ग्रंथरचनेकडे किती तरी वेळ नुसते पाहत बसून राहिले. या वाङ्मयीन अपत्याचा रसरुचिर स्पर्श त्यांच्या अंतरंगाला सुखावत होता.

नेपल्सहून सुभाषबाबू रोमला आले. मागच्या एका रोम-भेटीत त्यांनी तेथील 'हुतात्मा भवन' पाहिले होते. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामामध्ये वीरगती प्राप्त झालेल्या देशवीरांच्या स्मरणार्थ आपण कलकत्त्यामध्येही असेच एक 'महाजाती सदन' उभारावे असे तेव्हापासून त्यांच्या मनाने घेतले होते. या भेटीत त्यांनी मुसोलिनीपाशी हा विचार बोलून दाखविला.

मुसोलिनीने आश्वासन दिले, ''तुमचं पक्कं झालं की मला कळवा. आमचं हे हुतात्मा भवन ज्यांनी बांधलं तो वास्तुविद्याविशारद तुमच्याकडे कलकत्त्याला पाठवून देईन. तसंच या 'भवना'चा सारा खर्च आम्ही करू– इटालियन जनतेची भारतीय जनतेला भेट म्हणून.''

सुभाषबाबूंनी १९३९मध्ये कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या हस्ते या संकल्पित राष्ट्रीय स्मारकाची कोनशिला बसविलीही. परंतु नंतर लवकरच युरोपमध्ये महायुद्ध सुरू झाल्यामुळे हा प्रकल्प तेवढ्यावरच राहिला. कलकत्त्यातील इटालियन प्रतिनिधी काऊंट मिलेसी याची या स्मारकाच्या बाबतीत सुभाषबाबूंना बरीच मदत झाली.

हा परिचय त्यांना पुढे खूपच उपयोगी पडला.

युरोपमध्ये असताना लांब कोट, पँट आणि उंच काळी किंवा आखूड पिवळसर टोपी हाच सुभाषबाबूंचा वेश असे. एकदा ते मुसोलिनीला त्याच्या 'पॅलाझो व्हेनेझिया'मध्ये भेटून बाहेर पडत असताना दारावरच्या सुरक्षा अधिकाऱ्याने त्यांना हटकले. या वेशातील माणूस तो प्रथमच पाहत

होता. त्याला संशय आला. सुभाषबाबू त्याला समजावू लागले, ''अरे, मी आता तुमच्या ड्यूकना भेटून बाहेर पडत आहे.'' सुरक्षा अधिकाऱ्याचा या गोष्टीवर विश्वास बसला नाही. तो सुभाषबाबूंसमवेत त्यांच्या हॉटेलवर गेला आणि त्यांचा पासपोर्ट पाहिल्यांनतरच परत फिरला. दुसऱ्या दिवशी ही गोष्ट मुसोलिनीच्या कानावर गेली. त्याने त्या सुरक्षा अधिकाऱ्याला यापुढे एवढा अतिउत्साह न दाखविण्याबाबत बजाविले.

रोममधल्या अशाच एका वास्तव्यात सुभाषबाबूंची अगदी योगायोगाने रशियन परराष्ट्रमंत्री लिटविनोव्ह याच्याशी भेट झाली. दोघे बराच वेळ बोलत बसले होते. परंतु पुढे स्टॅलिनने लिटविनोव्ह याला त्या पदावरून तडकाफडकी काढून टाकल्यामुळे या बोलण्याचा काहीच उपयोग झाला नाही. स्टॅलिनला हिटलरशी मैत्री करार करण्याची घाई झाली होती आणि अशा वेळी त्याला लिटविनोव्हसारखा ज्यू माणूस परराष्ट्रमंत्रिपदावर नको होता. आपल्याला मंत्रिमंडळातून वगळण्यात आले आहे, हे लिटविनोव्ह याला प्रथम 'प्रावदा' मधून आणि नंतर क्रेमलिनमध्ये गेल्यावर कळले.

अफगाणिस्तानचे पदच्युत नरेश अमानुल्ला त्या वेळी रोममध्ये राहत असत. एकदा त्यांनी सुभाषबाबूंना आपल्या निवासस्थानी आवर्जून बोलावून घेतले. सुभाषबाबूंच्या पुढच्या योजना या अफगाण बादशहाला इतक्या पसंत पडल्या की जाताना त्याने सुभाषबाबूंच्या दिमतीला आपली 'इसोटा फ्राशिनी' ही शाही मोटार दिली.

सुभाषबाबू स्वभावाने अतिशय हळवे होते. दुसऱ्याच्या दु:खाने ते दु:खी होत. मणींद्रमोहन मौलिक हा अर्थशास्त्राचा विद्यार्थी त्यावेळी रोम विद्यापीठात डॉक्टरेटसाठी आलेला होता. तो आजारी पडला हे सुभाषबाबूंना कळले, तेव्हा त्याची ओळखदेख नसतानादेखील ते त्याला भेटायला गेले. सुभाषबाबूंनी डॉक्टरांना सांगितले, 'याला काहीही कमी पडता कामा नये. काही लागलं तर मला अवश्य कळवा.'

सुभाषबाबू पुन्हा व्हिएन्नाला राहायला आले. परंतु पूर्वीसारखाच त्यांचा प्रवास चालू होता. जास्तीत जास्त लोकांशी संपर्क साधायचा, त्यांचे मनोगत जाणून घ्यायचे यासाठी ते प्राग, बर्लिन, कोलोन, ब्रुसेल्स, अँटवर्प, पॅरिस अशा अनेक ठिकाणी जाऊन आले. व्हिएन्नातल्या महिला मंडळाने त्यांचे व्याख्यान ठेवले. विषय होता– भारतीय स्त्री.

सुभाषबाबू म्हणाले, ''केशभूषा आणि वेशभूषा या बाबतीत युरोपीय स्त्री अधिक आधुनिक दिसत असली तरी भारतीय स्त्रीची समज अधिक प्रगल्भ आहे. स्वातंत्र्यसंग्रामात ती पुरुषांच्या बरोबरीनं भाग घेत आहे, तुरुंगवास भोगत आहे. गांधीजींनी तिला हे बळ पुरवलं.''

ग्लांड येथल्या रुग्णालयाने विठ्ठलभाई पटेल यांचे जेथे निधन झाले तेथे त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नामफलक बसवण्याचे ठरविले. त्याचा अनावरण समारंभ सुभाषबाबूंच्या हस्ते व्हावा, असेही ठरले. वस्तुत: सुभाषबाबूंची प्रकृती त्या वेळी ठीक नव्हती. शस्त्रक्रियेचा दिवस निश्चित झाला होता. परंतु विठ्ठलभाईंसाठी वाटत असलेल्या आदरामुळे सुभाषबाबू तिकडे जाऊन आले.

अनायासे ते जीनिव्हापर्यंत गेलेलेच होते. तपोधन विचारवंत रोमां रोलँ तेथेच राहत होते. नुकतेच सुभाषबाबूंना त्यांचे 'द इंडियन स्ट्रगल' संबंधी कौतुकाचे पत्रही आले होते. म्हणून सुभाषबाबू त्यांना भेटायला गेले.

या भेटीवर सुभाषबाबूंनी पुढे एक लेख लिहिला आणि तो रामानंद चतर्जींच्या 'मॉर्डन रिव्ह्यू' या प्रतिष्ठाप्राप्त मासिकाच्या सप्टेंबर १९३५ च्या अंकात प्रसिद्ध झाला.

त्या लेखात सुभाषबाबू म्हणतात ;

'बुधवार, ३ एप्रिल १९३५.

सुरेख सोनेरी सकाळ होती. जीनिव्हा छान दिसत होते. निरभ्र निळ्या आभाळाच्या पार्श्वभूमीवर सालेव्हची हिमधवल शिखरे चमचमत होती. आमच्या समोर जीनिव्हामधले चित्रमनोरम सरोवर पसरले होते. त्याच्या पृष्ठभागावर सभोवतालच्या दिमाखदार वास्तूंची प्रतिबिंबे खेळत होती.

मी एका यात्रेसाठी निघालो होतो.

युरोपमध्ये येऊन आता दोन वर्षे झाली होती. तेव्हापासून एका महामानवाला, अभिजात तत्त्वचिंतकाला भेटण्यासाठी मन अधीर झाले होते. ते तत्त्वज्ञ म्हणजे भारत आणि भारतीय संस्कृती यांचे जिव्हाळ्याचे स्नेही रोमां रोलँ. १९३३ मध्ये मी त्यांची भेट घेण्याचा प्रत्यन केला होता, १९३४ मध्ये पुन्हा केला होता. परंतु हा तिसरा प्रयत्न मात्र नक्कीच सफल

होणार होता. भेटायला निघालो तेव्हा मन प्रसन्न होते, पण थोडीशी धास्तीही होती, काहीशी काळजीही होती– हा माणूस आपल्याला प्रोत्साहित करील का निराश होऊन परतावे लागेल? उत्तुंग स्वप्ने पाहण्यात मश्गुल असणारा हा माणूस जीवानाचे वास्तव समजावून घेऊ शकेल का? प्रत्येक काळी आणि प्रत्येक स्थळी, सैनिकांच्या मार्गावर अनंत अडचणी उभ्या असतात. त्या याला समजत असतील का? हिंदुस्थानच्या भालप्रदेशावर नियतीने काय लिहून ठेवले आहे ते हा माणूस वाचू शकेल का?

जीनिव्हा जलाशयाभोवतालच्या वर्तुळाकार मार्गाने आम्ही दोन तास चाललो होतो. हवा उबदार होती. स्वित्झर्लंडचे जगविख्यात निसर्गसौंदर्य आमच्या नजरेसमोर उलगडले जात होते. 'व्हिला ओल्गा'पाशी आमची मोटार थांबली.

हेच त्या फ्रेंच महापंडिताचे निवासस्थान– सुंदर परिसरात वसलेले. टेकड्यांचा आधार लाभलेले. या घरातून सरोवराचे रमणीय दर्शन घडते. एका ऋषीच्या आश्रमाला हाच परिसर साजेसा होता.

मी घंटा वाजविताच एका बुटक्या स्त्रीने दार उघडले. तिचा चेहरा फारच बोलका होता. याच त्या मादाम रोमां रोलँ. त्या माझे स्वागत करीत आहेत तोच समोरचा दरवाजा उघडला गेला आणि एक उंचकाय व्यक्ती पुढे आली. तिचा चेहरा वयोमानामुळे काहीसा फिकट दिसत होता, पण डोळ्यांत दुसऱ्याचा वेध घ्यायची ताकद होती. होय, हा चेहरा मी या पूर्वी अनेक छायाचित्रांमध्ये पाहिला होता. मानवजातीला सोसाव्या लागणाऱ्या यातनांची वेदना त्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. त्या निस्तेज मुखमंडलावर दु:ख दाटून आले होते, परंतु हे दु:ख पराभूताचे नव्हते. कारण ते गृहस्थ बोलायला लागताच त्यांच्या पांढुरक्या गालांवर नवा रंग चढला, डोळे चमकू लागले– असे तेज सहसा पाहायला मिळत नाही, आणि त्यांच्या ओठातून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द दुर्दम्य आशावादाचा प्रत्यय घडवीत होता.

नमस्कार झाला, हिंदुस्थान आणि तेथील स्नेहीजन यांचे कुशल विचारून झाले, आणि मग आमचे बोलणे सुरू झाले. रोलँ यांना इंग्रजीत बोलता येत नव्हते आणि मला फ्रेंचमध्ये. दुभाषाचे काम रोमां रोलँ यांच्या पत्नी आणि भगिनी यांनी केले. मला त्यांच्याशी मुख्यत: हिंदुस्थानातील प्रचलित परिस्थितीसंबंधी बोलायचे होते. तसेच, महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांसंबंधीची त्यांची मते जाणून घ्यायची होती. मी विचारले, ''गांधीवादी

२री आवृत्ती

परमेश्वर
: एक सांकेतिक नाव



मणी भौमिक

अनुवाद

अशोक पाध्ये

किंमत : २५०/-रु.

पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

बरेचजण असे मानतात की, विज्ञानाने माणूस व परमेश्वर यांच्यामध्ये पाचर मारून त्या दोघांतील अंतर वाढवत नेले आहे.

कुठे आहे तो परमेश्वर? तो मृत्यू पावला आहे का? धर्म आणि श्रद्धा या केवळ अफूसारख्या आहेत. चारशे वर्षांपूर्वी विज्ञानाची प्रगती होऊ लागली. तोपर्यंत दैवी शक्तीचा प्रभाव जगावर सर्वत्र होता. पण नंतर हळूहळू माणसाचा देवावरचा विश्वास ढळू लागला. देवाची जागा विज्ञानाने घेतली. परंतु खुद्द विज्ञान हा एक भ्रामक देव ठरला. परिणामी, मानवजात निराश झाली.

मणी भौमिक या शास्त्रज्ञाने एक्सायमर लेसरचा शोध लावला. डोळ्यांचा चश्मा घालवण्याची शस्त्रक्रिया शोधून काढली. अशा या शास्त्रज्ञाने परमेश्वराचे अस्तित्व विज्ञानाच्या आधारे शोधायचा प्रयत्न केला. त्याची ही एक थरारक कहाणी!

सत्याग्रहापेक्षा एखादी वेगळी चळवळ हिंदुस्थानात सुरू झाली तर आपल्याला काय वाटेल?''

''गांधींचं सत्याग्रही तंत्र हिंदुस्थान स्वतंत्र करायला उपयोगी पडू शकलं नाही, तर निश्चितच मला वाईट वाटेल. महायुद्ध अनुभवलेल्या जगाला रक्तपात आणि विद्वेष यांची शिसारी आली आहे. अशा वेळी राजकीय लढ्याचं नवं शस्त्र घेऊन गांधीजी उभे ठाकले तेव्हा क्षितिजावर एकदम नवा प्रकाश दिसू लागल्याचा आनंद झाला. गांधीजींच्या या नव्या शस्त्रासंबंधी साऱ्या जगालाच कुतूहल आणि अपेक्षा वाटत आहे.''

मी म्हटले, ''आजच्या या स्वार्थी जगात गांधीजींचं तंत्र फारच उदात्त ठरतं, असा आमचा अनुभव आहे. तेवढी उदात्तता इतरांना पेलवतच नाही. प्रतिपक्षाशी गांधीजी फारच खुल्या दिलानं वागतात. समजा, गांधीजींचा हा अहिंसक प्रयोग फसला आणि दुसऱ्या मार्गानं हिंदुस्थानचा स्वातंत्र्यलढा चालू राहिला तर आपल्याला काय वाटेल? हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासंबंधीची आपली आस्था ओसरून जाईल काय?''

''कोणत्याही परिस्थितीत लढा चालूच राहिला पाहिजे.'' ते ठामपणे म्हणाले.

''युरोपमधले हिंदुस्थानचे काही हितचिंतक मला असं म्हणाले की गांधीजींच्या नि:शस्त्र प्रतिकारामुळेच आम्हाला हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासंबंधी आपुलकी वाटत आहे.''

''मी त्या मताचा नाही. सत्याग्रहाचं तंत्र अयशस्वी ठरलं तर मला खूप वाईट वाटेल, हे खरं आहे. परंतु जर खरोखरच नि:शस्त्र प्रतिकारानं काहीही साध्य होत नाही असं आढळून आलं तर मग अन्य मार्गांनी जायला मुळीच हरकत नाही. कारण जीवनातलं कठोर वास्तव टाळू म्हटलं तरी टाळता येत नाही.''

माझे अगदी हेच मत आहे.

आम्ही गांधीजींसंबधी बरेच बोललो.

मी म्हटले, ''आर्थिक प्रश्नांसंबधी गांधीजी निश्चित भूमिका घेत नाहीत, हीच त्यांच्यासंबंधी माझी मुख्य तक्रार आहे. प्रश्न सामाजिक असो, राजकीय असो वा आर्थिक असो, गांधीजी स्वभावत:च सुवर्णमध्याचे पुरस्कर्ते आहेत. हिंदुस्थानातल्या तरुण पिढीला गांधीजींच्या नेतृत्वामध्ये काही उणिवा आणि दोष जाणवतात. एक म्हणजे, आपले सारे बेत ते

प्रतिपक्षाला आधीच सांगून टाकतात. गांधीजींच्या स्वभावात आणखी एक फार मोठा दोष आहे– त्यांना मतभिन्नता मुळीच खपत नाही. वेगळे मत व्यक्त करणाऱ्यावर ते बहिष्कार टाकतात. अशा माणसासंबंधी ते बिलकूल दयामाया दाखवत नाही. इंग्रज सरकारचं आपण हृदयपरिवर्तन घडवून आणू, हा गांधीजींचा विश्वासही आम्हाला अनाठायी वाटतो. गांधीजींना विरोध करताना, इतकंच काय, पण त्यांच्यावर टीका करताना मला अत्यंत क्लेश होतात, मुळीच आनंद वाटत नाही. अपरिहार्य कर्तव्य म्हणूनच विरोध करावा लागतो. कारण इतर कोणाहीपेक्षा गांधीजींनीच हिंदुस्थानची अधिक सेवा केलेली आहे. साऱ्या जगात हिंदुस्थानला आज जो मान मिळत आहे तो एकट्या गांधीजींमुळेच. मला हे सारं मान्य आहे, परंतु मी व्यक्तीपेक्षा देश मोठा मानतो.''

युरोपमधील आगामी संभाव्य युद्धाच्या चर्चेशिवाय आमचे हे संभाषण पुरे होणे शक्यच नव्हते.

मी म्हटले, ''परतंत्र देशांना युद्ध हे वरदानच वाटतं.''

''परंतु युरोपपुरता विचार करायचा असेल तर ती फार मोठी आपत्ती ठरेल. कदाचित त्या संघर्षात संस्कृतीचा अंतही घडून येईल.''

रोमा रोलँ यांचा निरोप घेण्यापूर्वी, त्यांच्या अगत्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्याशी झालेल्या चर्चेमुळे मला अत्यंत समाधान लाभले, हेही सांगितले.

'व्हिला ओल्गा' मधून मी बाहेर पडलो तेव्हा सूर्य जीनिव्हा सरोवराच्या निळ्या पाण्यावर अजूनही चमकत होता. त्याच्या भोवताली हिमाच्छादित गिरीशिखरे उभी होती. हवेत आनंद दाटून आला होता. त्या आनंदी वायुलहरींनी माझ्या अंत:करणात प्रवेश केला.

माझ्या मनावरचे मोठे दडपण दूर झाले होते.

हा श्रेष्ठ विचारवंत आणि कलावंत हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या बाजूने ठामपणे उभा ठाकल्याशिवाय राहणार नाही, याची आता मला खात्री पटली होती.

आणि तो विश्वास घेऊनच समाधानी मन:स्थितीत मी जीनिव्हाला परतलो.'

त्याच निश्चिंत मन:स्थितीत सुभाषबाबू व्हिएन्नाला आले आणि मध्यंतरी बराच काळ रेंगाळत राहिलेली शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी डॉ.

डेमेल यांच्या दवाखान्यात प्रविष्ट झाले. डॉ. डेमेल यांनी २४ एप्रिलला सुभाषबाबूंच्या पोटातील पित्ताशयाची पिशवी काढून टाकली. साचलेल्या पित्तामुळे आत टणक गाठ झाली होती आणि तिच्यामुळे असह्य वेदना व्हायच्या आणि ठणका थांबला तरी ठुसठुस सारखी चालू असायची.

या शस्त्रक्रियेमुळे सुभाषबाबूंना कमालीचा अशक्तपणा जाणवू लागला. दीड महिना नुसते पडून राहावे लागले.

सुभाषबाबू रुग्णालयातून बाहेर पडत असताना डॉ. डेमेल यांनी त्यांना बजावले, ''आपण पूर्णपणे बरे झालेलो आहोत, असं समजू नका. अजूनही विश्रांतीची आवश्यकता आहे. एखाद्या निवांत ठिकाणी राहायला जा आणि मुख्य म्हणजे व्हिएन्नाला परत यायची घाई करू नका– इथं आलात की तुमची दगदग पुन्हा सुरू होईल. विश्रांती घ्यायची म्हटली तरी इथं ते जमणार नाही.''

सुभाषबाबूंनी कार्ल्सबाड येथे जायचे ठरविले.

एवढ्यात त्यांना कळले की कमला नेहरू औषधोपचारासाठी युरोपमध्ये येत आहेत. म्हणून सुभाषबाबूंनी आपले जाणे थोडे पुढे ढकलले. डॉ. अटल आणि कन्या इंदिरा यांच्या समवेत कमला नेहरू व्हिएन्नाला आल्या. सुभाषबाबू त्यांच्याबरोबर प्रागपर्यंत गेले. डॉ. काटयाल त्यांना घेऊन बर्लिनला गेले आणि सुभाषबाबू कार्ल्सबाड येथे जाऊन पोहोचले. तेथे ते 'हॉटेल अलेक्झांड्रा'मध्ये उतरले. सकाळी आणि संध्याकाळी त्यांना उष्ण पाण्याच्या झऱ्यांपाशी उपचारांसाठी जावे लागे.

जवळजवळ साडेतीन वर्षांच्या स्थानबद्धतेनंतर शरदबाबूंची सुटका झाल्याचे वृत्त सुभाषबाबूंना कार्ल्सबाड येथे कळले.
एक काळजी दूर झाली.

आपल्यामुळेच मेजदादांना हा सरकारी रोष सहन करावा लागत आहे, याचा सुभाषबाबूंना विषाद वाटायचा.

कमला नेहरू यांच्यावर बर्लिन येथे शस्त्रक्रिया करण्यात आली आणि नंतर त्या विश्रांतीसाठी ब्लॅक फॉरेस्टमधील बाडेनवेलेर येथे राहायला गेल्या.

सप्टेंबरच्या सुरुवातीला कमलाजींची प्रकृती पुन्हा बिघडली. त्या वेळी पं. जवाहरलाल नेहरू तुरुंगात होते. त्यांच्या पत्नीची प्रकृती गंभीर झालेली आहे हे कळताच सरकारने त्यांची सुटका केली. पंडितजी जर्मनीला

यायला निघाले. जर्मनी आणि स्वित्झर्लंड यांच्या सीमेवर बासेल नावाचे गाव आहे. पंडितजींना भेटण्यासाठी सुभाषबाबू तेथे गेले. बासेलहून दोघे बाडेनवेलेर येथे आले, एकाच हॉटेलमध्ये उतरले. सुभाषबाबू पंडितजींसमवेत तेथे दहा दिवस राहिले.

हे दोघेजण कितीतरी दिवसांनी परस्परांना भेटत होते. मध्यंतरी बरेच घडून गेले होते. सुभाषबाबू आणि पंडितजी यांना अनायासे बाडेनवेलेर येथे अनेक विषयांवर मोकळेपणाने बोलता आले– स्वातंत्र्यलढ्यासंबंधी, ब्रिटिश सरकारच्या धोरणासंबंधी, युरोपमधल्या झपाट्याने बदलत चाललेल्या परिस्थितीसंबंधी आणि मुख्य म्हणजे गांधीजींसंबंधी.

सहमती होत होती, मतभिन्नताही जाणवत होती; तरीही स्नेहभावनेला तडा गेला नाही. अर्थात ती इण्डिपेण्डन्स लीगच्या स्थापनेच्या वेळी होती तेवढी आता गहिरी राहिलेली नव्हती.

कमलाजींच्या जीवनाला निर्माण झालेला धोका तूर्त तरी निवळला आहे, असा डॉक्टरांनी निर्वाळा दिल्यावर सुभाषबाबू औषधी पाण्याचे उपचार करून घेण्यासाठी बाडगास्टेन येथे राहायला गेले.

याच सुमाराला हिटलरने आणखी एक भाषण करून, गौरकायांच्या, विशेषत: 'नॉर्डिक' वंशाच्या श्रेष्ठतेसंबंधीच्या आपल्या सिद्धांताचा पुनरुच्चार केला.

हिटलरचे हे उद्धट उद्‌गार सुभाषबाबूंना संतापजनक वाटले.

त्यांनी एक पत्रक काढून हिटलरचा आणि त्याच्या प्रतिपादनाचा तीव्र शब्दांमध्ये धिक्कार केला.

बर्लिनमधल्या जपानी राजदूतानेही आपला निषेध नोंदविला.

नाझी पक्षाच्या प्रवक्त्याने खुलासा केला : 'फ्युररच्या या प्रतिपादनाचा हिंदुस्थान आणि जपान यांच्याशी संबंध नाही.'

हे पटण्यासारखे नव्हते. कारण त्यात सारवासारव होती; मन:पूर्वकतेचा प्रत्यय येत नव्हता.

बाडगास्टेन येथल्या पाण्याने प्रकृतीला थोडासा आराम वाटू लागताच सुभाषबाबूंचा संपर्क-दौरा पुन्हा सुरू झाला.

ते बर्लिनला आले, किट्टी कुर्टीची आठवण झाली– मनोविश्लेषणासंबंधीचे बोलणे मागच्या वेळी अपुरे राहिले होते.

ॲलेक्स नुकताच कामावर गेला होता. किट्टी न्याहारी करीत होती.

बाहेरचे लखलखीत सूर्यकिरण आत यावेत म्हणून ती खिडकी उघडायला गेली, एवढ्यात दारावरची घंटा वाजली. इतक्या सकाळी कोण आले असेल? किट्टीने दरवाजा उघडला आणि आश्चर्याने ओरडली, ''तुम्ही!'' डोळ्यातून आनंद ओसंडत होता.

समोर सुभाषबाबू उभे होते.

मधल्या काळात किट्टीने दोनदा जागा बदलली होती.

त्यांना आपला हा नवा पत्ता कसा काय मिळाला?

''या, मिस्टर बोस, तुम्ही अगदी मला थक्कच करून टाकलं. आठवण ठेवून आलात, बरं वाटलं.''

''तुमचं कसं काय चाललंय?''

''ठीक. पण अगोदर आत या ना! बसा!''

''तुमचं हे नवं घर खूपच चांगलं आहे.''

''तुम्हाला आवडलं? खरं सांगू? तुम्ही आला आहात याचा अजून डोळ्यांवर विश्वासच बसत नाही. किती दिवसांनी आपण भेटतोय? आता तुम्ही हिंदुस्थानातून आलात काय?''

''नाही. इथं आल्याला बरेच दिवस होऊन गेले. नुकताच व्हिएन्नाहून आलोय– एक काम आहे म्हणून. दोन-चार दिवस राहीन.''

सुभाषबाबू आपल्याकडे निरखून पाहत आहेत, हे किट्टीला जाणवले. तिला त्याचे कारणही कळले. ती सांगते, ''होय, मी गरोदर आहे.''

''छान! अपत्यप्राप्ती हा स्त्रीच्या आयुष्यातला सर्वांत महत्त्वाचा आणि तितकाच आनंदाचा अनुभव असतो.''

प्रारंभीचे बोलणे आटोपते.

सुभाषबाबूंना कुर्टी दांपत्याविषयी आस्था वाटत असे.

ते सांगू लागतात, ''तुम्ही अजून इथं कशासाठी राहत आहात? परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. तुम्ही जितक्या लवकर जर्मनीबाहेर पडाल तितकं चांगलं.''

''आमचाही तोच विचार आहे. आम्हाला धोक्याची पूर्ण कल्पना आहे. म्हणूनच लवकरच चेकोस्लोव्हाकियाला परत जायचं आम्ही ठरवलं आहे.''

''काय, चेकोस्लोव्हाकियाला? मिसेस कुर्टी, तुमचा

९वी आवृत्ती

हस्ताचा पाऊस

व्यंकटेश माडगूळकर

किंमत : १२०/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

कधीकधी मी फार निरुत्साही होतो. खडकावर बेडके बसून राहावीत तशा लेखनकल्पना मनातच राहतात. आपण एक-एक म्हणता अनेक ओझी डोक्यावर घेऊन चालतो आहोत, अशी जाण मध्येच येते. सर्वांत प्रथम लेखन, बाकी सर्व दुय्यम. त्याच्या वाटेत येणारी कोणतीही गोष्ट घट्ट मनाने बाजूला केली पाहिजे; पण तसे सामर्थ्य नसते आणि आपणच आपल्या शक्ती नासवून टाकतो.

असा विचार मनात येतो,

लेखक म्हणून आजवर जे मिळवले ते मोठे आहे, असे मला मनोमनी कधी वाटत नाही. तसे वाटले असते, तरी एका परीने बरे होते.

भाबड्याला मिळते ती शांतता तरी मिळाली असती.

मध्येच कधी मन उसळी मारते.

उडी घेऊ वाटते. काय घडेल ते खरे!

चेकोस्लोव्हाकिया जर्मनीच्या अगदी जवळ आहे, जर्मनीच्या मानानं बराच दुबळा आहे. एक आक्रमक आणि शक्तिशाली राष्ट्राचा शेजार चेकोस्लोव्हाकियाला लाभला आहे. काही दिवसांनी चेकोस्लेव्हाकियाची परिस्थिती फार बिकट होऊन जाईल. मागे तुम्ही एकदा अमेरिकेला जायचं म्हणत होता, त्याचं काय झालं?''

''होय, आम्ही तिकडे तसा अर्ज केलेला आहे, पण उत्तर यायला वेळ लागतो, म्हणे. अमेरिकेचा होकार आला तर ठीकच. मग आम्ही तिकडेच जाऊ. परंतु पहिली नोकरी सोडणं, देश सोडणं, आपल्या आप्तांपासून खूप दूर जाणं, वाटतं तेवढं सोपं नसतं. तरीदेखील आम्ही लवकर अमेरिकेला जाऊ शकू, अशी आशा आहे.''

''मग ठीक आहे, पण फार वेळ घालवू नका. तुमच्या पायाखालची जमीन हादरू लागली आहे. दिवस मोठे कठीण आले आहेत.''

''हो, ते आम्हाला माहीत आहे. आम्ही कोणत्याही भ्रमात नाही. नाझी लोक मला चांगले ठाऊक आहेत, त्यांच्या छळछावण्या, त्यांचा हिंसाचार, त्यांचं क्रौर्य– सारं काही माहीत आहे. युद्ध जवळ येत चाललं आहे, हे मलाही जाणवतंय. युद्ध भडकणार आणि मग सारंच संपणार.''

''बरोबर आहे. म्हणून म्हणतो. इथं थांबू नका.''

''आम्ही इथून बाहेर पडणार आहोत.''

''लवकरच?''

''हो. अगदी लवकर.''

''मग हरकत नाही.''

बोलणे गांधीजींकडे वळले.

सुभाषबाबू म्हणाले, ''तुम्ही साधनांची काळजी घ्या, म्हणजे मग साध्य आपली काळजी आपोआपच घेईल, असं गांधीजी नेहमी म्हणत असतात. साधनांच्या शुचितेसंबंधीचा गांधीजींचा आग्रह तुम्हाला विशेष पटतो, हे मला माहीत आहे. साधनांची शुचिता मीही मोलाची मानतो. परंतु प्रश्न असा आहे की तसं करणं नेहमीच जमू शकतं, असं नाही. अकस्मात असा काही प्रसंग समोर येऊन उभा ठाकतो की तुम्हाला तडकाफडकी निर्णय घ्यायचा असतो, कृती करायची असते. हे योग्य की अयोग्य याचा विचार करायला अवसरच राहत नाही. अशा अवमानकारक प्रसंगी, साधनशुचितेचा आग्रह व्यर्थ ठरतो. गांधीजींचा असहकार आणि अहिंसा यांना फार मोठं

राजकीय महत्त्व आहे, हे मलाही मान्य आहे. परंतु कोणतंही शस्त्र कितीही प्रभावी असलं तरी ते सदासर्वकाळ उपयोगी पडतंच, असं नाही, त्याला त्याची म्हणून मर्यादा असते. गेल्या दशकामध्ये गांधीजींच्या अहिंसक आंदोलनानं चमत्कार घडवून आणला, हे तर खरंच; परंतु या दशकात केवळ अहिंसेनं सारं काही साध्य करता येईल, हिंदुस्थानला स्वतंत्र करणं जमू शकेल, असं मला मुळीच वाटत नाही, हेही इथं सांगायला हवं. जाऊ द्या, आपण आता सर्वस्वी वेगळ्या विषयासंबंधी बोलू. म्हणजे मनोविश्लेषणासंबंधी बोलू.''

''काय, मनोविश्लेषणासंबंधी?'' किट्टीने आश्चर्याने विचारले.

''होय, मनोविश्लेषणासंबंधी. मला त्या विषयात खूप रस आहे, हे मी तुम्हाला मागच्या वेळीच सांगितलं होतं. आठवतंय ना? खरं सांगू, आमचा हिंदुस्थान स्वतंत्र असता तर मी राजकारणाच्या या दगदगीत उतरलोच नसतो. मनोविश्लेषण समजावून घेण्यात, मानवी मनातील गुंतागुंत सोडवण्यात आयुष्य खर्च केलं असतं. तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र हे माझे मुळचे आवडीचे विषय. स्वप्नं, त्यांचा अन्वयार्थ, मनाला जाणवणारी प्रतीकं, त्या मागचे गूढ, सुप्त मनाचे सूक्ष्म व्यापार– खरंच, मनोविश्लेषणाची प्रक्रिया मोठी विलक्षण असते आणि ती मला जाणवून घ्यावीशी वाटते– जेवढी समजेल तेवढी. युंग यांचे विचार आणि त्यांचं या संबंधातलं प्रतिपादन या संबंधी मला फारसं काही ठाऊक नाही. तुम्ही युंग यांना मानता. म्हणून मला त्यांच्या मूलभूत संकल्पना सांगा ना.''

''युंग यांच्या संकल्पनांना शब्दांत पकडणं फार कठीण आहे. तुमच्या योगशास्त्रासारखंच आहे ते. स्वत:ला त्या मार्गानं जावं लागतं, आणि तरीही त्या संबंधी फारसं सांगता येत नाही. युंग यांच्या संकल्पना विशद करणं अवघड आहे. एखाद्या अचेतन वस्तूप्रमाणे त्या दाखवता येत नाहीत. मनोविश्लेषणाच्या दृष्टीनं एखाद्याची काही तरी पूर्वतयारी झालेली असल्याशिवाय या बाबतीत त्याच्याशी संवाद होऊच शकत नाही. अर्थात तुमची तेवढी तयारी झालेली आहे हे निश्चितच. त्या शिवाय तुम्ही मागच्या वेळी आपली मतं मांडू शकलाच नसता. मिस्टर बोस, तुम्ही म्हणजे एक संपूर्ण, संकलित व्यक्तित्व आहात आणि युंग यांना नेमकं हेच अभिप्रेत आहे. प्रश्न कोणताही असो, युंग माणसाच्या समग्र व्यक्तिमत्त्वाचा विचार करतात. ते केवळ वैद्यकीय उपचारक नाहीत, सांस्कृतिक चिकित्सकही आहेत,

कुशल अध्यापक आहेत. व्यक्तिमात्राचा मानसिक विकास घडवून आणणं हे त्यांचं उद्दिष्ट आहे.''

''म्हणजे युंग हे गुरू आहेत असंच तुम्हाला म्हणायचं आहे ना, मिसेस कुर्टी? परंतु फ्रॉईड यांची कल्पनाशक्तीही विलक्षण आहे. ते बुद्धिवंतही आहेत आणि प्रतिभावंतही. खरोखरीच अगदी वेगळा आणि धाडसी माणूस. एक व्यक्ती म्हणून आणि एक मनोविकारतज्ज्ञ म्हणून त्यांचं स्थान फार मोठे आहे. अर्थात ते कामप्रेरणेवर अतिरिक्त भर देतात, हेही खरं आहे.''

''कामप्रेरणा हा कोणत्याही माणसाच्या वर्तनप्रक्रियेवर परिणाम करणारा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे, हे कुणीच नाकारत नाही. परंतु आणखीही काही घटक तेवढेच निर्णायक ठरतात.''

''बरोबर आहे. माणसामाणसामध्ये फरक असतो. प्रत्येकाचा स्वभाव वेगळा, तशीच त्याची मूलभूत प्रेरणाही निराळी. काही लोकांना एखाद्या फ्रॉईडची गरज भासते तर दुसऱ्या काहींना कुणा एका युंगची. त्या बाबतीत एकांतिक आग्रह धरून चालत नाही.''

''हे मला मान्य आहे. कुणाचे प्रश्न फ्रॉईड सोडवतात तर कुणाचे युंग. काही माणसांचं भूमीशी नातं असतं, त्यांची मुळं जमिनीत खोलवर गेलेली असतात. अशी माणसं आईला मानतात. त्यांना फ्रॉईड जवळचा वाटतो. दुसरी काही माणसं वडलांकडे वळतात– म्हणजे प्रकाशाकडे, आकाशाकडे, चैतन्याकडे. ते युंग यांना मानतात. आणखी काही माणसं अशी असतात की ती आईही स्वीकारतात आणि वडीलही, भूमीही आणि आकाशही, भावनाही आणि बुद्धीही.''

''या गटात मी येतो, असं मला वाटतं.''

''तुम्ही अस्सल भारतीय आहात. हिंदू माणसं कमालीची आध्यात्मिक असतात. माणसाच्या मनामध्ये मूलभूत धार्मिक जिज्ञासा असते असं युंग यांनी म्हटलेलं आहे. या जिज्ञासेकडे दुर्लक्ष करणं अनिष्ट ठरतं, असं ते म्हणतात. या आध्यात्मिक प्रवृत्तीमुळे शरीराचे अनेक विकार बरे होऊ शकतात, हेही युंग यांनी अनेक उदाहरणं देऊन सिद्ध केलेलं आहे.''

''हे फारच गमतीदार आहे. म्हणजे युंग हे मूलत: संशोधकच म्हटले पाहिजेत. आपण कधी तरी युंग यांच्या सिद्धांतांचा अभ्यास करावा, असं मला खूप वाटतं. बघू या केव्हा जमेल ते. परंतु फ्रॉईड मला फार मोठे

वाटतात, हे कबूल करायला हवं.''

''मिस्टर बोस, मी एक स्त्री आहे. स्त्रीचं नातं धरणीमातेशी निगडित असतं. ती नाळ तोडावी, तो अनुबंध झुगारून द्यावा, असं तिला वाटत नाही. आभाळासंबंधी ती उदासीन असते. ते तिला परकं वाटतं. पुरुषाचं नेमकं उलट असावं. आभाळाकडे झेप घेणं त्याला स्वभावत:च आवडत असावं.''

''तुम्ही म्हणता ते खरं आहे. आम्ही पौर्वात्यांनी शरीर आणि बुद्धी यांची सदैव उपेक्षा केली तर तुम्ही पाश्चात्त्यांनी आत्मा आणि चैतन्य इकडे लक्ष दिलं नाही. त्यामुळे आमची भौतिक उपासमार झाली तर तुमची आध्यात्मिक. ज्या बाबतीत माणसाची उपासमार होते त्याची त्याला अधिक ओढलागते. फ्रॉईड यांच्या काळात कामभावनेची उपेक्षा झाली म्हणूनच त्यांना तिचं सर्वाधिक महत्त्व वाटलं असावं. आजचा काळ हा आध्यात्मिक उपासमारीचा आहे आणि म्हणून तुमच्या पिढीला आध्यात्मिकता विशेष मोलाची वाटत आहे. जीवन स्थितीशील नसतं; गतिशील असतं. सारं काही सतत बदलत असतं. युंग यांचं मोठेपण हे की त्यांनी आजच्या पिढीला भेडसावत असलेल्या प्रश्नांची उत्तरं शोधून काढली आहेत. मानसिक समग्रता जाणून घेण्याच्या दृष्टीनं युंग यांनी स्वप्नांचं महत्त्व मान्य केलं आहे ना? त्याच्यासंबंधी थोडंसं सांगा.''

''तो विषय फार अवघड आहे. मला तो नीट समजला आहे, असंही नव्हे. तरी पण प्रयत्न करते. आपण जहाजावर चढत आहोत, असं माणसाला स्वप्नं पडतं. त्याला मनातून हवं असतं ते थोड्याशा प्रवासाचं सुख. परंतु एवढ्यात जहाजावरचा कर्मचारी त्याला सांगतो, 'आपण आता पॅसिफिक महासागर ओलांडत असून सुमात्राकडे निघालो आहोत.' म्हणजे सुमात्रा बेटाकडे जाणं हे त्या प्रवासाचं उद्दिष्ट ठरतं. सुमात्रा हा शब्द उच्चारला जाताच स्वप्नातदेखील मातेची आठवण होते. कारण सुमात्रा या शब्दाचा लॅटिनमध्ये 'मी माता आहे' असा अर्थ होतो. संस्कृतमध्येही तोच अर्थ आहे की. सुमात्रा म्हणजे आदिशक्ती – या विश्वाची सर्जनक्षमता.''

''वा, फारच छान. तुम्ही खूप प्रगल्भ आहात.''

''नाही. मी आता कुठं त्या अभ्यासाला सुरुवात केली आहे.''

''मला ते खरं वाटत नाही.''

''खरंच सांगते, काही महिन्यांपूर्वीच मी या क्षेत्राकडे वळले आहे.''

''काही माणसं जन्मत:च परिपक्व असतात.''

''तसंच असेल.''

''मिसेस कुर्टी, मी खरोखरच तुमचा खूप आभारी आहे. तुम्ही फार महत्त्वाचं सांगितलं. एक दिवस असा उजाडेल की तुम्ही स्वत:च मनोविश्लेषण करू शकाल. कुठलंही विश्लेषण ही अखेरीस एक कला असते आणि कला निर्मितिक्षम असते. ती सिद्धांताचं कुंपण ओलांडून पलीकडे जाते. तुम्ही हे कार्य अंगीकारावं, इतकी तुमची योग्यता निश्चितच आहे.''

''तुमच्या या प्रशंसेला मी पात्र नाही, याची मला जाणीव आहे. अहो, माझ्यात खूप दोष आहेत. माझ्या मनोरचनेत भूमीचा भाग फार मोठा आहे आणि तो माझ्या मनावर सतत दबाव आणत असतो. मला खूप लांबचा पल्ला गाठायचा आहे. पण तुम्ही म्हणता त्याप्रमाणे मी अवश्य प्रयत्न करीन आणि त्या संबंधी तुम्हाला कळवतही राहीन.''

''अवश्य. सुमात्रा या स्वप्नासंबंधी मला आणखी बरंच कळवा. कारण एका अर्थानं प्रत्येक माणूस हा एक जहाजच असतो. आपल्या सर्वांनाच जीवनाचा समुद्र पार करायचा असतो, आणि आपण सगळे शेवटी एकाच बंदरावर येऊन पोहोचतो. बराय, बराच उशीर झालाय. मला आता निघायला हवं. पुन्हा आपण केव्हा भेटू हे सांगणं कठीण आहे. कारण मी ज्याची वाट पाहात होतो तो क्षण जवळ येत चालला आहे. युद्ध अटळ आहे आणि युद्धानंतर हिंदुस्थानचं स्वातंत्र्यही. हिंदुस्थाननं ही संधी सोडली तर त्याला दीर्घकाळ पश्चात्ताप करत बसावं लागेल. ते जाऊ द्या, तुम्ही तुमची आणि तुमच्या यजमानांनी काळजी घ्या.''

''नक्कीच. तुम्हीही स्वत:ला जपा. तुमचा देश स्वतंत्र होईल, संपन्न होईल, समर्थ होईल, याची मला खात्री आहे.''

''तुमच्या यजमानांना माझा नमस्कार कळवा आणि हा देश लवकर सोडून जायलाही सांगा.''

''अवश्य.''

किट्टी ॲलेक्सची वाट पाहू लागली. सुभाषबाबूंशी झालेले बोलणे

◆

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

२री आवृत्ती



अणसार

वर्षा अडालजा

अनुवाद

अंजनी नरवणे

किंमत : ३५०/-रु.

पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

प्रसिद्ध गुजराती लेखिका वर्षा अडालजा यांची 'अणसार' ही कादंबरी म्हणजे प्रत्येक संवेदनशील व्यक्तीला अंतर्मुख करणारी आणि जीवनमूल्यंच तपासून पाहण्यास उद्युक्त करणारी कलाकृती आहे. 'अणसार' म्हणजे देवाची घंटा! प्रत्येकाच्या मनात एक देवाची घंटा असते. मनात सद्-असद् प्रवृत्तींचा संघर्ष चालू असतो. संवेदनशील व्यक्तीच्या मनात जेव्हा त्या देवाच्या घंटेच्या आवाजाची प्रथम चाहूल येते आणि तो संघर्ष अस्तित्वालाच आव्हान देतो, तेव्हा त्या घंटेला टोल ऐकू येतो आणि माणसाचं 'माणूस'पणच पणाला लागतं! 'माणूस'पण असंच पणाला लागलेल्या एका आजारी रूपाची ही संघर्षकहाणी. माणसाचं मन हे अमूर्त आणि अनाकलनीय असतं, माणसाचं 'दिसणं' आणि मनाचं 'असणं' हे फार फार क्वचित 'एकत्र' येतं; आणि एकत्र येतं, तेव्हा एक 'अवतारी पुरुष' प्रकट होत असतो - आणि तो तर 'संभवामि युगे युगे' असा असतो; परंतु अशा अवतारी पुरुषाची 'वाट' न पाहता, माणसानं 'माणसा'सारखं विचार करणं आणि जगणं ही एक सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. म्हणूनच मदर तेरेसा म्हणतात : जगातला सर्वांत भयानक रोग कॅन्सर किंवा कुष्ठरोग नाही; परंतु जगात कोणाला माझी गरज नाही, मी कोणाला आवडत नाही आणि कोणालाही माझी पर्वा नाही, अशी भावना मनात निर्माण होणं, ही सर्वांत महाभयंकर व्याधी आहे.'

संस्मरण

केतकरवहिनी

उमा कुलकर्णी

गेल्या शतकाचा पूर्वार्ध. स्त्री-शिक्षणाची सुरुवात. शहरातली एक मुलगी लग्न करून कोकणातल्या एका दुर्गम खेड्यात गेली, उराशी सुंदर संसाराची स्वप्नं बाळगून. कडू-गोड अनुभवांमधून जाताना तिच्या जीवनात वादळ आलं आणि मग सुरू झाला तिचा प्रतिकूल परिस्थितीशी झगडा. त्यातच मिसळली कायद्याची लढाई! ज्या कायद्याच्या लढाईत पतीची हत्या झाली, त्या युद्धभूमीला पाठ न दाखवता यशस्वीपणे लढत-झगडत राहणाऱ्या केतकरवहिनींची कहाणी! गेल्या शतकातील स्त्री-जीवन आणि तिची आंतरिक शक्ती यांचं मनोज्ञ दर्शन घडवणारी वास्तव कहाणी!

उमा कुलकर्णींच्या ओघवत्या शैलीत, त्यांची पहिलीच स्वतंत्र कलाकृती.

('केतकरवहिनी' पुस्तकातून)

मामा नुकतेच गेले होते. दुखवट्याचे दिवस संपले होते. घरी आलेली सगळी माणसं आपापल्या गावी निघून गेली होती.

खटल्यांचं काय करायचं हा तिढा काही सुटत नव्हता. त्याचबरोबर आहे त्या परिस्थितीत मुलांची शिक्षणं, लग्नं आणि जीवन-चरितार्थ चालवायचा असेल तर हातात असलेली शेती हा एकच उपाय आहे, हेही समजत होतं.

पण शेती करायची म्हणजे इथं राहायला पाहिजे. इथली माणसं ओळखून त्यांच्याशी जुळवून घेत आणि प्रसंगी टक्कर देत राहायला पाहिजे.

जुळवून घ्यायचा प्रश्न नव्हता. ते मी लग्न झाल्यापासून करतच होते. त्या वेळी आमच्या घरची पद्धत अशी होती की दाराशी आलेल्या कुळापुढे चहाचा कप ठेवायचा आणि त्याला 'चहाची सवय कशी वाईट, चहाचे किती दुष्परिणाम आहेत, ह्यावर तासभर व्याख्यान द्यायचं आणि 'चहा पी' म्हणून सांगायचं. त्यानंतर चहा पिताना काय चव राहाणार?

मला मात्र हे पटायचं नाही. मला वाटायचं तुम्हाला चहा द्यायचा नसेल तर देऊ नका; पण त्याला इतकं हीन पातळीवर आणून त्यानंतर चहा द्यायचं नाटक करू नका. त्यामुळे मी माझी त्यांच्याबरोबरची वागणूक सरळ ठेवली होती.

प्रसंगी टक्कर देऊन राहाणं हे मला जमेल काय हा खरा प्रश्न होता.

मी एकदा अशाच मन:स्थितीत बसली असता तलाठ्याचा शिपाई आला आणि म्हणाला, ''हं नोटीस घ्या!''

मी घाबरून म्हटलं, ''कसली नोटीस?''

त्यानं हातात दिलेल्या नोटीशीवरून खुलासा झाला. त्याला मामांनी चालवलेल्या केसचा संदर्भ होता.

मामांनी बांद्रे नावाच्या माणसाविरुद्ध खटला भरून त्याच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर कोर्टामार्फत कागदोपत्री कब्जा मिळवला होता. प्रत्यक्ष ताबा घेण्याआधीच मामांचा आजार वाढला आणि ते वारले. दुखवट्याचे दिवस संपण्याआधीच बांद्रेनं पुन्हा डोकं वर काढलं होतं.

घरातल्या वादविवादाची धूळ नुकतीच बसत होती. ठकूताई बहिणींबरोबर निघून गेल्या होत्या. घरात मी एकटीच होते.

नोटीस वाचून मी शिपायाला म्हटलं, ''अरे, असं कसं? ती आमची जमीन आहे. मामांनी तिच्यावर कायद्यानं कब्जा मिळवलाय!''

शिपाई शांतपणे म्हणाला, ''हे मला सांगून काय उपयोग? तुम्हाला जे सांगायचंय ते तिकडं सांगा! आधी ही नोटीस घ्या आणि मला मोकळं करा बघू!''

''नको - नको! मी नाही घ्यायची नोटीस!'' मी घाबरून म्हटलं.

''तुम्ही नको म्हणालात तर मी ती दारावर चिकटवून जाईल. माझं ऐका, नोटीस घ्या.''

घाबरतच मी ती नोटीस घेतली. आता हिचं काय करायचं? थोडा वेळ स्वस्थ बसले. विचार केला आणि चिपळूणला निघाले.

मामांचे बरेच खटले साने वकिलांकडे असतात हे माहीत होतं. त्यामुळे हातात छत्री आणि कापडी पिशवी घेतली आणि त्यांना जाऊन भेटले. त्यांनी नोटीस पाहिली आणि मान वर करून मला विचारलं, ''तुमच्याकडे ॲथॉरिटी आहे काय?''

''म्हणजे काय?''

''अनुमती पत्र. मामांच्या साऱ्या वारसांनी तुम्हाला तसे अधिकार दिले आहेत काय?''

''हो तर! सगळ्यांनी सांगितलंय, यानंतर सगळं तूच बघायचं म्हणून!''

''तोंडी नव्हे. लेखी! काहीही करण्याआधी तुमच्या हातात लेखी अधिकारपत्र हवं. तुम्ही आधी त्याची व्यवस्था करा. तोपर्यंत मी हे थोपवून धरतो.''

मी सारं समजावून घ्यायला सुरुवात केली. मामांच्या माघारी वारस कोण?

वकिलांनी समजावून सांगितलं, ''सत्तावन्नच्या कायद्यांप्रमाणे मुलीही वडिलोपार्जित संपत्तीच्या वारस ठरतात म्हणजे मामांचे वारस दहा मुली आणि दोन मुलगे. त्यातल्या मयत मुलाच्या हिश्शात मी आणि माझी मुलं.

मी मुखत्यारपत्रासाठी तलाठ्यांकडे अर्ज केला. तलाठी म्हणाले,

''वहिनी, मामांच्या माघारी तुम्ही एकंदर सोळा वारस आहात! साधा सातबाराचा उतारा मागायला अर्ज करायचा झाला तरी सोळा जणांच्या सह्या असल्याशिवाय मी तुम्हाला देऊ शकणार नाही!''

मला सगळं प्रकरण कठीणच दिसू लागलं.

तलाठी पुढं विचारू लागले, ''यानंतर सगळं तुम्हीच बघणार ना? इथंच राहाणार ना?''

''हो!'' नकळत मी ठामपणे म्हणाले. मामांच्या प्रश्नाचं खरं उत्तर आता कुठं माझ्या मनानं दिलं होतं. ''सगळे नोकरीधंद्यानिमित्त बाहेरगावीच राहतात.''

''तर मग असं करा, एकत्र कुटुंबप्रमुख म्हणून तुम्ही तुमचं नाव लावून घ्या. जमिनींवर मालकी मात्र ज्याची त्याचीच राहील. जमिनी विकायचा अधिकार प्रत्येकाला राहील.''

तलाठ्यांच्या सूचनेनुसार मी तसा अर्ज केला. तहसीलदारांनी माझी विनंती मान्य केली. इतर पंधराजणांना नोटीशी पाठवण्यात आल्या. त्यांच्यापैकी कुणीही आक्षेप घेतले नाही.

मीच आणखी थोडा विचार करून माझ्या आणि ठकूताईंच्या नावे मुखत्यारपत्र घेतलं; पण ठकूताईंनी लक्ष न घातल्यामुळे पुढच्या काळात सगळीच जबाबदारी माझ्यावर आली. ती पुढची गोष्ट.

माझ्या नावे मुखत्यारपत्र घेतल्यावर मी पुन्हा साने वकिलांकडे येऊन विचारलं, ''आता काय करायचं?''

''जमीन-विक्री मामलेदारांपुढे उत्तर द्यायचं.''

''साहेबांपुढे? काय बोलायचं? कसं बोलायचं? मला तर काहीच समजत नाही!'' माझी गाळण उडाली.

''त्यात काहीही कठीण नाही. तुम्हाला बांद्रेच्या केसची माहिती आहे ना?''

''हो ना! अहो, मामांनी कायदेशीरपणे-'' मी उत्तेजित होऊन सगळं सांगितलं.

''आता तुम्ही मला जे सांगितलंत, तेच मामलेदार साहेबांच्या समोर सांगायचं.''

तरीही मला आत्मविश्वास वाटेना. त्यांनी सांगितलं, ''खरोखरच

यात काहीही कठीण नाही. आपण असं करू या, मी आधी दोन केसेस चालवतो. त्याही तुमच्यासारख्याच आहेत. म्हणजे सत्तर बी खालच्या. कूळ म्हणून नाव दाखल करायच्या. त्यानंतर मी तुमची केस घेईन.''

मी त्यांच्याबरोबर गेले. पहिल्या दोन केसेसमधली प्रश्नोत्तरे लक्ष देऊन ऐकली. फारसं कठीण वाटलं नाही. आपण घरी बोलता बोलता आपला मुद्दा पटवून देतो, तसंच तिथं चाललं होतं. भीती वाटण्यासारखं किंवा दडपण आणण्यासारखं तिथं काहीच नव्हतं. तिथं कुणीच गुन्हेगार नव्हतं. दोन्ही पक्षांनी आपापल्या बाजू मांडल्या, एवढंच.

नंतर साने वकिलांनी जवळ येऊन विचारलं, ''जमेल ना?''

''हो, जमेल!'' मी आत्मविश्वासानं सांगितलं.

त्यानंतर मामलेदार साहेबांनी विचारलं तेव्हा माझी बाजू जशी साने वकिलांना सांगितली होती, तशीच साहेबांना सांगितली.

निकाल आमच्या बाजूनं लागला.

या केसमुळे माझ्या मनावरचं दडपण कमी झालं. मला दुसरीही एक केस आठवू लागली.

मी आपण होऊन साने वकिलांना म्हटलं, ''आमच्या खाजणाच्या जमिनीत तेरा जणांनी आपली नावं कूळ म्हणू लावली आहेत. आपण त्याचं काही करू शकतो का?''

कोकणात खाडीलगतची भरतीच्या वेळी खाऱ्या पाण्यात बुडते ती खाजणाची जमीन.

वकिलांनी विचारलं, ''सात-बाराचा उतारा आहे?''

मला लगेच उत्तर देता आलं नाही. त्यांनी आणखीही काही कागदपत्रांची चौकशी केली. मी घरी येऊन सगळे कागद शोधले आणि त्यांना सांगितलं, ''आहेत.''

''ठीक आहे, करू शकू.''

दावा लावला. या तेरा जणांची नावं चुकीची लावली आहेत, ती कमी करावीत एवढाच माझा मुद्दा होता. इथं फक्त वहिवाटीचा प्रश्न नव्हता. त्या तेराजणांनी अनेक खटपटी-लटपटी करून आपली नावं सातबाराच्या उताऱ्यातही घुसवली होती. ती खोडण्यासाठी जमीनविक्री मामलेदारांसमोर

जावं लागणार होतं.

साने वकिलांनी पुन्हा विचारलं, ''झेपेल ना? तेराजण येणार आहेत!''

''केस अशाच प्रकारची आहे ना?''

''होय.''

''मग मी घाबरणार नाही. मी, माझ्या यजमानांनी किंवा माझ्या सासऱ्यांनी त्यांना जमिनी दिलेल्या नाहीत. तलाठ्यानं काहीतरी गोंधळ केलाय.''

माझा अर्ज साहेबांपुढे आला. अर्जावर खटला चालण्याची तारीख लागली. नोटीस येताच मी ठरलेल्या वेळी कचेरीत हजर झाले. एकेक आत येऊ लागला. तेराही जण हजर झाले. सगळं ऑफिस भरून गेलं.

तिथंही साने वकिलांनी मला एकीकडे घेऊन विचारलं, ''या तेराही जणांना तुम्ही ओळखता ना?''

''हो, ओळखते, पण ते सगळे आपापलं नाव सांगतील ना?''

''होय.''

तेराही जणांनी आपापली नावं सांगून हजेरी दिली. नंतर साहेबांनी मला प्रश्न विचारायला सुरुवात केली. मी माझी बाजू मांडली. साहेबांनी विचारलं, ''तुम्ही म्हणता याला पुरावा काय?''

साने वकिलांच्या सुचनेनुसार मी सातबाराचा उतारा आणि इतर कागदपत्रं सादर केले. नंतर म्हटलं, ''कूळ म्हणजे कोण? जो वहिवाट ठेवून उत्पन्न काढतो आणि जमीनमालकाला खंड देऊन पावती घेऊन जातो तो. या तेराजणांनी कधीही खंड देऊन पावती नेलेली नाही. त्याहून महत्त्वाचं म्हणजे जमीन खाजणाची आहे. त्यात कसलंच उत्पन्न येत नाही. त्यामुळे इथं कूळकायदा लावण्याचा प्रश्न आलाच कुठं?''

माझा युक्तिवाद साहेबांना पटलेला दिसला. मी वळून साने वकिलांकडे पाहिलं. त्यांनीही समाधानानं मान हलवली. त्या तेराजणांची नावं कमी करण्यात आली.

या दोन खटल्यांमुळे माझा आत्मविश्वास वाढला. साने वकिलांनी तो पद्धतशीरपणे वाढवला.

हे दोन माझ्या आयुष्यातील अगदी पहिले खटले. या खटल्यांनी

माझा आत्मविश्वास जसा वाढला, तसाच माझा गावातला दबदबा वाढला असावा, असं वाटतं.

इथं या खटल्यांविषयी मी अगदी थोडक्यात सांगितलं आहे. प्रत्यक्षात खटल्यांची कामं अशी तडकाफडकी होत नसतात, हे सगळ्यानांच ठाऊक असलेलं सत्य आहे.

माझे वकील चिपळूणला राहायचे. त्या वेळी फोन किंवा इतर कुठलीही निरोपाची साधनं नसत. त्यामुळे बारीकसारीक कामांसाठी करंबवण्याहून चिपळूणला जावं लागे आणि अनेकदा फेऱ्या फुकटही जायच्या.

करंबवण्याहून बायकांनी चिपळूणला जायचं म्हणजे पायी जाणं शक्य नव्हतं. घरापासून बंदरापर्यंत दोन-अडीच किलोमीटर पायी जायचं, तिथून लाँचनं गोवळकोटला जायचं. लाँचच्या वेळा भरती-ओहोटीनुसार प्रत्येक दिवशी बदलत असल्यामुळे काम असेल त्याच्या आदल्या दिवशी करंबवण्याहून निघावं लागे. गोवळकोटहून चिपळूणला पायी कामाच्या जागी जावं लागे.

रात्री घराबाहेर राहायचं म्हणजे घरात कुणाला तरी राखणीला ठेवून जावं लागे. त्याचबरोबर चिपळूणलाही मुक्काम करायचा प्रश्न असे. त्या वेळी सुमतीबाई बर्व्यांच्या घरी माझा मुक्काम असायचा. माझं जाणं इतक्या वरचेवर असे की मी तिथं माझं एक लुगडं कायमचं ठेवून दिलं होतं.

सुमतीबाई आणि मधुकाका बर्वेंचं हे घर म्हणजे माझं फार मोठं विश्रांतीस्थान होतं, आजही आहे. मधुकाका तिथल्या शाळेत फारसी भाषा शिकवायचे. हमीद दलवाईही यांचे विद्यार्थी होते. आमच्या घरी वरचेवर येणाऱ्या बजूवहिनींचे हे नातेवाईक. बजूवहिनी मला नेहमी म्हणायच्या, ''अगो, आमच्या सुमतीशी ओळख करून घे हो! अगदी तुझ्यासारखी आहे ती!'' खरोखरच आम्हा दोघींचा स्वभाव जुळला. सुमतीताई सतत समितीच्या कार्यात गढलेल्या असल्या तरी इतरांना शक्य तितकी मदत करणं या दोघांच्या स्वभावाचा एक भागच बनून गेला होता.

अनेकदा डॉ. आबाकाका जोशांच्या घरानंही मला आधार दिला आहे. आबाकाकांचा मुलगा डॉ. सुरेश आणि त्याची पत्नी शैला या दोघांचाही मला नेहमीच आधार वाटत आला आहे.

४थी आवृत्ती



तत्त्वमसि

ध्रुव भट्ट

अनुवाद

अंजनी नरवणे

किंमत : २००/-रु.

पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

परदेशात शिक्षित कथानायक अठरा वर्षांनी भारतात परततो ते अंधश्रद्धा आणि धर्मांधता यांनी ग्रासलेल्या प्रजेला योग्य दिशा दाखवण्याच्या उद्देशाने.

प्रजेतील सुप्त शक्ती शोधून त्याचा समाजाला लाभ मिळवून देण्याच्या प्रयत्नात कथानायकाला आदिवासी प्रदेशात काम करीत असताना अनेक लोक भेटतात. या लोकांच्या संस्कृती, परंपरा इत्यादींचा परिचय करून घेत असताना त्याच्या मनात अनेक प्रश्नांची द्वंद्वे उभी राहतात.

आधुनिक ज्ञानाच्या कसोटीवर घासून पाहताना या संकल्पना त्याला कशा दिसतात?

एकेक खटला वर्षानुवर्षे चालायचा. खटल्याच्या प्रत्येक दिवशी काही रोमांचक घडत नसल्यामुळे खटला सुरू करताना असलेली मन:स्थिती त्यानंतर टिकायचीच असंही नाही. तरीही खटल्यातील मुद्दे लढवावे लागत. शिवाय ज्यांच्याशी खटला सुरू असे, त्यांचं एरवी घरी येणंजाणं असे. अडीनडीला 'वैनी, चार मापटी तांदूळ द्या.' म्हणायला येत, घरात कुणी आजारी असेल तर रुचीपालटासारखी तोंडीलावणं मागायला येत. खटल्याचा आवेश विसरून मला त्यांना मदत करावीच लागे.

त्यांच्याशी बाकी गप्पा व्यवस्थित मारायच्या; पण खटल्याच्या संदर्भात काहीच कबूल करायचं नाही, याचं भान मला ठेवावं लागे; कारण ही मंडळी एकीकडे परिस्थितीने नाडलेली असली तरी काही बाबतीत भलतीच बिलंदर असल्याचा अनुभव मला पदोपदी येत होता.

अनेकदा अनेक वस्त्यांवर माझ्या संदर्भात 'बामणिणीचे दात पाडू', 'अण्णा खोत करू म्हणावं', 'काय समजते ही खोतीण!' या प्रकारचे उद्‌गार निघाल्याचं कानावर येई.

सुरुवातीला हे ऐकून मी घाबरून जाई. सावधगिरी म्हणून काही पावलंही उचलत असे; पण कालांतरानं मलाही काही गोष्टी उमजू लागल्या. खुनाच्या आरोपात अटक करण्यात आलेले अकराही आरोपी आर्थिकदृष्ट्या सामान्य परिस्थितीतले होते. दीड-दोन वर्षं ते पोलिसांच्या ताब्यात होते. शिवाय कोर्टाचा खर्च आणि घर चालवण्यात या साऱ्या वस्त्याही थकून गेल्या होत्या. खटले चालवण्यासाठी त्या वस्त्यांमधून वर्गणी काढली जात होती. आजच्या भाषेत खंडणीच ती! त्यामुळे त्या वस्तीवरची इतर माणसंही जिकीरीला गेली होती.

बदललेल्या वातावरणाशी जुळवून घेताना माझे काही नणंदांशी वाद विवाद झडायचे.

असाच एकदा वादविवाद चालला होता. एक नणंदबाई काहीतरी सूचक टोचून बोलल्या.

मी म्हटलं, ''काही काळजी करू नका! तशीच वेळ आली तर घराजवळच विहीर आहे. तिच्यात उडी मारेन!''

माझा उद्वेग समजावून न घेता त्या म्हणाल्या, ''पण वहिनी, तुला तर पोहायला येतं ना? मग?''

मी म्हटलं, ''पोहायला येत नाही. त्यातूनही चुकून तरंगेन अशी तुम्हाला काळजी वाटत असेल तर गळ्यात दगड बांधून उडी मारेन!'' पण हे म्हणताना त्या क्रूर बोलण्यानं मन पिळवटून गेलं.

यासारखे प्रसंग घरगुती पातळीवर होत राहायचे. त्या वेळी मन कडवट व्हायचं. कधी दु:खानं भरून यायचं. कधी सगळ्याचाच राग यायचा. त्याची प्रतिक्रियाही वागण्यातून व्यक्त व्हायची. या साऱ्यातून मन:स्तापाचे प्रसंगही वेळोवेळी यायचे.

एकदा अपरिहार्यपणे वकिलांच्या घरची पायरी चढावी लागली होती. कारण ते माझ्या हातात नव्हतं. त्यानंतर एकातून एक असे खटले निघू लागले. अनेकदा मलाही काहीतरी कारवाई करणं आवश्यक व्हायचं. त्यामुळे खटल्यांची संख्या आणि क्लिष्टता वाढत चालली होती. त्याचबरोबर माझं कायद्याचं ज्ञानही आपोआपच वाढत चाललं होतं.

मी खटल्यांमध्ये रस घ्यायला आणखी एक कारण माझ्या डोळ्यांसमोर होतं. तापूताई याही मूळच्या करंबवण्याच्याच. बालविधवा. त्यांच्या मालकीची काही जमीन इथं होती; पण बाई अशिक्षित. त्यांच्या कुळांनी त्यांच्या सगळ्या जमिनी काढून घेतल्या. तापूताई बिचाऱ्या गप्प राहिल्या. परिणामी, त्यांची अगदी अन्नान्नदशा झाली होती. त्यांचं दोन वेळचं अन्नही त्यांना इतरांच्या मेहरबानीनं मिळे.

त्यांची आठवण झाली की मला माझ्या आईनं जे थोडंफार शिक्षण दिलं होतं, त्याविषयी कृतज्ञता वाटून येई. जर मी शिकले नसते तर माझीही 'तापूताई' व्हायला वेळ लागला नसता.

आमचे काही नातेवाईक अगदी सुरुवातीपासून 'अण्णा खोतांची मस्ती उतरवतो, त्यांना रेशन आणायला लावतो.' अशी वल्गना करायचे. तेही माझ्या कानांवर आलं होतं. माझा आत्माभिमान डिवचला गेला होता. मी मनातल्या मनात ठरवलं होतं, हे होऊ द्यायचं नाही.

माझा अभिमान कुरवाळण्याची चैन मला परवडत होती. त्याला अतिशय महत्त्वाचं कारण म्हणजे मामांचा आणि यांचा व्यवस्थितपणा.

सुरुवातीला मला आमच्या जमिनी कुठं कुठं आहेत, त्यांच्या चतु:सीमा काय आहेत, तिथं कोण कूळ आहे यातलं काहीही ठाऊक नव्हतं. अशा वेळी मला मामांचं रजिस्टर उपयोगी पडलं.

मामांनी स्वत:च्या सोयीसाठी एक लांब वही तयार करून ठेवली होती. त्यात स्वत:ला ठाऊक असलेला केतकर घराण्याचा इतिहास त्यांनी लिहिला होता. त्यानंतर आमच्या नावावर असलेल्या जमिनींपैकी प्रत्येकीची तपशीलानं माहिती लिहिली होती; त्याचबरोबर कुळाचं नावही. मुख्य म्हणजे त्यात त्यांनी जमिनींचे जुने नंबर आणि नव्या मोजणीनंतर दिले गेलेले नवे नंबर यांचीही नोंद केलेली आहे. नंतरच्या काळात झालेल्या बदलानुसार मीही त्यावर तिसऱ्या नंबरची नोंद करू लागले. त्यामुळे मला प्रत्यक्ष जमिनी डोळ्यांनी न पाहतादेखील त्यांची माहिती झाली.

यांना पहिल्यापासूनच स्मरणवही लिहायची सवय होती. त्याचे गठ्ठे त्यांनी स्वत: आणि त्यानंतर मामांनी जपून ठेवले होते. त्यात प्रत्येक खटल्याची पार्श्वभूमी आणि त्या त्या वेळची परिस्थिती याविषयी लिहून ठेवलेले होते. त्या तपशीलाचीही मला मदत होत होती.

या स्मरणवह्या वाचत बसणं हा माझा त्यानंतरच्या जीवनात फार मोठा विरंगुळा होता. सुरुवातीला त्या वाचताना मी भावनांमध्ये बुडून जात असे. कालांतरानं मी त्यांच्याकडे चिकित्सक दृष्टीनं पाहू लागले.

अनेकदा अलिप्ततेनं आणि चिकित्सकपणे मी त्यांची पारायणे केली. काही ठिकाणी खूप बारकाईनं विचार केला. पुन्हा पुन्हा वाचत राहिले. त्यानंतर माझं एक मत झालं, या दोघांनी कुणावरही कायदा हातात घेऊन अन्याय केलेला नाही. शेती हा त्यांचा एकमेव व्यवसाय होता. तो राखण्यासाठी ते कायदेशीर मार्गानं लढले. त्यांनी हा लढा दिला नसता तर कोकणातल्या अनेक खोतांप्रमाणे आणि जमीन-मालकांप्रमाणे त्यांनाही गाव सोडून बाहेर पडावं लागलं असतं आणि पोट भरण्यासाठी इतर मार्ग अवलंबावे लागले असते.

मी जेव्हा एकटी शेती बघू लागले, तेव्हाही त्यात या अर्थानं काहीच बदल झाला नव्हता. त्यामुळे या गावात मानानं राहायचं असेल तर मलाही त्या दोघांप्रमाणे कायद्याची लढाई लढतच राहावं लागणार होतं.

माझी इच्छा असो वा नसो, मामांच्या काळापासून चालत आलेले

खटले मला चालवावे लागले. एकातून दुसरा, दुसऱ्यातून तिसरा असं काही तरी निघत गेलं. त्यातल्या काही केसेस तहसीलदारांपुढे, काही प्रांतसाहेबांपुढे चालत. काही खटले टेनन्सीचे, काही दिवाणी तर काही फौजदारीही असत.

मधूनच अनेकदा गावातलं वातावरण तंग व्हायचं आणि अप्रत्यक्षरित्या माझ्या कानावर येतील, अशा प्रकारे खुनाच्या धमक्या पाठवल्या जात.

अगदी पहिल्यांदा अशी धमकी कानांवर आली तेव्हा मी सावध झाले. घरात एका खुनाची घटना घडली होती, शिवाय मामांना मारायला पत्र्यावरून एक माणूस चढून आला होता. त्यामुळे मला असल्या धमक्यांकडे कानाडोळा करणं परवडणारं नव्हतं.

अशाच एका प्रसंगी मी चिपळूणच्या बर्वेंकडे विषय काढला, म्हटलं, ''काय करावं कळत नाही, एकदा वाटतं या संदर्भात पोलिसांना सांगावं काय?''

मधुकाकाही विचारात पडले. थोड्या वेळानं ते म्हणाले, ''तेच योग्य ठरेल. खान नावाचे नवे पोलीस अधिकारी आले आहेत.''

''मलाही ते ठाऊक आहे. पण मुसलमान माणूस!''

''तो काही प्रश्न यायचा नाही. मी आधी त्यांच्याशी भेटून बोलतो. नंतर तुम्ही भेटा.''

त्याप्रमाणे त्यांनी खानसाहेबांना भेटून सांगितलं, ''माझ्या मानलेल्या बहिणीचं तुमच्याकडे काम आहे. अर्ज द्यायचा आहे.''

इन्स्पेक्टर खानसाहेब म्हणाले, ''तुमची बहीण? मग आजचं काम संपलं की मीच तुमच्या घरी येईन. पोलीस स्टेशन ही काही सभ्य बायकांनी येण्याची जागा नव्हे!''

ते बर्व्यांच्या घरी आले. अर्ज देताना माझ्या भावना अनावर होऊन डोळ्यांत पाणी आलं. ते पाहून खानसाहेब म्हणाले,

''आता ते डोळे पुसा. यानंतर आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. तुम्ही काहीही काळजी करू नका.''

खानसाहेब शब्दाला जगले. ते स्वत: असेपर्यंत त्यांनी मला मदत केली.

खानसाहेबांची बदली होऊन तिथं कुणी हिंदूराव पाटील नावाचे इन्स्पेक्टर येणार असं समजलं. मला पुन्हा काळजी वाटू लागली. मी मधूकाकांबरोबर त्यांना भेटायला गेले. हिंदूराव पाटील स्वत:ची मोटारसायकल पुसत होते.

त्यांनी मला ओळखलं आणि सांगितलं, ''शेखसाहेबांनी तुमच्या नावापुढे खूण करून ठेवली आहे. आमचं तुमच्याकडे लक्ष राहील; पण एक आहे. मला तुमच्या गावी येऊन इतर गावकऱ्यांना भेटावं लागेल. तुम्हाला भीती नाही ना वाटणार?''

''अवश्य या. ते बरंच होईल. आणि भीती कसली? मी आपणहोऊन तक्रार घेऊन तुमच्याकडे आलेय ना!''

ते प्रसन्न मुद्रेनं म्हणाले, ''हे चांगलं आहे! नाही तर काही माणसं आधी तक्रार करतात. आम्ही त्यानुसार आमच्या पद्धतीनं पुढं निघालो की माघार घेतात. आमची पंचाईत करतात!''

त्याप्रमाणे ते गावात चौकशीला आले. लाड्या पवारनं आपल्या मिल्ट्रीत नोकरी करणाऱ्या मुलाला मुद्दाम युनिफॉर्म घालून पुढं आणलं होतं. तोही रुबाबात आला आणि सलाम ठोकून उभा राहिला.

हिंदूरावांनी एकदा त्याच्याकडे नीट पाहिलं आणि बजावलं, ''तुला नीट नोकरी करायची आहे ना? मग मुकाट्यानं बैस! उगाच गावच्या राजकारणात शिरू नकोस. फुकट नोकरी गमावून बसशील!''

त्या सैनिकाचा रुबाब झर्रकन उतरला.

थोडक्यात सांगायचं तर हिंदूराव पाटलांची कामाची पद्धत माझ्या कामाच्या पद्धतीशी जुळली. बदली होऊन जाताना तेही पुढच्या इन्स्पेक्टरला सांगून गेले. पुढे ती पद्धतच झाली.

पोलिसांकडे अर्ज देताना मला न चुकता पतीच्या खुनाचा आणि सासऱ्यांच्या मारेकऱ्याचा उल्लेख करावाच लागायचा. मला अनेकदा ते नको वाटे; पण पोलीसच तो मुद्दा सुचवत आणि म्हणत, ''तो मुद्दा असेल तर आम्हालाही ॲक्शन घ्यायला सोपी जाते.''

खानसाहेब म्हणाले होते, पोलीस स्टेशन ही सभ्य बायकांनी येण्याची जागा नव्हे; पण मला आयुष्यात अनेकदा पोलीस स्टेशनवर

२री आवृत्ती

हितगूज

तणावयुगातील तरुण पिढीशी

अंजनी नरवणे



किंमत : १२०/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

टेन्शन! तणाव!
आजच्या युगाचे हे
अगदी परवलीचे शब्द.
छोट्यांपासून मोठ्यांपर्यंत,
शहरापासून खेड्यापर्यंत
'टेन्शन' हा शब्द
ज्याच्या त्याच्या तोंडी सतत असतो.

आजच्या तरुण पिढीचं जीवन तर
धावत्या प्रवाहासारखं आहे.
हा प्रवाह सतत वाहतो आहे,
थांबणं त्याला माहीतच नाही.
मग त्यातून कुटुंब, शिक्षण, व्यवसाय
या सर्वच ठिकाणी जाणवणारा ताण!

हा ताण कमी करून
तरुण पिढीचं जगणं सुकर करण्यासाठी, 'हितगूज - तणावयुगातील तरुण पिढीशी'

जायची वेळ आली. त्या अनुभवावरून मला वाटतं, खानसाहेबांचं म्हणणं पूर्णपणे खरं नाही. मला पोलीस खात्यानं नेहमीच चांगला अनुभव दिला आहे.

माझ्या कोर्टकचेरीच्या आणि पोलीस स्टेशनच्या चकरा होत. कचेऱ्यांमध्ये आणि कोर्टातही मला व्यवस्थित वागणूक मिळत होती. तिथल्या लोकांना एक स्त्री येते याचं कौतुकही असायचं. त्या वेळी बायका असल्या कामासाठी फारशा येत नसल्यामुळे ते आदरानं माझ्याशी वागत. वाईट वागणूक अशी फार, म्हणजे फारच कमी वेळा मिळाली.

तरीही माझे हे फेरे पाहून काहीजणांना बरं वाटत नसे. एकदा कुणी तरी साने वकिलांना - पुढे मी त्यांना सानेदादा म्हणू लागले - म्हणालं, ''ही कसली बाई म्हणायची! हिचे यजमान कोर्टकचेरी करता करता गेले! तरी ही बाई शहाणपणा शिकत नाही. हातात छत्री आणि पिशवी घेऊन सारखे खेटे घालते!''

यावर सानेदादांनी परस्पर उत्तर दिलं, ''ती नाही, तिचं नशीब तिला खेटे घालायला लावतंय!''

खरं होतं ते. एखादा आपलं नाव बळेच कूळ म्हणून लावे आणि जमिनीवर हक्क बजावू पाहे. कुणी जमीन आपल्या वहिवाटीखाली आहे असं दाखवून जमीन गिळंकृत करू पाहे. एखादं कूळ निपुत्रिक मरण पावलं तर खोत-निसबत कायद्याखाली जमीन पुन्हा जमीनमालकाकडे येते, तिकडे लक्ष ठेवून जमिनीचा ताबा घेऊन दुसरं कुळ नेमावं लागे. अशा अनेक कारणांसाठी खटले चालत. एकेक खटला अनेक वर्षे चाले.

त्यातला एक खटला असा होता.

एकदा अशीच घराभोवती कसवात फिरत होते. मध्येच लक्ष गेलं आणि आणखी व्यवस्थित पाहिलं. कुणीतरी कसवाला लागून असलेल्या झाडावरचा फणस चोरून नेला होता. ही तर इथली नेहमीच घडणारी घटना. मीही नेहमीप्रमाणे ''कुणी नेलाय फणस? काय माणसं आहेत!'' वगैरे बडबड करत ते पाहात असताना पलीकडच्या वाटेनं चाललेल्या पांडुरंग शिगवणनं जाता जाता सहज विचारलं, ''काय बगताय, वैनी?''

मीही मनातली मळमळ व्यक्त करत म्हटलं, ''अरे, बघ ना! कुणीतरी फणस काढून नेलाय!''

जाता जाता तोही म्हणाला, ''काय बुवा माणसं ही! आपलं नाही ते

कशाला घ्यायचं?''

हे मला खटकलं. तोच धागा पकडून मी संभाषण वाढवलं, ''अरे, पांडू! तुलाही मी हेच सांगते ना? समजुतीनं प्रश्न मिटवला तर दोघांचाही फायदा आहे. समजुतीनं घेण्यात खरं तर माझं नुकसानच आहे, तरीही तुला सांगतेय. अरे, माणसाला एवढं चिडवू नये रे!''

यावर तो म्हणाला, ''वैनी, तुम्ही म्हणता ते पटतंय बघा! पण यायला वेळच नाही!'' आणि निघून गेला.

हा पांडुरंग शिगवण अतिशय गोडबोल्या आणि अत्यंत बनेल माणूस! वरल्या तळाकडच्या जमिनीवर त्याचा ताबा होता.

एकोणपन्नास सालची गोष्ट. ठरल्याप्रमाणे पांडू आपल्या वडिलांसह - सोनूसह खंड भरण्यासाठी भात घेऊन आला होता. तो खंड सत्तेचाळीस-अठ्ठेचाळीस सालचा की अठ्ठेचाळीस-एकोणपन्नास सालचा यावरून हे, मामा आणि सोनू यांच्यामध्ये वाद झाला. सोनूनं कांडपाच्या अंगणाच्या फलाटावर भाताचे गोण आणून लावले होते. मोजायचं तेवढं शिल्लक राहिलं होतं. वाद सुरू झाल्यावर सोनू उठला आणि फलाटावरच्या भाताच्या गोण्या घेऊन निघून गेला. त्याच सुमारास संरक्षित कूळकायदा आला आणि सोनूनं खंड देणं बंद केलं.

मामांनी त्या जमिनीचा ताबा मिळावा म्हणून त्याच्यावर खटला भरला. त्यानं तीन-तीन वर्षं खंड न भरल्यामुळे मामांचा मार्ग फारसा कठीण नव्हता. त्यातच खोत-निसबत कायदा आला. त्यामुळे तर सोनूच्या नावाचा प्रश्न उपस्थित होऊन जमिनीवर मामांचा रीतसरच हक्क आला. जमीन आमच्या वहिवाटीला लागली. आणखीही किरकोळ अडचणी आल्या. त्यावर मात करत मामांनी त्या जमिनीवर हक्क मिळवला.

पण पांडूनं आपली तिथली वहिवाट सोडली नाही. उलट ट्रॉब्युनलकडे अपील केलं. अपील नामंजूर करण्यात आलं. तोही कागद मामांच्या हाती होता. तरीही त्यानं वहिवाट सोडली नाही.

मामांचं आजारपण वाढलं, तसं पांडूचं अधिकच फावलं. मामांनी तडजोडीसाठी निरोप पाठवलं. अनेकदा निरोप पाठवूनही तो आला नाही. उलट निरोप पाठवला, ''तुम्ही स्वत: नांगर धरायला या. म्हणजे मी बाजूला होईन.''

शेवटी नाईलाज झाला तेव्हा मामांनी त्याच्यावर फौजदारी केली. तिथं त्याला पंधरा दिवस सक्त मजुरी भोगावी लागली.

सुटून आल्यावर महाशयांची पुन्हा वहिवाट सुरूच!

मामा वारल्यावर मी खटले बघू लागले, त्या वेळी मीही त्याला अनेकदा निरोप पाठवले, ''अरे, एकदा येऊन जा! त्या जमिनीचं एकदाचं मिटवून टाकू.''

यावरही तो म्हणायचा, ''नाय बा! इथं वेळ कुणाला आहे?''

हाच पांडुरंग शिगवण फणसाच्या संदर्भात म्हणत होता, जे आपलं नाही ते कशाला घ्यायचं?

अखेर वैतागून मी वकिलांना म्हटलं, ''अगदी डोकं पिकवलंय यानं! काय करायचं याचं?''

''हक्क शाबिती आणि नुकसानभरपाई!'' वकिलांनी सल्ला दिला. त्याचबरोबर एक शंका उपस्थित केली, ''मागचा निकाल लागून किती वर्षं झाली? बारा वर्षं होऊन गेली असतील तर सगळंच नियमबाह्य होईल.''

घरी परतले. सगळे जुने कागद काढून पाहिले. सुदैवानं बारा वर्षं भरली नव्हती. मधल्या अवधीत शोभा आणि चतुरेची लग्नं झाली होती आणि मला शोभाच्या बाळंतपणासाठी पुण्याला जायचं होतं. अखेर दावा लावला आणि पुण्याला गेले. तारीख लागली तेव्हा वकिलांना कळवलं, ''जमणार नाही, शोभाचे दिवस भरत आलेत.'' पुढची तारीख लागली तेव्हा मात्र पुण्याहून परस्पर चिपळूणला कोर्टात हजर झाले.

मी गावात नसल्याचं ठाऊक असल्यामुळे पांडुरंग खुषीत कोर्टात शिरला. एकतर्फी निकाल होईल अशी त्याला आशा होती. मला पाहाताच त्याचा चेहरा उतरला. तसाच माझ्याजवळ येऊन म्हणाला, ''वयनीनूं, आलात कधी? माझं काम होतं तुमच्याकडे!''

''काय काम रे? आता केस चालेल आणि होईल तुझं काम!''

''तसं नाय, वयनी! तुमी मोप निरोप धाडले; पण मलाच नाय येळ झाला. आपल्याला केस चालवायची नाय!''

''तुला नसेल रे, पण मला चालवायची आहे!''

''माझा एक विचार होता, आपण समजुतीनं घ्यावं. बाहेरच मिटवावं.''

''खरं सांगू का? आता वेळ गेली आहे. साडेअकरा वर्षं थांबले मी.

आता सगळं तुझ्या आणि माझ्या वकिलांच्या हातात गेलंय. त्यांचा समेट झाला तरच काहीतरी मार्ग निघू शकेल; पण मला मिटवायचं नाही. तेवढ्यासाठी मुद्दाम पुण्याहून आलेय मी!''

''तुम्ही तुमच्या वकिलांना सांगा ना!''

''नाही. मी तर पुण्याहून खटला चालवायलाच आलेय. तारीख घ्यायला नव्हे. तुझ्या वकिलांना सांग काही जमलं तर करायला!''

त्यानं आणि त्याच्या वकिलानं खटपट करून पुढची तारीख मिळवली. मधल्या अवधीत तो सानेदादांना भेटला, मला भेटला, अखेर तडजोड करायची ठरली.

तडजोडीच्या दिवशी मी एकटीच निघाले. कृष्णा हा गावचा पोलीसपाटील. तो माझ्याबरोबर यायला तयार होता; पण मीच म्हटलं, ''तुला तरी कशाला उगाच फेऱ्या.''

सानेदादांनी सुरुवात केली, ''उगाच कशाला तडजोडीला तयार होता? निकाल लागू दे. कदाचित तुम्हाला जमीन फुकटच मिळून जाईल!''

पण एव्हाना पांडूला परिस्थितीची कल्पना आली होती.

सानेदादांनी प्रस्ताव मांडला, ''तुमच्या ताब्यात असलेली सगळी जमीन घेता का? दहा एकर जमीन दहा हजारात देतो.''

''नको. खटला चाललाय तेवढीच घेतो. सगळी झेपणार नाही.''

''सहा हजार पडतील.''

तो आणि त्याच्यासोबत आलेला धाकट्या सन्नाक बाहेर जाऊन आपसात बोलून आले. आत येऊन पांडू म्हणाला, ''पंधराशे देईन.''
तडजोड मोडली.

ठरलेल्या तारखेला केस उभी राहिली. खरं सांगायचं तर पांडूच्या वकिलानं त्याच्या अज्ञानाचा फायदा घेतला होता. पांडूकडे असलेल्या कुठल्याशा कागदाला 'महत्त्वाचा कागद' म्हणत त्याला अज्ञानात ठेवलं होतं. त्यामुळेच तो तडजोडीच्या वेळी मस्तीत वावरला होता.

केस उभी राहिली. त्याचा वकील बरीच नाटकं करत होता. उगाच कुणाला तरी खुणाव, कुणाच्या कानात कुजबूज कर, तिसऱ्याला बोलावून घे- थोडक्यात केस बाईंच्या विरोधात जाणार अशी खात्री असल्यासारखं वातावरण तयार करत होता; पण मला संपूर्ण खटला ठाऊक असल्यामुळे मी त्याची नाटकं बघत बसले होते. माझ्या जबानीच्या वेळीही स्पष्ट शब्दांत

माझी बाजू मांडली.

पांडू पुन्हापुन्हा वहिवाटीविषयी सांगू लागला तेव्हा सानेदादांनी त्याला जामलं, ''ती दांडगाईची वहिवाट आहे. त्यासाठी तू शिक्षाही भोगून आला आहेस. त्या बाईमाणूस असल्याचा तू गैरफायदा घेतला आहेस!''

अखेर ताबा मिळाला. जप्ती नेऊन ताबा घ्यावा लागला.

तीन वर्षांची नुकसानभरपाईही बरीच होती. कमी करण्यासाठी पांडूनं कृष्णाला मध्ये घातलं.

कृष्णा हा गावचा पोलीसपाटील. मी त्याला तो अगदी लहान पोर असल्यापासून ओळखते. ज्याच्यावर शंभर टक्के विसंबून राहावं असा तो माझा उजवा हात. त्यामुळे त्याच्या मध्यस्थीनं सूट मिळेल असा पांडूला विश्वास होता.

कृष्णाही अतिशय कनवाळू. अनेकांना मदत करण्यासाठी तो नेहमीच पुढं असायचा. त्याच्या शब्दाखातर मीही अनेकांना मदत करायची. अर्थात त्यांच्या गरजाही किरकोळ पैसे किंवा धान्य अशाच प्रकारच्या असायच्या.

पण या वेळी मी कृष्णाला म्हटलं, ''अरे, मी फक्त तीन वर्षांची नुकसानभरपाई मागतेय. हा इतकी वर्षं भात खातोय! त्याला सगळी भरपाई द्यायला सांग. तिथं देईन हवी तितकी सूट!''

कृष्णालाही सगळी केस ठाऊक असल्यामुळे तोही निरुपायानं हसू लागला. मी पांडूलाही म्हटलं, ''अरे, सगळे खोत दुष्ट नसतात. मामा तुला सांगत होते, मी सांगत होते. तेव्हाच समझोत्याला आला असतास तर जमीन तुलाच राहिली नसती काय?''

याच पांडुरंगानं अंतुलेंच्या राज्यात पुन्हा रंग दाखवायला सुरुवात केली. अंतुलेंनी घोषणा केली होती, ज्यांच्या पूर्ण हक्काच्या जमिनी खोतांकडे गेल्या आहेत, त्यांनी दाद मागावी.

पांडुरंगनं पुन्हा केस केली. मला नोटीस आली. मी वैतागले. त्या वेळी गांधी नावाचे मामलेदार होते. त्यांना भेटून म्हटलं, ''या जमिनीपायी काय काय केलंय ठाऊक आहे ना? आणखी किती वर्षं चालणार हे?''

''सगळे कागद आणलेत ना?''

''होय. पण किती वर्षं हे कागद सांभाळू? यानंतर पुन्हा नोटीस आली तर वेगळ्या मार्गानं बघावं लागेल!''

२री आवृत्ती

रामायणातील पात्रचंदना

दिनकर जोषी

अनुवाद

अंजनी नरवणे



किंमत : २२०/-रु.

पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

आपण सर्वच जण लहानपणापासून रामायणातील गोष्टी ऐकत मोठे झालो. आजही कॉमिक्स, पुस्तकं, टीव्ही, चित्रपट या सगळ्या माध्यमांमधून आपण लहान-थोर सगळेच रामकथा बघत, वाचत असतो.

फार थोड्यांना माहीत असेल की, भारतातील भाषांमध्ये व वेगवेगळ्या देशांमध्ये मिळून तीनशेच्या वर लहान-मोठी रामायणं लिहिली गेली आहेत. बौद्ध, जैन, मुस्लिम रामायणंही आहेत! अर्थात मूळ अधिकृत ग्रंथ महर्षी वाल्मिकी लिखितच. बऱ्याचजणांना हे वाचूनही आश्चर्य वाटेल की वाल्मिकी रामायणाप्रमाणे श्रावणबाळाची कथा वेगळी आहे. जनक राजानं सीतेचं स्वयंवर मांडलंच नव्हतं, रावण अत्यंत विद्वान व धार्मिक शिवभक्त होता आणि कुबेराचा सावत्र भाऊ होता, लक्ष्मणानं 'लक्ष्मणरेषा' काढलीच नव्हती!

आणि मुख्य म्हणजे रामायणातल्या महत्त्वाच्या व्यक्तींचे स्वभाव, गुण-दोष, कोणत्या घटनेत कोण कसं आणि का वागलं, विरोधाभास कोणते, या सर्वांचा आपण किती विचार करतो? या पुस्तकात तटस्थ भूमिकेतून, सर्वांबद्दल संपूर्ण आदर बाळगूनही सर्व व्यक्ती व घटनांचं सुंदर विश्लेषण केलं आहे. ते वाचून, त्यावर विचार करून आपण केवळ अंधश्रद्धाळू न राहता डोळस आणि सश्रद्ध बनू शकतो.

आपल्या संस्कृतीची भागीरथी असं रामचरित्र नव्यानं समजून घेऊया!

म्हणाले इतकंच. प्रत्यक्षात काय करू शकणार होते मी?

अखेर, यांच्या हयातीत सुरू झालेलं प्रकरण अंतुलेंच्या राज्यानंतरही तीन वर्षं चाललं. अखेर निकाल माझ्या बाजूनं लागला. मी ढोलकऱ्याला निरोप पाठवला. त्या जमिनीवर प्रत्यक्ष गेले आणि गावकऱ्यांना समजावं म्हणून ढोल वाजवून जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेतला.

यानंतरही बारीकसारीक बाबतीत हा पांडू तापदायक व्हायचा. नंतरच्या काळात मात्र त्याची काही अडचणींच्या प्रसंगी मदत मिळवण्यात मला यश मिळालं.

अशा प्रकारे एकेक खटला वर्षानुवर्षे चालायचा, आजही चालतो. त्याच वेळी माझ्या आयुष्यात इतरही घटना घडत होत्या. एकीकडे मुलांच्या जबाबदाऱ्याही पार पाडल्या जात होत्या.

आई आजारी असताना खेडचे एक लांबचे दीर त्यांना बघायला आले होते. त्या वेळी चतुरा घरातच वावरत होती. दिरांनी तिच्यासाठी आपल्या गावचं एक ठिकाण सुचवलं. ठिकाण उत्तम होतं. घरची शेतीवाडी होती. मुलगा ॲग्रिकल्चरचा बी. एस्सी. होता.

यावर तिथं असलेली एक नणंद पटकन म्हणाली, ''बघा हं! वहिनीला कोकणातला जावई पसंत पडेल की नाही ते!''

त्याआधी कधी जावई कसा हवा यावर स्पष्टपणे बोलण्याचा प्रसंग आला नसला तरी त्यांना माझे विचार समजले होते. कोकणातल्या खडतर जीवनाचा आणि माणसांचा अनुभव मी घेत होते. त्यामुळे ठिकाण उत्तम आहे हे पटलं असलं तरी मी नुसतंच 'हं हं' केलं. त्यांनी स्पष्ट शब्दात विचारलं तेव्हा म्हटलं, ''एवढ्यात काही तिच्या लग्नाचा विचार नाही. नंतर पाहाता येईल.''

मामांच्या मृत्यूनंतर मात्र मी चतुरेचं लग्न करायचं ठरवलं. नणंदांनाही सांगून ठेवलं.

रत्नागिरीच्या मालतीबाई जोशींच्या नात्यातला एक मुलगा लग्नाचा असल्याचं समजलं. चतुरा त्या घरी पसंत पडेल असा त्यांना विश्वासही वाटला. हे कुटुंब बडोद्याला होतं. मुलाला 'बँक ऑफ बडोदा'मध्ये नोकरी होती. मालतीबाईंकडून चतुरेची पत्रिका पाठवून दिली; पण त्यांच्याकडून

काहीच समजलं नाही.

नंतर समजलं, जोशांनी मुलीची आणि तिच्या घराण्याची चौकशी केली. कुणीतरी त्यांना सांगितलं, ''मुलीला वडील नाहीत. तिचं माघारपण कोण करणार? अर्थातच हे त्यांना पटलं नाही. त्यांनी आणखी चौकशी केली तेव्हा त्यांना कुणीतरी सांगितलं. ''मुलीच्या आत्यांची काही चांगली ख्याती नाही. त्यात ही मुलगी तर त्यांच्या घरीच वाढलीय म्हणता!''

पण त्यांचा विश्वास असलेल्या एका बाईंनी त्यांना पत्र लिहून कळवलं, ''माझं ऐकाल तर या मुलीला हातची जाऊ देऊ नका. मी या मुलीला जवळून पाहिली आहे. ती तुमच्या घरचं सोनं करेल!''

यावर त्यांनी विश्वास ठेवला आणि पुढच्या गोष्टी सुरू झाल्या. लग्न ठरवायचं, मुलगी दाखवायची, मुलगा बघायचा ह्याची जबाबदारी मी नणंदांवरच सोपवली. त्या चतुरेला बडोद्याला घेऊन गेल्या आणि लग्न ठरवून आल्या. लग्न बडोद्यालाच करायचं ठरलं. कारण पाहुणे तिथले. आपण चार हजार रुपये द्यायचे, लग्न तेच करून घेतील असं त्या ठरवून आल्या.

सगळं ठरलं. मी मुलाला पाहिलं नव्हतं. त्यामुळे एकीकडे उत्सुकता होती. लग्न ठरवून चतुरा घरी आली तेव्हा मी तिला विचारलं, ''कसा आहे गं मुलगा?''

ती काही बोलली नाही.

''का? तुला आवडला नाही?''

''तू तरी किती बघशील, वहिनी? जमणार आहे का तुला?''

''जमेल ना! तुला आवडला नसेल तर तसं स्पष्ट सांग. आपण नको म्हणून सांगू.''

यावर मात्र ती म्हणाली, ''तसं काही करू नकोस!''

लग्न ठरलं तेव्हा बँकेत चार हजार रुपये होते. त्यात मला चारही मुलांच्या सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडायच्या होत्या! शिवाय तिन्ही मुलींच्या नावानं ठेवलेलं पाच पाच तोळे सोनं होतं.

लग्न ठरल्यावर माझ्या नणंदा आमच्या ओळखीच्या आणि नात्यातल्या माणसांकडे जाऊन सांगू लागल्या, ''अण्णाच्या मुलीचं लग्न ठरलंय. आम्ही वर्गणी काढून ते करणार आहे.''

हे चतुरेच्या कानांवर येताच तिला रडूच फुटलं. ती घरी येऊन

विचारू लागली, ''वहिनी, माझ्या लग्नासाठी वर्गणी काढावी लागेल का गं? अण्णांचं काहीच नाही का?''

तिचं बोलणं मला जिव्हारी लागलं. तिची समजूत काढत मी तिला म्हटलं, ''तू काळजी करू नकोस. मी आहे ना? मी पाहीन सारं!''

सगळी तयारी करून घेऊन मी मोठमोठ्या सतरा बोज्यांबरोबर मुंबईला गेले. तिथून इतर नणंदांबरोबर बडोद्याला जायचं ठरलं होतं.

वऱ्हाड निघायच्या आदले दिवशीची गोष्ट.

''हे बघ वहिनी, चतुरेच्या घरी तिची आजेसासू आहे. ती जुन्यातली बाई आहे. लग्नघरात तू कपाळाला कुंकू लावायचं नाहीस.''

''का?''

''का म्हणजे? आपला अण्णा कुठं आहे? आपल्या मुलीला तेवढ्यावरून सासरी त्रास व्हायला नको!''

मी त्यांचं सगळं ऐकून घेतलं आणि सांगितलं, ''ठीक आहे, लीलाताई पागे लग्नाच्या मध्यस्थ आहेत ना? त्यांना विचारेन. त्या सांगतील तशी वागेन.''

लीलाताईंना सारं सांगून विचारलं, त्यांची पहिली प्रतिक्रिया आश्चर्याची होती. त्या म्हणाल्या, ''असं म्हणाल्या त्या? तुम्ही तसं काही करू नका बरं का! नीट कुंकू लावून मंडपात वावरा. ती माणसं तशी नाहीत.''

ठरल्याप्रमाणे आमचं वऱ्हाड बडोद्याला निघालं. मी कपाळावर कुंकू लावूनच होते. त्या मंडळींनाही त्याचं काही वाटलेलं दिसलं नाही.

सीमांत पूजेची तयारी चालली होती. मी गॅलरीतून पाहात होते. नवऱ्यामुलाला पाहाण्याची खूप उत्सुकता होती. खाली लग्नाचं उत्साहाचं वातावरण होतं. बरीच माणसं जमली होती. अनेक तरुण मुलंही होती. त्यातला नवरा-मुलगा कोण असेल ते समजत नव्हतं.

तोच कुणीतरी घाईघाईनं आलं आणि एका तरुणाला मुंडावळ्या बांधू लागलं. तोच नवरा-मुलगा होता.

नवऱ्यामुलाला पाहून मला धक्काच बसला. मुलाची नोकरी चांगली होती. घरदार होतं, माणसं उत्तम होती; पण मुलगा बारीक होता. बारीक म्हणजे अतिशय बारीक. मला तर वाटलं, याला एखादा रोग तर

नसेल ना?

न राहावून मी शेजारी उभ्या असलेल्या ताईंना म्हटलं, "किती हो बारीक आहे मुलगा!"

त्या लगोलग सुधाताईंना हाक मारू लागल्या. त्यांना आवरत मी म्हटलं, "आता हे वाढवायला नको. मला काही लग्न मोडायचं नाही; पण तुम्ही सगळ्यांनी मुलगा पाहिला होता ना?"

जोशांकडच्यांनी लग्न फारच छान आयोजित केलं होतं. जणू काही आम्हीच मुलाकडचे पाहुणे होतो! पण लग्नघरात माझं मन अस्वस्थ होतं. मुलीचं लग्न, माझ्या जबाबदारीनं करायचं पहिलं कार्य या गोष्टी तर होत्याच.

मला एवढं वाईट वाटलं, कारण त्याक्षणी मला कितीतरी गोष्टी आठवल्या. माझे वडील भर तारुण्यात गेले आणि माझ्या आईला पुढचं खूप मोठं आयुष्य एकटीला काढावं लागलं. हे असेच तरुणपणी गेले आणि मला एकटीला मुलाबाळांचं करत राहावं लागलं. आता माझ्या मुलीवर तर अशी वेळ येणार नाही ना!

पण सुदैवानं माझी ती भीती संपूर्णपणे काल्पनिक ठरली. चतुरेचे यजमान चंदूभाऊ यांची प्रकृती लग्नानंतर झपाट्यानं सुधारत गेली. आता ते दोघं आपल्या नातवंडांमध्ये चांगलेच रमले आहेत.

◆

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

फेसबुक प्रतिक्रिया

राजा रवि वर्मा

चित्रकार राजा रवि वर्मा यांच्यावर आहे हे पुस्तक. छान कांदबरी आहे. इंग्रजांचा काळ, चित्रकाराचे खासगी जीवन, कलाकाराला सामाजिक मान्यता मिळताना होणारा सामाजिक त्रास. खूप छान वर्णन आहे.

- सागर झेपाले

संस्मरण

संस्कार

यू. आर. अनंतमूर्ती

अनुवाद

रं. शा. लोकापूर

वि. ग. कानिटकर

जेवणच झालेलं नसल्यामुळे गरम गरम आमटी-भात ओरपावा, अशी तीव्र इच्छा आचार्यांच्या मनात निर्माण झाली होतीच. दुसऱ्याच क्षणी त्यांना आठवलं की आपल्याला सुतक आहे! देवस्थानात जाऊन जेवायचं नाही. ओवळं झालं तर रथ पुढे सरकत नाही म्हणतात. पण गणपतीच्या तळ्यातले मासे नारणप्पा धरत नव्हता का? त्याला काय झालं? ब्राह्मणधर्माचा संपूर्ण धिक्कार करण्याचं धैर्य आपल्या अंगी नाही, हे आचार्यांना पहिल्यांदा जाणवलं. मग असं असेल तर चंद्रीजवळ आपण राहू, या निश्चयाला तरी काय किंमत? निश्चय म्हणजे निश्चय. दृढ निर्धार! करायचं असेल तर पूर्ण, ठीक करायचं; नाहीतर या वाटेलाच जायचं नाही. अर्धवट असं, अर्धवट तसं, म्हणजे आली पंचाईत! महाबलानं कसं ठरवलं?

('संस्कार' पुस्तकातून)

आपल्या बहिणीच्या अंगावर असायला हवं असलेलं सोनं चंद्रीनं- त्या महामायेनं- लुबाडलं. हिच्यामुळेच ती मेली, असं पुटपुटत घरापर्यंत रडत आलेल्या अनसूयेला हळूहळू नारणप्पाबद्दलही वाईट वाटू लागलं. काही म्हटलं तरी तो आपला मामेभाऊ, मामा जिवंत असता, किंवा बहीण हयात असती, त्या गरुडाचार्यानं करणी केली नसती, तर नारणप्पाची बुद्धी अशी फिरली असती का? तेवढं सर्व सोनं कुणाच्यातरी स्वाधीन करून तो बेवारशाप्रमाणे मेला असता का? ती स्फुंदून स्फुंदून रडू लागली.

''तो काही का करीना, आतड्याचं नातं तुटत नाही'' असं म्हणून ती खांबाला टेकून स्वतःशीच बडबडू लागली. दुसऱ्याच क्षणी तिला घरात तोकड्या केसाची घट्ट वेणी घातलेली, बुगडी, चमकी घातलेली, ठेंगणी ठुसकी, उभट कुंकू लावलेली तिची मुलगी लीला दिसली आणि तिचं मन दगडासारखं झालं.

''श्रीपती कधी येतो म्हणाला गं?'' तिनं दहाव्यांदा मुलीला विचारलं. लीलावतीनं मान हलवली, आपल्याला माहीत नाही म्हणून- अनाथ मुलगा म्हणून त्याला घरी ठेवून घेतला. मोठा केला. शिकवलं. मुलगी दिली. तर त्याचं डोकंच नारणप्पानी बिथरवलं! आपलं अंडं आपणच खाणारी सापाची जात आणि नारणप्पाची जात एकच असावी. जावयाच्या डोक्यात नारणप्पानं काय काय भरवून दिलं कोण जाणे! महिन्यातले दोन दिवस काही त्याचे पाय घरात ठरत नाहीत. यक्षगान करणाऱ्यांच्या मागे गावोगाव हिंडतो. पारिजातपुरातल्या मुलांशी स्नेह करतो, दोन-चार ठिकाणी त्यानं बाया ठेवल्या आहेत म्हणून दुर्गाभट्टची बायको सांगते. लपूनछपून तो नारणप्पाकडे जायचा, त्याच वेळी अनसूयेला उमजलं की हा पोरगा आपल्या हातातून निसटला. वाईट मार्गाला लागला. त्याच्याकडे तो काय काय जेवला, काय काय प्यायला ते भगवंतालाच माहीत. त्या चंद्रीच्या नटरंगीपणाला बळी न जाणाराच विरळा. जावयाला धडा शिकवावा म्हणून अनसूयेनं मुलीला शिकवलं ''तू कधी कबूल होऊ नकोस. तो जवळ आला तर मांड्या घट्ट आवळून घेऊन झोप. अक्कल येऊ दे त्याला जरा- '' लीलावतीनं आईचं तंतोतंत ऐकलं. नवरा शेजारी आला म्हणजे 'चिमटा काढला, चावले' असं रडतभेकत ती आईजवळ येऊन झोपत असे.

पण श्रीपती काही सुधारला नाही. मागे लक्ष्मणाचार्य अंमळ सुधारला

होता; पण हा जावई काही बधला नाही. शेंडी काढून त्यानं केस वाढवले. दक्षिणा म्हणून आलेल्या पैशातून एक विजेरी घेऊन रात्री शिट्ट्या वाजवत तो अग्रहारात चकरा मारू लागला!

लक्ष्मणाचार्य आधीच तापाच्या आजारानं क्षीण झालेला. डोळे खोल गेलेले, दुपारचं जेवण नाही. त्यात पारिजातपुरापर्यंत फुकट पायपीट. मरायला टेकल्यासारखा दिसणारा लक्ष्मणाचार्य धापा टाकीत घरी येऊन पडला तोच त्याच्या बायकोनं टकळी सुरू केली. ''काही म्हटलं तरी नारणप्पा माझे मामेभाऊ. ब्राह्मणधर्म त्यांनी बुडविला म्हणून काय झालं? त्याचं मढं शूद्रांनी जर उचललं तर आपण काही जिवंत राहणार नाही. प्राणेशाचार्यांचा स्वभाव किती चांगला म्हणता! गरुडाचार्य त्याउलट. अग्रहाराला आग लावून पुन्हा आपणच शंख ठोकणाऱ्यांपैकी महाबिलंदर. तुमच्यासारखा येरा गबाळा नव्हे. त्याला जर का आचार्यांनी परवानगी दिली तर तो शवसंस्कार करून बायकोला सोन्यानं मढविणार. आधीच तिचं डोकं आभाळाला टेकल्यासारखी ती वागते. देवानं तिला बरी शिक्षा केली म्हणा. नाहीतर श्याम घर सोडून मिलिटरीत पळून कशाला हो जाता? आता माझ्या जावयाबद्दल, माझा मामेभाऊ नारणप्पाबद्दल हे एवढी जीभ सैल सोडतात, यांचा मुलगा तिथं काय काय खातो, काय काय करतो, बाई बाई, ते देवालाच माहीत! आता बघा गरुडाचार्य प्राणेशाचार्यांकडे जाणार नाही, तर गेलेला असणार. त्याचं मन वळवणार. त्याला सोडू नका. तुम्ही तिथं जा. उठा उठा...'' तिनं नवऱ्याला घराबाहेर पिटाळलं.

आपल्या मसलतीत हा कोण टिकोजीराव मध्येच अडमडला म्हणून गरुडाचार्याला राग आला. उसासा टाकत एका हातानं पोट उचलून धरून दुसऱ्या हाताच्या आधारानं जमिनीवर बसत असलेल्या लक्ष्मणाचार्यांकडे त्यानं रागारागानं पाहिलं. त्याच्या तोंडी पुष्कळ शिव्या घोळल्या; परंतु समोर आचार्य असल्यामुळे त्यानं तोंड आवरलं. डोक्यावरून नहायचं असेल तर एक चमचाभर तिळाचं तेलसुद्धा विकत न घेणारा हा कंजूष. याला ब्राह्मण कोण म्हणणार? 'डोक्यावरून अंघोळ करा एकदा' म्हणून बायकोनं तगादा लावला तर हा ढेरपोट्या सकाळी चार मैल चालून कोकण्याच्या दुकानात जाईल 'काय रे कामत, तिळाचं तेल आलंय का? काय भाव? माल कसा आहे? कुबट आहे की काय बघू,' म्हणून दोन चमचे हातावर घालायला लावून, वास घेतल्यासारखा करून 'ठीक आहे, पण मिसळ आहे. नवीन

माल कधी येणार सांग आम्हाला. एक डबा पाहिजे,' असं सांगून तो तेलाचा हात डोक्याला पुसून घेतो. पुन्हा मिरचीच्या पोत्यात हात घालून 'मणाला काय भाव?' असं विचारत पसाभर मिरच्या गप्पा मारता मारता पिशवीत सोडतो. पुढे आणखी एक मैल चालून शेणायच्या दुकानात 'अरे कामत किती महागडा!' अशी सुरुवात करतो. तिथंही दोन-तीन चमचे तिळाचं तेल आणि पसाभर मिर्ची! घरी आल्यानंतर स्नान. मग जेवण. आसपासच्या केळीच्या बागेतून पानं आणतो, वाळवून द्रोण करून विकतो. शिवाय जानवीजोड करून विकतो. कुणीतरी जेवायला बोलावतील म्हणून कावळ्यासारखा टपून असतो. आता या सोन्यावर तो टपला आहे. काही होवो, याला आपण सोनं पचू देणार नाही.

'नारायण, नारायण' करीत श्वास टाकीत लक्ष्मणाचार्यानं खांद्यावरच्या तोकड्या पंचानं घाम पुसून घेतला.

''अहो आचार्य, धर्मशास्त्राप्रमाणे हरकत नसेल तर शवसंस्कार करायला माझी ना नाही. काही म्हटलं तरी तो माझा साडू. आपली आज्ञा झाल्यास माझ्याशिवाय दुसरा अधिकारी या बाबतीत कोण आहे?'

डोळे झाकून लक्ष्मणाचार्यानं अदबीनं सुरुवात केली. गरुडाचार्य खजील झाला. याविरुद्ध आपल्याकडे काय अस्त्र आहे?

'शवसंस्कार करण्याच्या अधिकाराबद्दल प्रश्न जर आला- काय समजलं? -तर माझी हरकत नाही. तूच कर. बाकीच्यांचं पाप स्वीकारण्यासाठीच ब्राह्मण जन्म आला आहे! पण सोनं मात्र कोठीत जायला पाहिजे. किंवा धर्मस्थळाच्या न्यायाप्रमाणे मला मिळायला पाहिजे!' गरुडानं कोलदांडा घालून ठेवला.

प्राणेशाचार्यांचं हृदय पिळवटलं. एखाद्या वेळी शवसंस्काराचा प्रश्न सुटला तरी या सोन्याचा प्रश्न काही सहजासहजी सुटण्यासारखा नाही. घटके घटकेला आपली जबाबदारी वाढत आहे. नाराणप्पाचा प्रश्न वामनाच्या पावलाप्रमाणे वाढतच आहे...

तेवढ्यात दासाचार्यासकट बाकीचे गरीब ब्राह्मण तेथे हजर झाले.

रडणाऱ्या मुलाची पाठ आईनं थोपटावी तसं आपलं पोट थोपटत दासाचार्य म्हणाला,

''माझी तब्येत ठीक नाही हे आपण जाणताच. अन्न नाही तर आजार बळावणार. आपण मला एखादा मार्ग दाखवावा. नाही तर आपद्धर्म म्हणून

काही आज्ञा द्यावी. अग्रहारात मढं ठेवून घेऊन जेवावं की कसं? आता भर उन्हाळा आहे. उद्याच्या आत त्या मढ्याला घाण सुटेल. माझं घर त्याच्या घराजवळच आहे. कुणालाही झालं तरी ते चांगलं नव्हे. अग्रहाराच्या हिताच्या दृष्टीनं का होईना, लक्ष्मणाचार्य किंवा गरुडाचार्य यांपैकी एका कुणाच्या निर्णयाप्रत यायला पाहिजे.'' बोलणं थांबवून त्यानं इकडे तिकडे पाहिलं.

नारणप्पाला जशी स्त्री, तशी दासाचार्याला भूक. त्या भुकेपोटी त्यानं मोठेपणाची एक गोष्ट सांगून टाकली.

''तुम्ही 'हो' म्हणा आचार्य. आपलं वाक्य आम्हाला वेदवाक्य आहे. आम्हाला सोनं नको- काही नको. आपण आज्ञा करा. आम्ही चौघं ते मढं नेऊन शवसंस्कार करून येतो. त्या मारुतीला सोन्याचा एक मुकुट करून टाका, आमच्या नावे.''

प्राणेशाचार्यांची सात्त्विक बुद्धी जागी झाली. गरुडाचार्य आणि लक्ष्मणाचार्य हताश झाले. सर्वबुद्धी पणाला लावून या प्रसंगी आपण काय करावं याबद्दल गरुडाचार्य विचार करू लागला. आता मारुतीला सोनं जाऊ द्या म्हणून दासाचार्यांनी सांगितल्यानंतर त्या विरुद्ध बोलणं गैर. आता आपण काय सांगावं?

''बिचारे आचार्य धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणे करू पाहत आहेत, हे न पाहवणारे असतातच की! आचार्यांनी घाई केली- काय समजलं? - आणि ते गुरूंना चुकीचे वाटलं- काय समजलं- तर आपली गत काय होईल? आचार्यांच्या नावलौकिकाला बट्टा लागणार नाही, याची आपण खबरदारी घेतली पाहिजे. काय समजलं? - पारिजातपुरातल्या लोकांसारखं आम्हालाही गुरूनं वाळीत टाकलं तर काय घ्या....' गरुडाचार्य हळुवारपणे, जणू काही दासाचार्यांचं बोलणं आपल्याला पटलं आहे असं दाखवीत, हसत बोलला. त्यातला डावपेच लक्ष्मणाचार्याला समजला नाही. तोही हसला.

''आता तुम्ही सगळे आपापल्या घरी जा. धर्मशास्त्राच्या तळाशी जाऊन, रात्रभर बसून मी या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लावणार आहे.'' प्राणेशाचार्य एवढेच निक्षून म्हणाले. त्यांना फार थकवा आला होता. सूर्य मावळला; पण संध्यावंदन नाही. जेवणही नाही. हाताशी काम नसल्यामुळे

प्राणेशाचार्यांनी उगीचच आतबाहेर केलं. अंगणात बसलेल्या चंद्रीला 'वर येऊन बैस' म्हणून सांगितलं. एखाद्या मुलाप्रमाणे बायकोला दोन्ही हातांवर उचलून परसात नेलं. तिचे हातपाय धुवून झाल्यावर पुन्हा आणून तिला अंथरुणावर झोपवलं. संध्याकाळचं औषध दिलं. पुन्हा माजघरात येऊन कंदिलाच्या उजेडात ते धर्मग्रंथ चाळू लागले.

केळूरच्या लोकांनी बसवलेला 'जांबुवती कल्याण' यक्षगानाचा प्रयोग पाहण्यासाठी श्रीपती आदल्या रात्रीच शिर्नाळीला गेला होता. त्यामुळे त्याला नारणप्पा आजारी असल्याचंही माहीत नव्हतं आणि मेल्याचाही पत्ता नव्हता. नाहीतर अग्रहारातला आपला एकुलता एक मित्र गेल्याचं त्याला मनस्वी दुःख झालं असतं. तसं त्याला घर सोडून बाहेर पडलेल्याला आठवडा उलटलेला होता. केळूरच्या यक्षगान करणाऱ्या भागवताशी दोस्ती जमवून तो त्यांच्याबरोबरच भटकतो आहे. जेवण, राहणं त्यांच्याबरोबरच. रात्री कार्यक्रम पाहतो. दिवसा झोप काढतो. फुरसतीच्या वेळी आजूबाजूच्या गावात जाऊन तिथल्या लोकांत केळूरच्या प्रयोगाबद्दल तारीफ करतो. त्यांना सुपारी देण्याबद्दल आग्रह करतो. या सर्व गडबडीत त्याला इतर जगाचा विसर पडला आहे. शिर्नाळीचा प्रयोग झाल्यानंतर मात्र तो घरी जाण्यासाठी निघाला आहे. वाटेत जंगल आणि काळोख. विजेरीच्या उजेडात एकटाच जोरजोरानं गाणं म्हणत चालला आहे. डोक्यावरचे मागे वळलेले केस मानेपर्यंत आले आहेत. त्याला तो कात्री लावायला तयार नाही. कारण? केळूरच्या भागवतांनी त्याला पुढल्या वर्षी यक्षगानात स्त्रीपात्र्याचं काम देण्याचं कबूल केलं आहे! प्राणेशाचार्यांच्या हाताखाली तो संस्कृत शिकला आहे. त्यामुळे उच्चार स्पष्ट आणि शुद्ध आहेत, असं भागवतच म्हणाला होता. शिवाय पुराणातल्या बऱ्याच गोष्टी ऐकलेल्या असल्यामुळे यक्षगानातल्या पणाला लागणारा हजरजबाबीपणाही त्यांच्यात आहे. कंपनीत एखादं काम मिळालं तर यापुढे श्राद्धपक्षातल्या जेवणासाठी टुकत बसायला नको. वडा, खीर आणि फणसाच्या पदार्थासाठी टपून बसलेल्या ब्राह्मणांच्या कचाट्यातून आपण सुटू शकू, या विश्वासानं त्याला धीर वाटत आहे. शिवाय शीना पुजाऱ्याच्या खोपटात घेतलेली दारू हळूहळू डोक्यापर्यंत चढून त्याला थंडी वाजेनाशी झाली आहे. दोन बाटली दारू आणि कळ दाबताच लागणारी विजेरी अशी दोन शस्त्रं असल्यानंतर मग भूतपिशाच्चाची काय भीती?

दुर्वासपूर जवळ येऊ लागलं, तसं त्याला आपल्या येऊ घातलेल्या सुखाच्या आठवणीनं ऊब वाटली. मांड्या घट्ट आवळून बायको झोपली तर काय बिघडलं? रुपी आहेच की. ती इतरांच्या दृष्टीनं अस्पृश्य असली म्हणून काय? नारणप्पा सांगायचा- काळी असो, गोरी असो; बाई ती बाई! तशी रूपा काळी नव्हेच. बसक्या खुरटलेल्या थानाच्या, सदान्कदा तोंडाला आमटीचा वास येत असलेल्या ब्राह्मणाच्या मुलीपेक्षा कितीतरी ती उजवी! रूपीत काय उणं? रसरशीत अंग, लुसलुशीत स्पर्श. या वेळी ती अंगणात एका मडक्यात पाणी तापवून, अंघोळ करून आंबट ताडी पिऊन उबदार झालेली असते. अगदी चढवलेल्या तबल्यासारखी- काळी नव्हे गोरी नव्हे. कोवळ्या उन्हात नांगरलेल्या शेतातली लालसर माती दिसावी तशी ती दिसते. श्रीपतीचा पाय अडखळला. मध्येच तो विजेरीनं चहूकडे उजेड पाहून विझवतो, पुन्हा पेटवतो. मग राक्षसवेष घेऊन आलेल्या पात्राप्रमाणे तो 'तक थै तक थै' नाचू लागतो. यक्षगानातल्यासारखं आपल्याला नाचता नाचता ऊठबस करता येते की नाही, हे पाहता पाहता त्याचा गुडघा दुखावतो. जंगल निर्जन. विजेरीच्या उजेडानं बावरून पक्षी पटापट पंख फडफडवतात. त्याला पुन्हा जोश येतो; मग एकेक करून नवरसभाव गर्दी करतात. राग, शृंगार, भक्ती, रौद्र, बीभत्स... सगळे रस त्याच्या चेहऱ्यावर सरकून जातात. आताच लक्ष्मी उठली आहे. यक्षगानाच्या पद्धतीनं नाचत गात ती शेषशायीला उठवते आहे-

'उठि गोविंदा उठि गोपाळा । आनंदकंदा पहाट झाली । उठी सरली राती...'

श्रीपतीच्या डोळ्यांत टचकन पाणी तरळलं. गरुड येऊन उठवतो. 'गोविंदा उठावे' नारद येऊन उठवतो. 'आनंदकंदा, उठा -' समस्त पशू-पक्षी,यक्ष-किन्नर-गंधर्व प्रार्थना करतात 'पहाट झाली, उठावे -'

नेसत्या धोतराला पातळासारखे वर धरून श्रीपती नाचू लागला. नृत्यातल्याप्रमाणे मान हलवली. आता कुठं त्याच्या लक्षात येतं की शीनाकडे घेतलेली दारू आपल्याला अर्धवट चढली आहे. नारणप्पाकडे जाऊन आणखी कार्यक्रम झाला तर बहार येईल.

यक्षगानातील सर्व स्त्रीपात्रं त्याला आठवली. पुराणात स्त्रीच्या मोहाला बळी न गेलेला ऋषीच नाही. विश्वामित्राचा तपोभंग करणारी मेनका कशी दिसत असावी? चंद्रीपेक्षा उजवी असावी; परंतु कुणाला फाटकं नेसून

माझे तालिबानी दिवस!



अब्दुल सलाम झैफ
संपादक
अलेक्स स्ट्रिक व्हान लिन्शोटेन
फेलिक्स क्यून
संपादक
डॉ. प्रमोद जोगळेकर

किंमत : ३६०/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

इस्लामी कायद्याची जबरदस्तीनं अंमलबजावणी करणाऱ्या तालिबानमधला एक जण म्हणजे मुल्ला झैफ!

सोव्हिएत आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी कोवळ्या वयात हाती शस्त्रं घेतलेला मुल्ला झैफ हा जिहादी लढवय्या (मुजाहिद्दीन) व नंतर तालिबानचा पाकिस्तानातील वकील होता. दहशतवादाविरुद्धच्या लढाईला सुरुवात झाल्यानंतर त्याला पकडून अनेक वर्षे तुरुंगात डांबून ठेवण्यात आलं. तिथून सुटका झाल्यावर आता काबूलमध्ये राहणाऱ्या एके काळच्या या तालिबान नेत्याची ही सत्य कहाणी, यादवी युद्धानं गेली तीस वर्षं होरपळणाऱ्या अफगाणिस्तानचं वेगळंच दर्शन घडवते!

केरकचरा उचलायला येणारी रूपी दिसली नसेल काय? का त्याना तिचं रूप दिसलं नाही? त्यात काय आश्चर्य म्हणा, ब्राह्मणधर्म ब्राह्मणधर्म म्हणून सदान्‌कदा त्याबद्दलच विचार करणाऱ्यांना या सगळ्या गोष्टी कशा दिसायच्या? प्राणेशाचार्य सांगायचे, 'वेदव्यासांना किती आनंद झाला असेल? रवी उदयाच्या वेळी त्यांनी उषेला पाहिलं आहे. ती कशी दिसते? तर नुकतीच आंघोळ करून शुभ्र झालेल्या पुष्पवतीच्या मांड्याप्रमाणे...' कित्ती सुंदर कल्पना आहे. पण या ब्राह्मणांनी त्याचा मंत्र केला! त्याचा धंदा केला. श्रीपतीला मग यक्षगानात राजाचा वेष घालणारा कुंदापूरचा नागप्पा आठवला. 'इथे भ्रमर किती? पारिजात, चाफा, केवडा, मोगरा इत्यादी फुलांनी ती बहरलेली वनश्री किती! आणि अशा सौंदर्यवाटिकेत एकुलती एक नतमुखी आणि काहीशी कष्टी दिसणारी तू आहेस तरी कोण?'

तो मग हसतच चालतो. अख्ख्या अग्रहारात सौंदर्याची दृष्टी फक्त दोघांना आहे असं त्याला वाटतं. पहिल्या नारणप्पा, दुसरी चंद्री- चंद्री म्हणजे अत्यंत लावण्यवती. शंभर मैलांच्या परिसरात तशी सुंदर स्त्री दुसरी दाखवा!

दुर्गाभट्टाला तशी थोडीशी रसिकता आहे. पण फार पुढे जात नाही तो! शेट्टी लोकांनी ठेवलेल्या बायांच्या अंगावरून चोरून हात फिरवतो एवढंच. तसं म्हटलं तर खरे रसिक म्हणजे प्राणेशाचार्यच! हजारांतला एक माणूस. रोज संध्याकाळी पुराण सांगताना एवढे तल्लीन होऊन वर्णन करतात की मी मी म्हणणाऱ्या भागवतांनी त्यांच्यापुढे लाजावं. किती हळुवार, नाजूक बोलणं, किती रुबाबदार व्यक्तिमत्त्व. शेंडी, गंध, अंगारा, अक्षत, जरीची शाल त्यांना एकट्यानाच शोभून दिसते. आठही मठांत वाद घालून, दक्षिणेतील महापंडितांना वादात हरवून त्यानी मिळवलेल्या पंधरा जरीच्या शाली आहेत म्हणे. पण ते स्वतःबद्दल कधी सांगायचे नाहीत. पण बायको? ती तर रोजचीच आजारी. धड जगत नाही; धड मरत नाही. कालिदासाचं स्त्रीवर्णन ते रंगवून सांगत असतात. त्यांना स्वतःला काही वाटत नसेल का? आपण बुवा शाकुंतल ऐकता ऐकता नदीवर गेलो आणि पोहत असलेल्या मादक सौंदर्यात अडकलो. अंघोळ करून ओलेतीनं ती भरलेले माठ डोईवर घेऊन चालली होती. नितळ चांदणं विखुरलं होतं. रूपी त्या दिवशी निदान आपल्याला शकुंतलेसारखीच दिसली. थेट आचार्यांच्या वर्णनाबरहुकूम!

मधल्या वाटेनं श्रीपती महारवाड्याच्या टेकडीकडे चालू लागला. अमावास्येसारख्या त्या काळरात्रीत त्याला लांबवर एक झोपडी जळताना दिसली. त्याच्या आसपास काही काळ्या सावल्या. लांब उभे राहून आग पाहणाऱ्या; परंतु आग न विझविणाऱ्या; श्रीपतीला आश्चर्य वाटलं. कसं काय घडतंय? मुद्दाम तो थोडासा थांबला. उन्हाळ्याचे दिवस. बांबूला चटया लावून बांधलेल्या झोपडीला राख व्हायला कितीसा वेळ लागणार? सावल्या आपापल्या खोपटात परतल्या. त्या जाळांच्या झळांनी किलबिल करीत सैरभैर उडालेले पक्षी आपल्या घरट्यात परतले. चोरपावलानं श्रीपती रूपीच्या झोपडीजवळ गेला आणि त्यानं लांबूनच टाळी वाजवली.

न्हाऊन कंबरेला एक पटकूर गुंडाळलेली, कमरेच्या वर काही वस्त्र नसलेली रूपी दोन्ही हातांनी आपले दाट मोकळे केस झटकत पाठीवर टाकत बाहेर आली. आवाज न करता लांबवर एका झाडाच्या आडोशाला गेली. श्रीपती हे सर्व डोळ्यांत प्राण आणून पाहत होता. तो मग तिथून निघाला. इकडे तिकडे पाहून कोणी नाही याची खात्री करून घेतली आणि ती थांबली होती तिथं जाऊन तिच्या सर्वांगावर विजेरीचे झोत टाकून त्यानं तिला प्रथम पाहून घेतलं, मन न आवरून तिला जोरात मिठीत ओढलं—

'अहो, आज नको.'

रूपी असं कधीच म्हणाली नव्हती. श्रीपतीला आश्चर्य वाटलं. त्यानं तिच्या बोलण्याकडे लक्ष न दिल्यासारखं केलं.

'पिळ्ळा आणि त्याची बायको- भुतानी पछाडलं की काय कोण जाण! आज दोघं मेली-' श्रीपतीला आता बोलणं नको होतं. त्यानं तिला गवतावर आडवं केलं.

''खोपटातच जाळलं दोघांना. ताप आला होता म्हणे-''

ती काहीतरी सांगू लागली. श्रीपतीला ते सहन होईना. तिचं मन कुठंतरी भरकटत आहे. आपण एवढ्या लांबून तिच्यासाठी आलो तर ती काहीबाहीच बरळते आहे. अशा वेळी ती पूर्वी बोलत नसे... पावसात पीक वाकावं तशी असायची-

रूपीनं पटकुर गुंडाळून घेतलं. ''अहो तुम्हाला माहीत आहे का? आता बघा आमच्या खोपटात काय असतं म्हणून उंदीर यावेत सांगा. आमच्या झोपड्या म्हणजे काय ब्राह्मणांची घरं? पण आता एवढे उंदीर येतात.

पाहुण्यासारखे. वरून धपधप खाली पडतात. गरगर फिरून मरून पडतात. खोपटाला आग लागल्यानंतर पळून जावेत ना, तसे रानात, जंगलात पळतात. हे असं कधी मी बघितलं नव्हतं. बाई, एखाद्या देवऋष्याला विचारायला पाहिजे. महाराच्या झोपडीत उंदीर येतात काय... माणसं मरतात काय... कुणाला तरी विचारायला पाहिजे.''

श्रीपतीनं उठून कंगवा काढून केस विंचारले. विजेरी पेटवून त्या उजेडात घाईघाईनं तो गेलासुद्धा. रूपी फक्त अंगाखाली बरी. बोलायला नव्हे. तिनं तोंड उघडलं तर भूत-पिशाच्च याशिवाय दुसरा विषय नसतो. नुसता वैताग.

नारणप्पाला भेटण्याच्या घाईनं त्यानं धोतर वर खोचून घेतलं. टेकडीवरून तो झपाझप उतरला. त्यांच्याकडे पुन्हा दारू पिऊन मस्त झोप काढावी आणि सकाळी उठून पारिजातपुरातल्या नागराजकडे जावं असा त्यानं विचार केला.

श्रीपतीनं हळूच नारणप्पाच्या घराचा दरवाजा ढकलला. दार उघडलं. आतून कडी घातली नव्हती. अजून तो जागा असेल या कल्पनेनं तो सरळ आत गेला. विजेरी पेटवून 'नारणप्पा' 'नारणप्पा' म्हणून त्यानं हाक मारली. उत्तर नाही. एक प्रकारची चमत्कारिक घाण आल्यासारखी होऊन त्याला ओकारी आली. माडीवर पाहावं म्हणून तो जिना चढून वर निघाला. सवयीच्या पायऱ्या म्हणून त्यानं दिवा लावला नव्हता. मध्येच त्याच्या पायाला मऊ मऊ काहीतरी लागलं. त्यानं उडीच मारली. विजेरीच्या उजेडात पाहतो तर एक मेलेला उंदीर उताणा पडलेला. त्याच्या अंगावरल्या माश्या उजेडात उठल्या. मग तो धाडधाड पायऱ्या चढत माडीवर गेला. नारणप्पा जमिनीवर झोपला होता. तब्बेतीनं प्याला असेल असा विचार करत त्याचं पांघरूण तोंडावरून काढून त्यानं 'नारणप्पा, नारणप्पा म्हणून हळुवारपणे पण जोरात हाक मारली. त्याच्या खांद्याला धरून हलवलं. पण सगळं गार होतं. त्या मेलेल्या उंदरासारखं.

त्यानं विजेरीच्या उजेडात नीट पाहिलं तर नारणप्पाचे डोळे उघडेच होते. बुबुळं फिरली होती एवढंच काय ते. त्या उजेडात त्याला प्रेताभोवती घोंघावणाऱ्या माश्या, पिसवा एवढ्याच जिवंत आहेत, असं वाटलं.

अग्रहारात वयानं मोठी म्हणजे लक्ष्मीदेवम्मा. साठी उलटून तिला दहा तरी वर्षं सरली असतील. काठी टेकत ती दाराशी आली आणि तिनं दार उघडलं. दाराचा 'ढर्रर्रर्र' असा आवाज आला. मग तिनं 'हेय' म्हणून जोरात

ढेकर दिली आणि ती रस्त्यात उतरली. जेव्हा तिला झोप यायची नाही किंवा डोक्यात विचारांचं काहूर माजायचं त्या त्या वेळी तिचा ठरलेला कार्यक्रम होता. रात्री अग्रहाराच्या रस्त्यात खालून वर, वरून खाली भटकणं. गरुडाचार्याच्या दाराशी उभं राहून त्याच्या पितृकुलकोटीचा उद्धार करणं, त्यातल्या त्यात आवस आणि पौर्णिमेच्या आसपास हा कार्यक्रम जास्त व्हायचा. तिच्या दाराचा आवाज आणि तिच्या ढेकरा अग्रहारात प्रत्येकाला परिचयाच्या होत्या.. शिवाय पंचक्रोशीतल्या लोकांनाही तिच्याबद्दल कळून चुकलं होतं. ती बालविधवा म्हणून बरेच जण तिला अवलक्षणी म्हणायचे. ती सामोरी आली म्हणजे चार पावलं मागे जाऊन पुन्हा पुढे चालायचे! मग ती आपल्या हातातल्या काठीनं त्यांना मारायला उठायची. शिव्याशाप द्यायची. सगळेच तिचं बोलणं हसण्यावारी नेत असत. मुलं तिला 'ढेकरवाली' म्हणून चिडवतात; पण मोठे सगळे तिला 'अर्धवट' लक्ष्मीदेवम्मा असंच म्हणतात.

म्हटलं तर तिचंही एक पुराणच आहे. आठव्या वर्षी लग्न झालं. दहाव्या वर्षी विधवा झाली. पंधराव्या वर्षी सासू-सासऱ्यांनी राम म्हटलं. अग्रहारातले सगळे तिला पांढऱ्या पायाची म्हणू लागले... तिला विसावं सरायच्या आधीच आई-बापसुद्धा देवाघरी गेले. झालं! मग तिचा जमीनजुमला, पैसाअडका गरुडाचार्याच्या बापानं वहिवाटीसाठी संरक्षणासाठी घेतला. तिला घरी नेऊन सांभाळलं. त्याचा कारभार सगळा असलाच. नारणप्पाच्या बापालाही व्यवहारज्ञान कमी म्हणून त्याच्या इस्टेटीचा व्यवहारही तोच बघत असे. पुढे पंचवीस वर्षं लक्ष्मीदेवम्माला काही त्रास नव्हता. काळजी नव्हती. तो मेला आणि कारभार गरुडाचार्याच्या हातात आला आणि गरुडाचार्याची बायको सीतादेवी तर मुलुखातली चिकट. ती काही लक्ष्मीदेवम्माला पोटभर जेऊ घालीना- त्या दोघींचं मग भांडण जुंपलं. प्रकरण हातघाईवर आलं. नवरा-बायकोनं मिळून तिला घराबाहेर काढलं. तिला तिच्या नवऱ्याच्या पडक्या घरात राहायला लावलं. ती तिथंच एकटी राहू लागली. पण पोटापाण्याची काय व्यवस्था? तिनं प्राणेशाचार्यांकडे तक्रार नेली- आचार्यांनी गरुडाचार्याला बोलावून चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. तेव्हापासून तो तिला पोटगी देऊ लागला. महिन्याला एक रुपया. तो कसा तिला पुरणार? ती मग चिडीनं त्याच्याबद्दल, त्याच्या बायको-मुलाबद्दल

अद्वातद्वा बोलते. अगतिकपणे, जळजळीत शिव्याशाप देते. प्राणेशाचार्य अधूनमधून इतरांना सांगून तिला तांदूळ द्यायला लावतात. तरीसुद्धा लक्ष्मी देवम्माचा माणूसघाणेपणा दिवसेंदिवस वाढतच आहे.

लक्ष्मीदेवम्मा ढेकर देत गरुडाचार्याच्या घरासमोर येऊन उभी राहिली. हातवारे करून बडबडू लागली-

''मेल्या, तुझं वाटोळं होवो. तुझ्या डोळ्यांच्या खाचा होवो. गाव उठवणारा चांडाळ तू! नारणप्पाच्या बापावर करणी करून गबर झालास, मुडदाडा अब्रूची चाड असली तर बाहेर ये. रांडीचा माझा पैसाअडका गिळून बसलाय. तो काय पचणार होय रे तुला? मेल्यावरही भूत होऊन, तुझ्या बायको-मुलांच्या मानगुटीवर बसणार आहे मी! समजलं काय?'' मध्ये श्वास घ्यायलाच काय ती क्षणभर थांबली. मग पुन्हा सुरू झालं-

''तुझ्या करणीनंच सोन्यासारखा नारणप्पा चांडाळ झाला. बाई ठेवली त्यानं- म्हणून आम्ही ब्राह्मण म्हणवून घेणारे सगळे त्याच्या मुडद्याला हात न लावता बसलो की रे! कुठं गेला तुमचा ब्राह्मण धर्म? चांडाळांनो, रौरव नरकात पडून तडफडाल. समजलं? अग्रहारात असा मुडदा संस्कार न करता रात्रभर ठेवून दिलेला मी पाहिला नाही. राम! राम! हा कली आहे कली. ब्राह्मणधर्म बुडाला. सुंता करा! मुसलमान व्हा! तुम्हाला कशाला ब्राह्मणधर्म पाहिजे?''

हातातली काठी जमिनीवर आपटून तिनं पुन्हा एकदा ढेकर दिला.

''बघा रे बघा! नारणप्पाचा मुडदा बघा.'' असं घरोघर काठी टेकत सांगत लक्ष्मीदेवम्मा अग्रहाराच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत मग फिरू लागली.

'आयाई गं ऽ' असं ओरडत नारणप्पाच्या घराच्या ओट्यावरून दार बंद करून न घेताच, श्रीपती उडी मारून पसार झाला.

जीव मुठीत घेऊन पळालेला श्रीपती नदी पार करून थेट पारिजातपुरात नागराजाचं घर येईपर्यंत थांबलाच नाही.

कुणीतरी अग्रहाराच्या वाटेनं पळत गेला एवढंच दार बंद करून आत बसलेल्या लोकांना समजलं. पण तो श्रीपतीच होता हे फक्त चंद्रीनंच ताडलं. प्राणेशाचार्यांच्या घराच्या ओट्यावर पडल्या पडल्या तिला झोप येईना. जन्मात तिनं कधीच उपास काढला नव्हता. कधीच अशी एकटी ओट्यावर झोपली नव्हती. कुंदापूर सोडून ती नारणप्पाबरोबर आली

सुधारित आवृत्ती

॥ अन्नपुराण ॥

आ यु र्वे दि क • आ धु नि क

डॉ. अरविंद लिमये

किंमत : ४९५/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

रोगाश्चाहारसंभवा: । च.सू. २८
चरकाचार्यांनी हजारो वर्षांपूर्वी आहारातूनच रोग उत्पन्न होतात, असे म्हटले आहे. त्याकाळी पाणी व आहारद्रव्ये प्रदूषित व भेसळयुक्त नव्हती. आज २१व्या शतकात प्रदूषण, रासायनिक खते व भेसळ यामुळे आहारद्रव्ये नि:सत्त्व व प्रदूषित झाल्याने, चुकीच्या आहारामुळे रोग होण्याचे प्रमाण निश्चितच वाढले आहे.

प्रत्येक नागरिकास आहारद्रव्यांचे गुणधर्म माहीत असणे व आहार नियोजन समजणे, हे आवश्यक आहे.

यासाठीच आयुर्वेदिक व आधुनिक चश्म्यातून मांसाहार व शाकाहारातील तृणधान्ये, कडधान्ये, फळभाज्या-पालेभाज्या, फळे, मसाले, सुकामेवा, दुग्धजन्य पदार्थ, शीत-उष्ण पेये, साखर-गूळ यांसारख्या रोजच्या व्यवहारातील २५० अन्नद्रव्यांचे विवेचन म्हणजेच अन्नपुराण.

तेव्हापासून त्यानं तिला तळहाताच्या फुलासारखं सांभाळलं होतं. शेजघरात मऊ मऊ गाद्या. सदा उदबत्तीचा घमघमाट.

आणि आता तिला प्राणेशाचार्यांच्या घराच्या ओट्यावर झोपावं लागलं होतं. तेही उपाशीपोटी. तिला झोप येईना. ती उठली. सरळ आपल्या मळ्यात गेली. पिकविण्यासाठी केळ्याचा घड ठेवलेला तिनं अंदाजानंच शोधून काढला. त्या अंधारात ती केळी खाऊ लागली. मग नदीवर जाऊन पाणी प्याली आणि परतली. आपल्या घरी राहायचं तिला धैर्य होईना.

जन्मल्यापासून तिनं असं मढं जवळून पाहिलं नव्हतं. नारणप्पाच्या शवाला संस्कार झाला असता तर ती पोटभर रडली असती. पण आता प्रीतीच्या ठिकाणी भीती निर्माण झाली. जर का नियमाप्रमाणे त्याच्या शवाला संस्कार झाला नाही तर तो पिशाच्च होऊन छळणार. दहा वर्षं त्याच्याशी गोडीनं राहून आता आपण स्वस्थ बसणं तिला रुचेना. नारणप्पानं ब्राह्मणधर्म वाऱ्यावर सोडून दिला हे खरंच. मुसलमानाच्या बरोबर जेवला. तसे आपणही जेवलो. आपल्याला हरकत नाही. आपण सांगूनसवरून गरतीबाई नव्हेच. आपल्याला कुठलेच नियम लागू नाहीत. नित्य सुमंगली. वाहत्या नदीला कुठला आला दोष? ओंजळ भरून पाणी प्या, त्याच्यावरच थुंका, घाण धुवा, काहीही करा. पुन्हा पाणी शुद्धच. देवाच्या अभिषेकालाही चालतं. कधी सुकणार नाही. घाण दिसणार नाही. आपल्यासारखंच. नाहीतर दोन बाळंतपणं झाली की ब्राह्मणाच्या या बायका पाहाव्यात. बसके गाल, खोल गेलेले डोळे, लोंबकळणारे स्तन. आपण आजपर्यंत ताजेतवाने राहिलो म्हणूनच नारणप्पा आपल्याशी एकजीव होऊन जगला. कधी लहान मुलासारखा वागायचा. कधी मधाचं पोळं ओरबाडणाऱ्या अस्वलासारखा आपल्याकडून सुख ओरबडायचा. कधी रागानं पट्टींच्या वाघासारखा थयाथया नाचायचा. त्याला एकदाचा संस्कार होऊ द्या. पुन्हा आपण कुंदापूरला परत जाऊन पोटभर रडून घेऊ. पण हे ब्राह्मण कसले तयार होतात संस्कार करायला? नारणप्पानं ब्राह्मणधर्म सोडला, पण त्या धर्मानं त्याला सोडलं नाही. महा रागीट. हट्टी. काहीसा पिसाटसुद्धा. बहिष्कार घालतो म्हणताच मी मुसलमान होऊन तुमच्या डोक्यावर मिरे वाटतो म्हणून नाचलेला. त्याच्या अंतरंगात काय होतं कोण जाणे! इतरांबद्दल पुष्कळ बोलायचा, पण प्राणेशाचार्यांबद्दल चुकून अनुदार उद्‌गार त्याच्या तोंडातून आले नाहीत. त्या दिवशी काहीच्या बाहीच बरळला, पण घाबरला होताही

तितकाच. आपल्यासारखीलाही त्याच्या मनाचा थांगपत्ता लागला नाही. ब्राह्मणांशी तो इतका का चमत्कारिकपणे वागायचा, म्हणून आपल्यालाच प्रश्न पडायचा. तो आल्या आल्या आपण त्याला परोपरीनं सांगितलं, माझ्या हातचं जेवू नका. मांसमच्छी खाऊ नका. आपण खायचं सोडू. खावंसं वाटलं तर शेट्टीच्याकडे जाऊन खाऊन येऊ; पण अग्रहारात नको. ऐकलं तर मग तो कसला माणूस? हट्ट म्हणजे हट्ट. भ्रांत झालेली त्याची बायको याच्या स्वभावाशी कसं काय जमवून घेणार? माहेरी जाऊन शिव्याशाप देऊन तळवे घासूनच मेली. सुटली बिचारी. आता हा गोंधळ एकदा संपू द्या; म्हणजे आपण पण सुटू.

गंमत म्हणजे आपण आल्यापासून नारणप्पानं चुकूनसुद्धा कुठल्या देवाला हात जोडले नाहीत. देवाचं नाव तोंडी येऊ दिलं नाही. तोच ताप चढून बेशुद्ध होताच कसं बरळू लागला! 'आई गे, भगवंता! नारायणा रामचंद्रा' म्हणू लागला. 'रामारामा' म्हणून विव्हळू लागला. चांडाळाच्या तोंडी असे कसे शब्द आले? त्याच्या खोल मनात काय दडून होतं ते कोण सांगणार? आणि आता त्याचा शास्त्रोक्त विधी झाला नाही तर तो निश्चित भूत होणार आणि दहा वर्षं त्याचं मीठ खाऊन आपण...

सर्व काही प्राणेशाचार्यांवर अवलंबून आहे. किती सरळ माणूस! किती मायाळू! यक्षगानात द्रौपदीची हाक ऐकू येताच धावत येणाऱ्या श्रीकृष्णासारखा रूपवान. उंचापुरा, तेजस्वी. पण बिचाऱ्याला स्त्रीसुख म्हणजे काय चीज आहे याची कल्पना नाही. एकटाच झोपतो ओंडक्यासारखा. त्याची बायकोच भाग्यवती म्हणावी. अशा माणसाकडून सेवा करून घ्यायलासुद्धा पूर्व जन्माची पुण्याई लागते. प्राणेशाचार्यांचा तरी किती समजूतदारपणा! किती संयम! वेश्यांनी गर्भाधान करून घ्यावं तर अशा पुण्यपुरुषांकरवी! एरवी सगळे लंपटच. रूप, गुण, तेज कशातच उणे नाहीत आचार्य. पूर्वजन्मीची पुण्याई पाहिजे, असा माणूस मिळायला.

पोटभर केळी खाल्ल्यामुळे चंद्रीच्या डोळ्यांवर हळूहळू गुंगी येऊ लागली. पण झोप काही येईना. झोप आल्यासारखी वाटायची; पण पसार व्हायची. जणू आट्यापाट्याचा खेळच.

माजघरात प्राणेशाचार्य अजून जागेच होते. मधेमधे जोरात मंत्र वाचायचे. ग्रंथ शोधण्यासाठी मधेच उठून इकडेतिकडे फिरायचे आणि ते जागे असताना आपण झोपणं गैर, असंही चंद्रीला वाटलं. मग ती झोप टाळू

लागली. हात उशाशी घेऊन, पोट पायाशी घेऊन अंगभर पदर घेऊन, ती तशीच कुढत पडून राहिली.

तालपत्रावर लिहिलेले, पोथ्या, सर्व काही धुंडाळून झालं; परंतु मनाला समाधान देणारं उत्तर काही आचार्यांना मिळेना. या सर्व ग्रंथांतून समाधानकारक काही मिळत नाही असं सांगायचीही चोरी. मठाचे बाकी पंडित म्हणायचे, यांचं ज्ञान एवढंच की काय? पण आपण काय उत्तर देणार? मध्वाचार्यरचित सुधा आचार्यांना मुखोद्‌गत. त्या ग्रंथावर त्यांचा अधिकारही दांडगा, असा नावलौकिक. आता या अरिष्ट प्रसंगी आपली अब्रू तर जाणार नाही ना! एकदा का अब्रू कवडीमोलाची ठरली, तर मग सारं काही संपलंच. विचार करता करता त्यांनाच लाज वाटली. प्रसंग तो काय आणि आपण आपल्या अहंकाराबद्दलच विचार करत आहोत. जळो मोठेपण! पुन्हा त्यांनी त्याच भक्तीनं पोथ्या सोडल्या. डोळे मिटून ध्यान केल्यासारखं केलं. एक पान उचलून श्रद्धेनं वाचलं. त्यात काही नाही. पुन्हा दुसरं पान- त्यातही काही नाही... स्वयंपाकघरात झोपलेली बायको तेवढ्यात कण्हली.

आचार्य उठून आत गेले. त्यांनी तिला उठवून आधार देऊन बसवलं. लिंबाचं सरबत करून तिला हळू हळू पाजलं.

'नारणप्पाऐवजी मीच का गेले नाही? मला मरण कधी येणार कोण जाणे! सवाष्णपणी गेलेलंच....' भागीरथी विव्हळली. आचार्यांनी तिला शांत केलं. पुन्हा माजघरात ते कंदिलाजवळ येऊन बसले. सनातन धर्मात अशा प्रसंगाला उत्तर नसेल तर मरूनही नारणप्पा जिंकला आणि आपण हरलो, असाच अर्थ काढायचा. मुळात प्रश्न असा आहे की तो जिवंत असताना आपण त्याच्यावर बहिष्कार का घालू दिला नाही? त्यानं धाक घातला होता की आपण मुसलमान होऊ म्हणून. त्या धमकीला भीक घातल्यानंच धर्मशास्त्र लुळं झालं. ब्राह्मण आपल्या तपःप्रभावानं समाजावर सत्ता गाजवीत होते तोपर्यंत सारं ठीक होतं; पण दिवस बिघडले आहेत. म्हणूनच असे संदिग्ध प्रसंग उत्पन्न होतात.

तसं पाहिलं तर त्याच्या मुसलमान होण्याच्या धमकीला भिऊन आपण का बहिष्कार घालू दिला नाही? छे. असं मुळी झालंच नाही. त्याच्या मागे कळवळा होता? प्रेम होतं? खरंच आपल्या अंतःकरणात किती अपार

करुणा आहे! प्राणेशचार्यांनी पुन्हा आपल्या भरकटणाऱ्या मनाला आवरलं. स्वतःबद्दलची ही आत्मवंचना. आपली करुणा विशुद्ध नव्हती तर त्यामागे हट्टही होता. नारणप्पाचा अधर्म आचरणाचा हट्ट, तर आपला त्याला दादापुता करून, चुचकारून, आठवड्यातून दोन वेळा उपवास करून त्याला सुधारण्याचा हट्ट. यातून जिकलं कोण?

प्रेमानं, करुणेनं आपण जिंकू असा आपला विश्वास! या विश्वासात प्रेम किती आणि अहंकार किती? परंतु आपल्या स्वभावातच दुसऱ्याबद्दल कळवळा ओतप्रोत भरलेला आहे. शरीर जर्जर झाल्यानंतर 'काम' सोडून जातो; परंतु करुणा? आचार्यांना वाटलं कामापेक्षा करुणा किती तरी मोठी शक्ती. अशी करुणा आपल्यात नसती तर लग्नापासून अंथरूण धरलेल्या आपल्या बायकोची आपण अशी सेवा केली असती का? एखाद्या परस्त्रीच्या आहारी सहज गेलो नसतो का? या करुणेनंच माणुसकीचं, ब्राह्मणधर्माचं संरक्षण केलं आहे.

दयाबुद्धी, धर्म, माणुसकी, ब्राह्मणधर्म या सगळ्या रेशमी धाग्यांचा एक गुंतवळा झाला आहे. अगदी निरगाठ. मुळात नारणप्पा असा कडवट का झाला याचा विचार कोणी केला नाही. पूर्वजन्माच्या पुण्याईनं माणूस ब्राह्मणधर्मात जन्म पावतो, असं शास्त्र सांगतं. असं असताना नारणप्पानं आपला धर्म असा वाऱ्यावर का सोडून दिला? शेवटी प्रत्येक जण आपल्या स्वभावावरच जातो, हे खरं का? प्राणेशाचार्यांना ऋग्वेदातली एक गोष्ट आठवली-

एक होता ब्राह्मण. त्याला द्युताचा नाद फार. त्याला काही त्याच्यातून बाहेर पडता येईना. एकदा एके ठिकाणी यज्ञ आयोजित केला होता. त्या यज्ञशाळेत हा जाऊ लागला. त्याला कुणी ब्राह्मण आत जाऊ देईना. 'इथं तुझं काय काम? हा काय द्यूत खेळण्याचा अड्डा आहे काय?' असं चिडवून सर्वांनी त्याला घालवून दिलं. तो बाहेर आला. त्यानं आकांत मांडला. देवदेवतांना आवाहन केलं. ''देवांनो, तुम्ही सांगा. मी जुगारी का झालो? असला मोह माझ्या रक्तात कुठून शिरला? अष्टदिक्पालांनो, तुम्ही तरी सांगा....!''

इकडे यज्ञशाळेत हविर्भाग हातांत घेऊन ब्राह्मण अग्नी, इंद्र, वैश्य, यम आदींना हविर्भाग स्वीकारण्यासाठी बोलावू लागले. पण देवदेवता सगळे त्या

जुगाऱ्याच्या तिथं गेले होते. यामुळे आपल्या ब्राह्मणधर्माची चाड गुंडाळून ठेवून ब्राह्मणांना त्या अधर्माकडे जाणं भाग पडलं.

तसेच धर्माचा गाभा समजून घेणे महा कर्मकठीण. एक महापापी चांडाळ. जिवंत असताना त्याने वाटेल त्या गोष्टी केल्या आणि मरताना 'नारायण' म्हणून परमगती मिळवली.

'सात जन्म भक्त म्हणून माझ्याजवळ याल, की तीन जन्म शत्रू म्हणून माझ्याजवळ याल?' असं देवांनी जय-विजयांना विचारलं; तेव्हा त्यांनी जवळचा मार्ग स्वीकारला! पूजाअर्चा करीत चंदनासारखं शरीर झिजत सात जन्म काढायचे? कुणी सांगितलंय! आपल्यासारख्यांनी सारखं झिजत राहावं. धर्माचं मर्म समजतच नाही. नारणप्पाचा अंतरात्मा कुठल्या साधनेत गुंतला होता कोण जाणे! शेवटपर्यंत हसून नाचून पटदिशी प्राण सोडला...

या परिस्थितीत आपद्धर्म तो काय हे समजण्याची शक्ती मला देवानं दिली तर- प्राणेशाचार्यांच्या मनात विजेसारखी एक कल्पना चमकली. त्यांना मोकळं मोकळं वाटलं. एकदम बरं वाटलं. पहाटे उठून आंघोळ करून नदीपलीकडे जाऊन मारुतीला साकडं घालायचं 'मारुतीराया तुम्ही निर्णय द्या.'

मग ते चट्दिशी उठले. पोथ्या, तालपत्र, ग्रंथ बांधून नीट ठेवलं. येरझारा घालताना त्यांच्या लक्षात आलं की एक असहाय स्त्री मुटकुळी होऊन ओट्यावर झोपली आहे. अंथरायला नाही की पांघरायला नाही. त्यांनी मग आतून एक चटई आणली, उशी आणली. एक चादरही आणली आणि हलक्या आवाजात 'चंद्री' म्हणून हाक मारली. तिला तरी कुठं झोप लागली होती? ती पट्दिशी उठून बसली. पदर नीट सावरला. मग आचार्यांना वाटलं की अंधारात एका परस्त्रीजवळ असं उभं राहणंही चांगलं नव्हे. 'हे अंथरूण-पांघरूण घे.' एवढंच सांगून ते घरात आले. उंबरठ्याच्या आत उभे राहून त्यांनी आपला निर्धार चंद्रीला सांगितला आणि दिवा उचलून घेऊन ते माजघरात गेले. पुन्हा त्यांना काहीतरी आठवलं. चंद्रीनं अंगावरचे काढून दिलेले दागिने एका फडक्यात बांधलेले होते ते त्यांनी घेतले आणि पुन्हा चंद्रीला हाक मारली. चंद्री पुन्हा चट्दिशी उठली.

''हे बघ चंद्रे, तुझ्या मनाच्या मोठेपणामुळे शवसंस्काराचा प्रश्न कठीण बनला आहे. आपद्धर्माप्रमाणे वागणं हा ब्राह्मणांचा धर्म. हे सोनं

२री आवृत्ती



लॉस्ट होरायझन

जेम्स हिल्टन

अनुवाद

स्नेहल जोशी

किंमत : २००/-रु.

पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

हिमालयीन पर्वतांच्या उंच भिंती असलेल्या एका दूरवरच्या तिबेटियन दरीत स्वप्नातीत असा शांग्रि-लाचा मठ आहे. भारतातून अपहरण करून आणलेलं विमान कोसळल्यावर, ह्यूज कॉन्वेला त्या शांग्रि-लाच्या मठात आणलं जातं. तिथे त्याला काहीतरी गूढपणा जाणवतो.

हे उड्डाण कोणी नियोजित केलं होतं? असं कोणतं रहस्य होतं जे त्या आदरणीय लामाने दडवून ठेवलं होतं? पियानोसारखं वाद्य वाजवणारी ती सुंदर चिनी मुलगी ह्या अशा विचित्र जागी कशी आली?

हळूहळू कॉन्वेला ते असंभवनीय सत्य कळतं...

तुझ्याजवळच राहू दे. तो गेला; पण आता तुझ्या पोटापाण्याची काहीतरी सोय पाहिजे ना?''

आचार्यांचं बोलणं चंद्री एकचित्तानं टक लावून ऐकत होती. तिच्या काळ्याभोर आणि आर्त डोळ्यांकडे पाहत, तिच्या हातात ती पुरचुंडी टाकून मग आचार्य तडक आत गेले.

दासाचार्याला भूक काही सहन होईना. 'नारायण नारायण' म्हणून देवाचं नाव घेत पोटावरून हात फिरवीत तो अंथरुणात लोळत राहिला. त्याच्या मुलालाही झोप नव्हती. त्यानं आईला उठवलं 'आई कसली घाण येते?' म्हणून विचारलं. दासाचार्याला भुकेशिवाय दुसरी भावनाच नव्हती. त्याला काही वास आला नाही. त्याची बायको मात्र 'अहो कसला कुबट वास येतो आहे !' म्हणत जाग्याच असलेल्या नवऱ्याला ढोसकलं. 'उन्हाळ्याचे दिवस. मुडदा कुजून अग्रहारभर घाण सुटलेली दिसते.'

तेवढ्यात लक्ष्मीदेवम्मा 'नारणप्पाचं प्रेत, नारणप्पाच प्रेत' म्हणून ओरडत गेली. तिच्या आवाजानं दासाचार्याची बायको आणखी घाबरली. तिला वाटलं नारणप्पाचं प्रेतच रात्री भटकत, जागोजागी घाण वास पसरवत आहे. या कल्पनेनंच तिला दरदरून घाम फुटला.

झोपडीतील घाण वासामुळे रूपीलाही झोप लागली नाही. ती उठून बसली. दाट अंधार. काही म्हणजे काही दिसत नव्हतं. ती तशीच अंदाजानं बाहेर आली. महार-महारणीला ज्या झोपडीतच जाळलं होतं त्याच्या ठिणग्या इतस्ततः उडत होत्या. मध्येच वाऱ्यात चमकत होत्या. लांबवर काजव्यांचा एक थवा रूपीला दिसला. ती हळूच त्याच्याजवळ गेली आणि नेसलेलं सोडून गार वाऱ्याला मजेनं उभी राहिली. मग हळूच तिनं चिरगुट पसरून त्यात बरेच काजवे पकडून आपल्या खोपटात आणून झटकले. मिणी मिणी उजेड करीत ते तिथंच उडू लागले. एकदम पुष्कळ माणसं अंधारात विड्याचे झुरके घेत आहेत असंही तिला वाटलं आणि हसू फुटलं. क्षणभरच. पुन्हा तो वास तिच्या नाकात भिनला. मग ती जमिनीवर सारवल्यासारखी हातानं चाचपडू लागली. तिच्या आई-बापांना तिचे हात लागले. तेव्हा ते रागावले 'या वेडीला झोप लागत नाही काय?' म्हणून कातावले. ''उंदीर गं घाण वास. शी!'' ती पुन्हा चाचपू लागली. कोपऱ्यात मऊ, गार काहीतरी हाताला लागलं. काजव्याच्या उजेडात तिनं ते उचलून

पाहिलं तर मेलेला उंदीर! आई गं! असं किंचाळत तिनं त्या उंदराचं शेपूट धरून तो लांब फेकून दिला. या रांडेच्यांना इथं तडफडायला काय झालं, कोण जाणे! म्हणत पुन्हा तिनं चिरगुट कमरेला खोचून घेतलं. आता वास कमी झाला होता. जमिनीवर तिची पाठ टेकली न टेकली तोच झोपेनं तिला घेरलंही.

◆

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

आवाहन

पुस्तक वाचताना वाचक त्या पुस्तकाशी एकरूप झालेला असतो. काही वेळेला तर तुमच्या जीवनाला कलाटणी देण्याचं सामर्थ्य एखाद्या पुस्तकामध्ये असतं. आम्ही नेहमीच वाचकांना दर्जेदार पुस्तकं वाचण्याचा आनंद दिला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसचं असंच एखादं तुम्हाला आवडलेलं, भावलेलं पुस्तक असेल तर त्या पुस्तकाबद्दलचा अभिप्राय आम्हाला साधारण ५०० ते ८०० शब्दांत लिहून कळवा. अभिप्रायाबरोबर आपला संपूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर देण्यास विसरू नये. ते पुस्तक आपल्याला का आवडलं ते लिहायचं आहे. आपल्या अभिप्रायाचं स्वागत असेल. यासाठी मानधनही दिलं जाईल. अभिप्राय छापण्याबाबतचा अधिकार संपादकांच्या अधीन राहील. त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही आणि अस्वीकृत अभिप्राय परत पाठवला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच या संदर्भात दूरध्वनी-वरून कोणीही संपर्क साधू नये. आपला अभिप्राय आमच्या या ई-मेलवर mmgj@mehtapublishinghouse.com किंवा खालील पत्त्यावर पोस्टाने/कुरियरने पाठवावा.

मेहता पब्लिशिंग हाऊस
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०.

संस्मरण

चौंडकं



राजन गवस

आपल्या समाजातील देव, धर्म, अनिष्ट रूढीपरंपरांचा बळी म्हणजे देवदासी. 'जोगतीण देवाची, मालकी गावाची' ही आपल्या बोलीतील म्हण तिच्या जगण्याचं सार सांगते.

देवाच्या नावावर समाजातील राक्षसी वृत्तींनी निर्माण केलेल्या प्रथेच्या बळी ठरलेल्या देवदासी स्त्रियांची होरपळ 'चौंडकं' ही कादंबरी वाचकांसमोर ठेवते.

स्त्री-दु:खाचा नेमका वेध, बोलीची सर्व सामर्थ्यं पचवून राजन गवस यांनी 'चौंडकं'मध्ये घेतला आहे. 'सुली'च्या व्यक्तिरेखेतून एक ठसठशीत वेदना आपल्यासमोर येते.

देवदासीच्या जगण्यातील सर्व दु:ख आणि तिच्या समस्यांचा वेध घेणारी कादंबरी म्हणून 'चौंडकं'ची नोंद विशेषत्वानं करावी लागेल.

('चौंडकं' पुस्तकातून)

आक्कू जोगतिणीच्या दारात पाय टाकला आणि आतली माणसं बघून बायजा अवाक झाली. पोत्यात जुंधळं भरल्यासारखी सोप्यात माणसं भरलीती. बसायला जागा नव्हती. बरीचजण भित्तीला टेकून उभी होती. सगळा सोपा भरून माणूसच माणूस. मध्यभागी आक्कूबाई कपाळभर भंडारा माखून, मांडी घालून डुलत बसलीती. पाठीमागचा भलामोठा देव्हारा. त्यात मोराची पिसं, यल्लूआईचा टाक, शेजारी लहान लहान दुसऱ्या देवांचे टाक, तांदळाचा ढीग मध्येच. परडीत कवड्याची माळ. सगळं भंडाऱ्यानं माकल्यालं. शेजारीच जग. त्येच्या काटावर खोवलेली मोराची पिसं. लोंबकाळणारी काकणं. मध्ये देवीचा टाक. भोतेभोर तांदूळ आणि भंडारा. सुली हे सगळं बघता बघताच स्वतःला विसरून गेली. सुबाना पायातलं काढून भित्तीला टेकून उभा ऱ्हायला. बायजा उंबऱ्याच्या शेजारीच गळ्यात गुडघं घेऊन बसली.

आक्कू जोगतीणीनं जोराची उचकी दिली आणि सुली कावरीबावरी झाली. तिच्या अंगावर सर्रकन काटा उभा ऱ्हायला. गप्पकन ती आईला धरून उभी ऱ्हायली. एवढ्यात आक्कूबाईनं घुमायला सुरुवात केली. हाताला आळोखे पिळोखे देता देता तिच्या अंगावरचा पदर खाली पडला. केसाचा पुंजका विस्कटला. जट विचित्र हेलकावे खाऊ लागली. गळ्यातल्या पांढरट-तांबड्या मण्यांची हालचाल सुरू झाली. सुली तिचं सगळं रूप बघून चराकली. तिनं डोळं गच्च झाकलं आणि आईला गच्च मिठी मारली.

समोर बसलेल्या एका एका माणसाची इनती सुरू झाली. आक्कूबाई तंद्रीत बोलल्यासारखी त्यांना उत्तर देत होती. एका इनतीनं दुसरी इनती निघत होती. सगळी माणसं चिडीचिप होऊन ऐकत होती. कुणाच्या घरातलं देवाधर्माचं निघायचं. कुणाचं वाऱ्याबिऱ्याचं निघायचं. बायजा सगळं कान देऊन ऐकालती. एक एक माणूस कमी होत होतं. सुबाना मात्र आपल्याच विचारात भित्तीला टेकून तंबाखूची गोळी तोंडात धरून उभा होता.

उन्हं उतरतीला लागली, तवा सोप्यातली गर्दी निम्मी अधिक कमी झालती. तीन-चार बापय माणसं आणि दोघी बाया तेवढ्याच बसल्यात्या. बायजाची पाळी आली. आक्कू जोगतीण जाग्याला बसून जांभया द्यायला लागलीती. बायजा हळूहळू सरकतच आक्कूबाईजवळ गेली. सगळं बयवार

सांगू लागली. सुली कान टवकारून ऐकालती. सुबाना मात्र गप्पगार बसून होता.

सगळं ऐकता ऐकता आक्कू जोगतीण मधीच म्हणाली,

'तुमच्या घरात देवस्थानं कुठली कुठली ऽऽ ?'

'जोतिबा, लक्ष्मी, अंबाबाई...' बायजानं यादी पुरविली.

'घरचं पुरूस माणूस कोण बरोबर आलंय काय?'

'व्हय. घरचा मालकच आलाय ऽ' बायजा पुटपुटली.

आक्कूबाई एकदम घुमाय लागली. मध्येच जोरानं उचाकली. घुमता घुमताच ओरडली,

'मला तुमच्या देव्हाऱ्यात बसायचं हाय ऽऽ'

सुबाना एकदम दचाकला. बायजाचं अंग शहारलं. त्यातनं बी धाडस करून बायजा बोलली,

'मग हातात करकच कशाला भरवाय पायजे?'

'काय करतानं करक भरली ऽऽ?'

'पोरीचं क्यास इचरताना ऽऽ'

'मला पोरीचं क्यास आवडल्यात. आता हात लावू नगं. ते माझं हाईत...'

म्हणता म्हणता ती घुमता घुमताच गप्पगार झाली. शेजारच्या माणसांनी हातांची तिट्टी सोडवली. पाणी तोंडात दिलं. झाड सुटलं. सुबानच्या अंगाची मात्र ल्हायी ल्हायी झाली. बायजाला हे सगळं ऐकून गरगरल्यागत वाटाय लागलं. तिला काय सुचंनासं झालं. ती मुडद्यागत गप्पगार बसली. आक्कू जोगतीणीनं सुलीला जवळ बोलीवलं. डोक्यावरनं हात फिरवला. हात फिरवता फिरवता कानामागच्या केसाचा लेप तिच्या हाताला लागला. तशी बायजाला म्हणाली,

'आईला केस आवडल्यात ऽऽ आता ह्येला हात लावू नगं ऽऽ लई वाईट व्हईल. रोज हेला पुजत जा ऽऽ आईला दूध म्हणून वडाच्या चिकाचं बॉट,भंडारा पुसत जा ऽऽ तरच सगळं तरंल ऽऽ'

'खरं ऽऽ ह्ये देवस्थान आमच्या न्हाई ऽऽ' सुबाना न ऱ्हावून बोलला. आक्कू जोगतीण चिडली,

'आमची आई गावाच्या कडंला आणि परतेक आड्याला हाय!

असं म्हणूच नको ऽऽऽ' तिचा चढता सूर बघता बघता चिघळला. सुबानला आता काय बोलून उपयोग नाही, असं वाटाय लागलं. बायजाचं डोकं गरगराय लागलतं. सुली मात्र सगळ्याकडं टक लावून बघालती...

गावची वाट धरली, तवा सूर्य पार कलतीला. कोण कुणासी बोलत नव्हतं. सुली चालता चालताच आई-बापाकडं आळीपाळीनं बघालती. दोघं सुली जम्यात नसल्यागत झपाझप पावलं उचलत होती. सुलीला दोघांचा भलताच राग आला. आपल्याला सोडून दोघंबी पळाय लागल्यात, असं तिला वाटाय लागलं. अशातच सुलीचा पाय चुकला आणि जोरानं ठेच लागली. ती कळवळली. जोरानं ओरडली. तशी ती दोघं कावबारून मागं वळली. सुलीच्या डोळ्यांतनं पाणी घळघळाय लागलतं. तिनं वाकून अंगठ्याजवळचं बोट जाम्म आवळून धरलतं. बायजा गडबडीनं सुलीजवळ आली. बघती तर सुलीच्या मधल्या बोटातनं रक्त आलतं. तिच्या काळजात चर्रर झालं. तिनं सुलीला बसवलं आणि बोटाला धरतच सुलीला म्हणाली, 'कुठं धिंदऱ्यागत बघत चाललीस...'

सुबानानं हळूच सुलीला जवळ घेतलं. बायजानं पटाक्कन सुलीचं बोट सोडलं. चमड्याचा टवका गेलता. सुलीचं रडणं चालूच होतं. सुबानानं टावेलनं बोटाचं रगात पुसलं. हळुवार फुकलं. जरासं बरं वाटलं. तिनं पाय थोडासा सैल सोडला. हळूहळू रक्त थांबलं. सुलीला सुबानानं खांद्यावर घेतलं. पावलं उचलायला सुरुवात केली. बायजाही न बोलताच त्याच्या पाठीमागनं चालली. सुलीला खांद्यावर घेतलेल्या सुबानाची सावली लांबलचक पडायला लागलीती.

'ह्यो देव आमच्या घरात न्हाई. मी त्येला देवाऱ्यावर पुजणार न्हाई...' सुबानाचा आवाज एकदम चढला. जमलेल्या आया-बायास्नी तेचा अवतार काय खऱ्यातला वाटंना पुढं बोलाय कुणालाबी धाडस होईना. असातच जरासा धीर करून निकमाची तानूकाकू म्हणाली,

'असं म्हणून कसं भागंल बाबा ऽऽ मी मी म्हणणाऱ्यास्नी त्ये ह्या देवीनं आक्काम आणल्यागतं, त्यात तुझं तरी काय...? पाटलाचा आबातात्या म्हाईती हाय ऽ दुसरं कोन न्हवं ऽ ऽ'

'ते कायबी आसलं तरी ह्या देवाला मी घरात घेणार न्हाई. काकू ऽ ऽ तू आता मला काय सांगूनेस....' सुबाना पुन्हा डाफरला. सगळी गप्पगार बसली. निकमाच्या तानूकाकूला कुठं बोललो असं झालं. कसाळ्याची आक्कूबाई शेजारणीच्या कानात कायबाय पुटपुटली. कोपऱ्यात बसलेल्या म्हातारीला काय करावं हेच समजंना. बायजानं गुडघ्यात घातलेली मान वर काढली नाही. घरची रया पार बदलून गेलती. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नव्हता. दररोज घरात नुसता धुडगूस!

सुबानाला किती किती समजावलं तरी गडी काय पटवून घ्यायला तयार नव्हता. त्याच्या मनात पक्क बसून गेलतं, की ही देवी आपल्या घरात नको! एकदा का ही देवी घुसली की ती लवकर सुटत न्हाई, हे त्याला पक्क माहीत होतं. बायको जीव तोडून सांगण्याचा प्रयत्न करत होती. शेजारी पाजारी घराच्या सुखासाठी देवाला घरात आणा, असं विनवत होत्या. पण सुबानाचं आपलं एकच. 'वाडवडलात ही घरात नव्हती, आता आणायची न्हाई' याच वादातनं आज म्हातारीची आणि त्याची तोंडातोंडी सुरू झाली. अख्खी गल्ली घरात गोळा झाली. गल्लीतलं प्रत्येक बायकोमाणूस समजून सांगत होतं. देवीचं महात्म पटवून देत होतं पण सुबानानं आपला हेका काय सोडला नव्हता.

हळूहळू घरातलं एकएक माणूस कमी होत गेलं. आयाबायांनी आपापलं घर गाठलं. कोण चुकचुकत होतं, कोण सुबानाच्या हेकेखोरपणाला शिव्या देत होतं. बायजा आपल्या संसाराचं कसं व्हणार, ह्याच विचारात गुतपळून गेलती. म्हातारी अजूनबी बार भरूनच बसलीती. अशातच शेणाची बुट्टी घेऊन सुली दारात आली. आई खोपडा धरून बसल्याली बघितल्यावर तिला कसंसंच वाटलं. आज काय तरी घरात भिनसलंय, हे तिनं मनातल्या मनात ओळखलं. तिला काय करावं सुचंना. चौकटीला गच्च धरून फक्त उभा ऱ्हायली. म्हातारी अजूनबी फुरफुरतच होती. बायजाची गुडघ्यातली मान गुडघ्यातच होती. सुबाना कपाळाला सतरा आठ्या पाडून तंबाखू मळत होता. सुलीला जास्त काळ गप्प बसावं असं वाटेना. तिनं हळूच पाय उचलला. म्हातारीजवळ आली. म्हातारी भिन्न बसलीती. तिनं म्हातारीला हालवतच विचारलं.

'काय झालं ग ऽऽ आजी ऽ ऽ?'

'मसाण झालं ऽ ऽ ' म्हातारी ठिसाकली. गडबडली. तिचा चेहरा खर्रकन उतरला. गप्पगार उभी ऱ्हायली. सुबाना आता हितं काय थांबून उपेग न्हाई, असं वाटून उठायच्या बेतात होता, एवढ्यात बायजानं पुन्हा मुस फोडली.

'एकदा काय तो कंडका पाडल्याशिवाय उठायचं न्हाई...'

'कंडका आणि कसला पाडायचा ऽ ऽ आमच्या घरात त्या देवाला आणायचं न्हाई म्हणजे न्हाई ऽ ऽ' सुबानानं सांगून टाकलं आणि म्हातारी पुन्हा भडाडली.

'हिला एकदा मसणात पोचीव म्हंजे तुझा जीव समाधानी व्हईल ऽ ऽ' म्हणत म्हातारीनं सुलीला त्याच्याचकडं ढकललं. सुली पुन्हा बावचळली. तिच्याकडं पाहताच सुबानाला भडभडून आलं. त्याच्या मनाचा तोल सुटला. तंबाखू लागल्यागत त्याला वाटाय लागलतं. तो तिरमिरीसारखा जागेवरनं उठला. तडक गल्लीत गेला. झपाटल्यागत त्यानं खालच्या दिशेला तोंड वळवलं. झपाझप पावलं उचलायला सुरुवात केली. पायांत पायताण घालायचंही त्याला भान उरलं न्हवतं... सुली चौकटीतनं मान बाहेर काढून त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडं टक लावून बघत होती.

एकातनं एक नवीनच कायतरी निघायला सुरुवात झालती. घरात कसल्या म्हणून गोष्टीला यास नव्हतं. सगळ्या घराची रया बदलून गेलती. सुबानाचं कशातच लक्ष नव्हतं. त्यानं एकच मनाला बोचणी लावून घेतलीती, की हे देवस्थान आपण घरात आणावं म्हणतोय हे बरोबर केलं का चूक केलं. आपल्या पोरीचं पुढं कसं व्हनार? त्याचा त्याला गुतपाळा उलघडत नव्हता. त्याचा जीव खराशीला आलाता. कुणाजवळ काय बोलावं तर नवईनच कायतरी निघत होतं. त्याचा धीर सुटलाता.

घरात देवीला आणायचं तर कव्वाच ठरलतं. काय काय सांगून बघितलं. तर कोण ऐकायला तयार नव्हतं. कसं व्हईल तसं व्हईल. ह्या एकाच विचारानं त्यानं सगळ्या गोष्टींना सम्मती दिली आणि म्हातारीचा जीव शांत झाला. तिच्या मनात सगळ्या यवजना पूर्ण झाल्या. आता घरात सगळं रांकीला लागलं असं तिला वाटाय लागलं. तिनं बायजाला पुन्हा हिटणीला

पाठवलं. देवी आणायचं ठरवल्याचं कळवून, काय काय करायचं, कसं करायचं, हे सगळं बयवार विचारून घेतलं आणि पुणवची वाट बघायला सुरुवात केली.

सुलीनं घरात पाय टाकला आणि तिला पाट्यावर कणीक चेचण्याचा आवाज आला. सुली एकदम गदबाळली. काल तर आईनं काय सांगितलं न्हाई. सकाळपास्नबी आई आणि म्हातारी आपल्याच तालात व्हत्यानी. आताच हेंचं पोळ्या करायचं कसं काय ठरलं? मनातल्या मनात तिला बरं वाटाय लागलं. ती तशीच दणका परगड्यांला पळाली. बघती तर वेळगुंदीची मावशीबी आलती. तिला आबजूकच वाटाय लागलं. मावशी आजच कशी आली? तिनं मावशीकडं निरखून बघितलं तर मावशी तिच्याकडं न बघताच कणीक चेचालती. सुलीनं मावशीच्या पाठीमागं जाईतच आईला विचारलं,

'आई, मावशी कवा आली ग ऽऽ'

'आली बघ ग घोडी. कुठं कुठं घर ववासालतीस ग? ऽ ऽ' म्हणत बायजानं सुलीचं बकोट धरलं. मावशी कणीक चेचता चेचता थांबली. तिनं सुलीला जवळ घेतलं आणि म्हणाली, 'आक्का ऽ! वाळली की ग पोरगी ऽऽ'

'हूं ऽ वाळाय तिला काय धाड भरलीयाऽ'

बायजानं चुलीत फुकतच उत्तर दिलं, तशी सुली हिरमुसली. मावशी मात्र तिचं भलतंच कौतुक करायला लागली. एवढ्यात म्हातारी सोप्यात आली.

'आता सरनोबताची शेवंता येतो म्हणालीया.'

'आटपा लवकर ऽऽ सुलीलाबी चार तांब्यानं धुऊन काढा...' म्हातारीनं सूचना केली. सुलीच्या अंगावर काटा आला. आताच ह्या म्हातारीला कशाचा सटका आला, हेच तिला समजंना. तिनं आईचा चेहरा निरखून बघितला. आईच्या चेहऱ्यावरही तोच भाव होता. तिनं मनातल्या मनातच ठरवलं की, आता हितनं धुम्म ठोकायची. तिनं मावशीजवळून आपली हळूच सोडवणूक करून घेतली. पळायच्या नादात होती, एवढ्यात बायजानं तिला दटावणी दिली, 'आता कुठं भाईर जायचं न्हाई ऽऽ' सुलीची आता मात्र पंचायत आली. ह्यातनं आपली सुटका कशी करून घ्यायची, ह्या

विचारातच ती मावशीजवळ उभा ऱ्हायली. मावशीनं चेचलेली कणीक भुगुण्यात भरून ठेवली. मुसाळ धुऊन खोपड्याला उलटं उभं केलं आणि बायजाला म्हणाली,

'आता मी काय करूऽऽ'

'सुलीला तेवढं धुऊन काढऽऽ'

बायजानं फर्मावलं सुलीच्या जीवात चर्रर झालं. त्यात मावशी पाणी घालणार म्हटल्यावर तिला जरासं बरं वाटलं. तिनं हिकडम तिकडम न करता मावशीशी लाडीगोडी सुरू केली.

न्हाणीत उतरल्या उतरल्या सुलीला रडावं असं वाटायं लागलं; पण मावशीच्या समोर रडायचं म्हणजे तिला कसंतरीच वाटाय लागलं. तिनं मन घट्ट केलं. हळूहळू पाण्याचा तांब्या आपल्याच हातात कसा येईल, यासाठी कलागत सुरू केली. बायजाला भलतीच गम्मत वाटायला लागली. कार्टी आपण पाणी घालताना कधी गुमान पाणी न्हाली न्हाई आणि आजच तिला कसं गोड वाटाय लागलं. तिनं त्यातनंबी सुलीला डिवचलं.

'आज मावशीच्या हातचं पाणी म्हणून गोड लागलंय व्हय गं मैने ऽऽ'

सुलीला हसू आलं, पण हसता हसताच तिनं आईला दात इचकून यडवान दाखवलं. मावशीला हसू आलं. तिनं हसता हसताच तिच्या डोक्यावर तीन-चार तांबे रिकामे केले. सुलीला लई लई बरं वाटलं, डोक्यातली भगभग थांबल्यागत वाटाय लागलं. तिनं मावशीजवळ पुन्हा हट्ट धरला. मावशीनं तिच्या केसातून हात फिरवतच पाण्याचा तांब्या मोकळा केला. मावशीचा हात जटंजवळ आला आणि एकदम थबकला. ती मनातल्या मनातच सुलीच्या डोकीतल्या जटंला पाया पडली. पण तिच्या मनात कसलंतरी वादळं उठलं. ती भलतीच अस्वस्थ झाली. तिच्या हातातला पाण्याचा तांब्या लडबडाय लागला. ती मनातच पुटपुटली,

'सोन्यासारख्या पोरीच्या नशीबाला काय आलं?' तिचे डोळे डबडबले आणि हातातला तांब्या अधिकच हेलकावे खायला लागला.

सुलीनं पुरणाचा गोळा हातात घेतला गल्लीकडच्या सोप्याला आली. पुरणाची चव तिच्या जिभेवर रेंगाळत होती. ती हळूहळू चाटून पुरणाचा गोळा संपवण्याचा प्रयत्न करीत होती. एवढ्यात सरनोवताची शेवंता गोड हसली हातातली परडी सावरतच परड्याकडंच्या सोप्याला गेली.

सुली तिच्या पाठोपाठ पाठीमागच्या सोप्याला आली. शेवंता आक्कानं हातातली परडी समोरच्या दिवळीत ठेवली. सुलीची नजर परडीत गुंतली. परडीतली कवडीची माळ तिला भलतीच गम्मतशीर वाटू लागली. कडेला लोंबकळणारी लहान लहान काकणं तिला आपल्या हातात असावीत असं वाटाय लागलं. तिनं हळूच शेवंताक्काला विचारलं,

'शेवंताक्का ऽऽ मला त्यातलं काकाण इल काय? ऽऽ' शेवंताक्का फक्त तिच्या प्रश्नानं खोल कण्हली. सुलीला तिचा राग आला. ती फणकाऱ्यासारखी बाहेरच्या सोप्यात आली.

मधल्या सोप्यातला देव्हाऱ्यासमोरची जागा बायजानं गाईच्या शेणानं सारवून घेतलीती. लिंबाच्या फांद्या आणून ठेवल्यात्या. शांताबाईनं आणि काय काय लागणार, ते सगळं सांगायला सुरुवात केली, तशी एक एक वस्तू जमा व्हायला लागली. बायजाची सगळी धावपळ सुरू झाली. तरी बेलगुंदीस्नं भनीला बलीवलं म्हणून बरं, नाहीतर एकटी सगळी तारंबळा उडाली असती. तिनं देवाऱ्यासमोर येशेल तेलाची तीन ठावकी लावली. समोर एक पाट ठेवला आणि देव्हाऱ्याचा ताबा शांताबाईकडं दिला. तिनं आपल्याला हवा तसा देव्हारा सजवायला सुरुवात केली. सगळ्या गरजेच्या गोष्टी भोत्यानं मांडून ठेवण्यास सुरुवात केली.

सुली उगचच घरातनं हिकडं तिकडं फिरत होती. हळूच रकमा मावशीजवळ जाऊन पुरणाचा गोळा आणून चौकटीला उभा ऱ्हाऊन खात होती. तिला मात्र आज आपली चंगळच वाटाय लागलीती. खरं सकाळपास्न बाबा कुठं घरात नाही, हे कोडं मात्र तिला उलघडत नव्हतं. म्हातारीला विचारावं तर ठिसकणार, म्हणून ती कुणाला विचारावं याच विचारात पुरणाचा गोळा चाटत होती...

म्हातारी घरात आली आणि तिनं शांताबाईबरोबर काय बाय बोलायला सुरुवात केली. मधी मधी बायजानं तोंड घालायला सुरूवात केली. सुली मात्र तिघींचं बोलणं कान देऊन ऐकत होती.

'कोटास्नंच देवाला आणायचं असतंय, ती काय सांगती घेऽऽ' शांताबाई ठणकावून म्हणत होती. आणि म्हातारी सागंत होती,

'तिचं म्हणणं हाय देवीला डोंगरास्नच घरात आणाय पायजेऽऽ'

'ती माप सांगतीया ऽ मी बी जोगतीनच हाय म्हणावं, कितीतरी घरात

कोटास्नचंच देवीला आणलंय. तिला माझ्या सल्ल्यानं कराल्यासा म्हणून कडू लागलं असंल घे ऽ' शांताबाईनं पुन्हा म्हातारीची समजूत काढली, पण म्हातारीचं तोंड पूर्वीसारखं कावरंबावरं होतं.

'तसं न्हवं शांता. अशा येळेला मनात किंतू आसू ने म्हणून मी तिला इच्याराय गेलो, तर तिनं प्रत्येक गोष्ट आडवी लावली. म्हणाली, 'पोरीलाबी संगं लावून द्याय पाहिजे व्हत्यासा म्हणजे देवी खुशीनं आली असती. आता हे सगळं अडम ढेंगं झालंय.' म्हातारी सांगता सांगताच गदगदली. बायजाच्या चेहऱ्यावर सुरखुत्यांची जाळकांड पसरली, तशी शांताबाई दम धरून म्हणाली,

'माझ्यावर इसवास हाय न्हवं ऽऽ मी सगळं शिस्तवार करतो. तुमी डोकीत किडं घीऊ नगंसा ऽऽ देव फक्त तिचा हाय आणि माझा न्हाईऽ?'

तशी म्हातारी जराशी ताळ्यात आली. बायजालाबी जरासं समाधान वाटलं. तिघींनी तो विषय तिथंच सोडला. तिघीबी परड्यांगाच्या सोप्याला गेल्या.

दिवस कलतीला लागलाता. सावल्या लांब लांब पडाय लागल्यात्या. गल्लीत माणसाची वर्दळ वाढायला लागलीती. म्हातारी आपली चौकटीला टेकून गल्लीतल्या उन्हाच्या तवंगाकडं बघत उभी होती. वरच्या गल्लीच्या मान्याचं पोरगं पळत पळतच आलं आणि दारात थांबलं, तशी म्हातारी गप्पकन शुद्धीवर आली. पोरगं चड्डी वर वडतच म्हणालं,

'सुबनुतात्या आणि देववाली गंगूआजी येशीत आल्यात आणि तुम्हासनी बलीवलंऽऽ' पोरगं पुन्हा पळालं. म्हातारी भांबावून आत गेली. तिनं सुनंला पटापट सगळं आवराय सांगितलं. शान्ताबाईला काय काय घ्यायचं ते विचारलं आणि म्हातारी गडबडीनं घरातनं बाहेर पडली, ते तिनं तडक भैरू मोहित्याचं घर गाठलं. भैरू मोहित्या दारात तिची वाटच बघत बसलाता. म्हातारीला बघितल्याबरबर तो गप्पकन उठला आणि म्हातारीला म्हणाला,

'काकू ऽ हालगी काढूऽ' म्हातारीनं मान हलवली. मागं वळली. पाठोपाठ भैरू मोहित्या.

पोळीचा निवद, आंबलीचा मोगा, घुगऱ्या, उदकाड्या आणि कायबाय

घेऊन बायजा-म्हातारी घरातनं बाहेर पडल्या. पाठोपाठ सुलीही आलीच. सगळ्यांनी मिळून येस गाठली. सुबाना आणि देववाली गंगूबाई निवांत येशीतल्या चिचंच्या झाडाला टिकून बसलेते. म्हातारीला बघीतल्या बघीतल्या सुबानानं अंग झटकलं. बायजानं पाण्याचा तांब्या दोघांच्या पायावर वतला. गंगूबाईनं जोरानं उचकी देतच 'उदं ग आई ऽ उदं ऽ ' म्हणून जोरानं आवाज काढला. तसा सगळ्यांनी सूर धरला, 'उदं ग उदं आई उदं ऽ उदं!'

भैरू मोहित्यानं हालगीचा ठेका धरला आणि एकाएकी गंगू जोगतीनीच्या अंगात वारं शिरलं. हाहा म्हणताना गावातली पाच-पंचवीस पोरं गोळा झाली. सगळ्यांनी येशीतून गावाकडं चालाय सुरुवात केली. सुबाना मध्येमध्येच मोठ्या आवाजात म्हणत होता, 'उदं गं आई ऽ उदं ऽऽ उदं ऽ ' गावच्या येशीतनं पोरांनी सुद्धा आवाज काढाय सुरुवात केली आणि हालगीचा ठेका गावातल्या घराघरात पोहचला. येशीतलं पहिलंच घोरपड्याचं घर आलं. गंगू जोगतीनीला थोडासा ताव चढला. भैरू मोहित्याच्या हालगीला रंग चढला. घोरपड्यांच्या सुनेनं पाण्याची घागर गंगूबाईच्या पायावर वतली. सुबानानं आपल्या जवळच्या कापराच्या डब्यातला भंडारा तिला लावला. तिनं सुबानाच्या पायाला वाकून नमस्कार केला. सुबानाच्या हातातल्या भंडाऱ्याच्या डब्याचा कब्जा म्हातारीनं घेतला. सगळ्या पोराटोरास्नी भंडारा लावला. वाटंत भेटल त्याला भंडारा लावण्यासाठी ती पुढं झाली. घोरपड्यांचं घर ओलंडलं आणि दोन कासऱ्यानं गावच्या गल्लीची सुरुवात झाली. माणसं कुणाचं काय वाजायलंय म्हणून कौतुकानं बघत होती. गंगू जोगतीन शिणल्या अंगानं, पण जोमानं नाचत होती. भैरू मोहित्याच्या हालगीचा ठेका क्षणाक्षणाला बदलत होता. जमलेली सगळी पोरं जोरानं ओरडत होती, 'उदं ग आई उदं ऽ ग ऽ उदं!'

वाजत गाजत सगळीजण लक्ष्मीच्या देवळाजवळ आली. एवढ्यात सुताराची तानू जोगतीन घरातनं घुमतच हालगीच्या ठेक्यावर ताल धरून गंगू जोगतीनीजवळ येऊन नाचू लागली. म्हातारीच्या काळजात धस्स झालं. ती जीवाच्या करारावर ओरडली, 'उदं ग आई उदं ऽऽ'

सुबाना देवळातनं पाया पडून बाहेर पडला. सगळ्यांनी खालच्या गल्लीचा रस्ता धरला. भैरू मोहित्याची हालगी आता धावत्या गतीनं ठेका

४थी आवृत्ती



गी तां ज ली

रवींद्रनाथ टागोर

भावानुवाद

डॉ. अमिता गोसावी

किंमत : १२०/-रु.

पोस्टेज : ५०/-रु.

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

हे छोटंसं फूल पटकन खुडून घे, विलंब करू नकोस! अन्यथा ते कोमेजून जमिनीवर धुळीत पडेल, अशी मला भीती वाटते.

त्याला तुझ्या गळ्यातील हारात जागा मिळाली नाही तरी चालेल; पण तुझ्या हाताने खुडून घेताना होणाऱ्या वेदनेने बहुमानित कर आणि खुडून घे.

मी सावध होण्याआधी बघता-बघता दिवस ढळेल आणि तुझ्या अर्चनेसाठी अर्पण होण्याची वेळ निघून जाईल, अशी मला भीती वाटते.

ह्या फुलाचा रंग जरासा उडालेला असला आणि गंध मंद झाला असला, तरी त्याला तुझ्या पूजेत सहभागी व्हायची संधी दे. वेळेतच त्याला खुडून घे.

धरू लागली. पोरं कौतुकानं सगळं डोळं ताणून बघत होती.

वाजत गाजत हालगी घराजवळ आली. रकमा मावशीनं आरती पेटवली. पाण्याची घागर भरून दारात ठेवली. भाताची मूद आणि भाकरीचा तुकडा हातात घेतला. ती दारात आली. आता पाठीमागनं येणारी बरीच पोरं पांगलेली होती. भैरू मोहित्या, गंगू जोगतीन, तानू सुतारीन आणि ही घरातली तिघंचौघं सोडून पाच दहाच पोरं सोबत होती. सुबाना घरात आला. गंगू जोगतीन फक्त हाताला आळोखे पिळोखे देत त्याच्या शेजारी उभी ऱ्हायली. पण तानू सुतारीन गल्लीतनं दारात येईना. भैरू मोहित्यानं हालगी कमी कमी करत दाराच्या कडेला वाजवायला सुरुवात केली. तरी तानू जोगतीन गल्लीतच घुमू लागली. कुणाला काय समजंना. म्हातारीच्या काळजात कालवलं. सुबानाच्या कपाळाला आठी पडली. बायजाचा चेहरा खर्रकन् उतरला. कुणालाच काय करावं समजेना. एवढ्यात कसाळ्याची लक्ष्मी सरसावून पुढं आली आणि घुमणाऱ्या तानू सुतारनीचं पाय धरतच म्हणाली,

'आई ऽऽ घराकडं चल ऽ ऽ'

'मी न्हा ऽ ई येणार' तानू जोगतीन घुमता घुमताच फुत्कारली.

'का न्हाई येणार? काय चुकलं आसल तर मान्य करून घे. खरं घराकडं वळ.' लक्ष्मी कसाळनीनं तिच्यासारखाच सूर काढला आणि तानू सुतारीन फक्त घुमाय लागली. थोड्या वेळाने म्हणाली,

'मी घरात येणार नाही. ह्या घरात मला डोंगरास्नच आणाय पायजे.'

सगळ्यांच्या चेहऱ्यावरचं पाणी पळालं. सुबानानं ओठ चावला आणि शेजारी घुमणाऱ्या गंगू जोगतीनीकडं पाहिल. तशी गंगू जोगतीन घुमण्याच्या तालातच ओरडली, 'खोट्टं ऽ खोट्टं.' आणि ती आतल्या सोप्यात जाऊन पडली. तिची एकदम दातखिळीच बसली. तानू सूतारीन आपोआपच घरात आली. रकमा मावशीनं हातातली भाताची शीतं आणि तुकडा दोन्ही बाजूला टाकला आणि सुबानाच्या पायांवर पाणी ओतून गडबडीनं आत आली.

गंगूबाईची दातखिळी सराईतपणे शांताबाईनं काढली आणि तिच्या तोंडावर पाणी शिंपडलं. तानू सुतारीनीचं झाड कवाच्या कवा सुटलतं. सगळ्यांनी गंगूबाईला वारा घालायला सुरुवात केली. हळूहळू गंगूबाईची पापणी उघडत गेली.

सगळीकडं अंधार दाट झालता. गल्लीतलं दिवं लागलतं. माणसांची गल्लीतली वर्दळ कमी झालती. सुबाना भित्तीला टेकून डोळे मिटून गप्प गार बसलाता. सरनोबताची शेवंता बायजाला मदतीला घेऊन पडल्या पुजायला लागलीती. देववाली गंगूकाकू मधी मधी चुकलं ते सांगत होती. सुताराची तानू मात्र गप्पगार बसलीती. रकमा मावशीनं पोळ्या आटपून पापड भाजायला सुरुवात केलती. म्हातारी तेवढी हिकडनं तिकडनं येरझाऱ्या घालीत होती. आजून जवळापाची आक्काताई व गुडपाची सोना घराकडं कशा आल्या नाहीत, हेचाच तिला घोर लागलाता. परत घराकडं बलवाय जावावं म्हटलं तर आताच त्यांच्या घरातनंच ती आलती. त्यामुळं सारखं उंबऱ्या पर्यंत जाऊन ती बाहेर डोकावत होती. एकदासा त्या दोघींनी घरात पाय टाकला, तसा म्हातारीचा जीव भांड्यात पडला.

बायजानं लिंब नेसालता. शांताबाई परड्यांची पूजा करालती. गंगूकाकू शेजारीच बसून सगळं बघालती. बायजाला परडीची पूजा कराय सांगितली. पाच परड्या समोर ठेवल्या. गंगूकाकूचा जग शेजारीच पुजला आणि सुलीला देव्हाऱ्याजवळ बोलावलं. सुली गदबाळली. देव्हाऱ्याचं रूप पार पालटलतं. पाच जोगतीनींच्या पाच परड्या, नवी करकरीत बाबानं आणलेली एक परडी ओळीत होती. जगातलं मोरपीस नजर रुतवून पाहात होतं. ठावक्यातल्या मिणमिणत्या वाती मंद नजरेनं सुलीला न्याहाळत होत्या. सगळ्याजणी देव्हाऱ्याभोवती जमा झाल्या. सुलीला मधी घातली. सगळ्यांनी परडीला हात लावला आणि 'उदं ग आई उदंऽ' म्हणून पाचही परड्या हालवल्या आणि जाग्याला ठेवल्या. एकमेकीला भंडारा लावला. बावचाळलेल्या सुलीचं कपाळ भंडाऱ्यानं भरून गेलं.

◆

ई-बुक स्वरूपात उपलब्ध

फेसबुक प्रतिक्रिया

'लेट्स किल गांधी!'

सर्वांनी जरूर वाचायला हवे असे पुस्तक

- उदय संतोष

अभिप्राय

मयादा : इराकची कन्या

मूळ लेखिका : जीन सॅसन

अनुवाद : भारती पांडे

पृष्ठे : ३१२

मूल्य : रु. २९०

इराकमधील हादरवून टाकणाऱ्या परिस्थितीचं चित्रण

तेलाचा शोध, राष्ट्रीय संपन्नतेची स्वप्ने, कठोर युद्धांनी हिरावून घेतलेली, खच्चीकरण करून टाकणारी बंधंन, बंड, क्रांती, अनेक सरकारी उठाव यामुळे इराकी जनता साऱ्या जगापासून दुरावली आहे. जनतेची प्रचंड घुसमट होत आहे. सद्दाम हुसेनला पाठिंबा देणाऱ्या सुन्नीपंथीय लोकांचं इथं प्राबल्य आहे. इराक या नावानं आज परिचित असणारा देश पूर्वी मेसापोटेमिया या नावानं ओळखला जायचा. मेसापोटेमिया या ग्रीक शब्दाचा अर्थ आहे दोन नद्यांमधील प्रदेश. पहिलं महायुद्ध संपल्यानंतर ब्रिटिशांनी कुर्द, शिया आणि सुन्नी या सर्वांना जुलमानं एकत्रित राहायला भाग पाडून इराक या नव्या राष्ट्राची स्थापना केली. इराक म्हणजे विरोधाभासाचं एक विलक्षण मिश्रण आहे.

१९९१च्या आखाती युद्धानंतर इराक अती क्षुब्ध झाला. हे युद्ध त्यांच्याच अध्यक्षाने ओढवून घेतलेलं. जनतेविषयी वाटणाऱ्या कुतूहलातून इंग्रजी लेखिका जीन सॅसन यांनी इराकला भेट दिली. बगदादमध्ये पोहोचल्यावर माहिती खात्याच्या कचेरीत जाऊन तिनं दुभाष्याचं काम करणारी स्त्री हवी आहे, असं सांगितलं; परंतु या कामासाठी फक्तपुरुषच नेमावेत, हा सरकारी नियम होता. तरीही लेखिकेच्या हट्टामुळे अखेर जीन सॅसन आणि मयादाची भेट झाली. ती लेखिकेची दुभाषी, वाटाड्या झाल्यानं तिच्या मदतीनं इराकदर्शन झालं.

२००३च्या सुमारास अमेरिकेने इराकी लोकांच्या मुक्तीसाठी सैन्य पाठवलं आणि सद्दामला सत्तेवरून दूर केलं. त्या वर्षीच मयादानं ठरवलं की इराकमध्ये जे काही पाहिलं, भोगलं ते साऱ्या जगासमोर आणायचं. बराच काळ चर्चा केल्यानंतर तिनं इग्रंजी लेखिका जीन सॅसनला पुस्तक लिहायला सांगितलं. आधुनिक इराकचं सत्य जगासमोर आणणारं ते पुस्तक आहे - 'मयादा-इराकची कन्या.' देश प्राचीन असला तरी त्यातल्या घटना नजीकच्या आहेत... आपल्याला अंतर्मुख करायला लावणाऱ्या आहेत.

मयादा-अल-अस्करी ही एक खानदानी, सुन्नीपंथीय, उच्चस्तरीय घराण्यातली उत्तम इंग्रजी बोलणारी स्त्री. मयादाचं घराणं हे तिथलं एक प्रसिद्ध राजकीय घराणं. इराकमध्येच ती लहानाची मोठी झाली. काही दिवस

तिनं वृत्तपत्रात वार्ताहराचं कामही केलं. सद्दाम हुसेनचा तिला संताप येत असे; कारण तिच्या मते त्यानं इराकला एक मोठा तुरुंग बनवून टाकलं. त्यामुळे त्याची कारकीर्द संपलेली पाहणं हे तिच्या आयुष्यातील एकमेव स्वप्न होतं.

मयादाची, इराकी जनतेची ही कथा भारतीयांना अविश्वसनीय वाटेल; परंतु ती सत्य आहे. हादरवून टाकणारी असली तरी लोकशाहीचं, स्वातंत्र्याचं महत्त्व अधोरेखित करणारी आहे, हे निश्चित. 'मयादा' वाचून झाल्यावर मनात येतं - आम्ही भारतीय नागरिक लोकशाही प्रणालीत मुक्तपणे वावरतो. एवढं असूनही देशाविषयीची बांधिलकी, लोकशाहीचं मूल्य, महत्त्व समजून घेण्यात आम्ही कमी पडतो का, असं या निमित्तानं तपासून बघावंसं वाटलं तरी खूप झालं.

(झी मराठी दिशा, शनिवार २०-२६ एप्रिल, २०१९)

◆

फेसबुक प्रतिक्रिया

अश्रू

विसाव्या शतकानं जगाला बऱ्यावाईट अनेक गोष्टी दिल्या असतील; पण त्याची सर्वश्रेष्ठ देणगी म्हणजे त्याने सामान्य मनुष्याला दिलेलं महत्त्व, जे कोणत्या ना कोणत्या दृष्टीने असामान्य आहे. ज्याला आपण जीवन म्हणतो. त्यात अधिक भाग कुणाचा असतो ? मूठभर असामान्यांचा की शेकडा नव्वद, किंबहुना शेकडा नव्व्याण्णव असलेल्या सामान्यांचा? आजपर्यंत राजांनी, वीरांनी, संतांनी, तत्त्वज्ञानींनी, कवींनी आणि शास्त्रज्ञांनी या सामान्य मनुष्याला गोड गोड अशी वचने देऊन त्याची प्रत्येक क्षेत्रात कत्तल केली; पण तरीही माणुसकीचा आधार एकच होता; तो म्हणजे संस्कृतीची सारी मूल्ये सांभाळण्याकरिता धडपडणारा सामान्य माणूस. वाईट करताना ज्याचा हात कचरल्याशिवाय राहत नाही. हाच सामान्य माणूस या कादंबरीचा नायक आहे.

- आशुतोष कुलकर्णी

५वी आवृत्ती

पोस्टमास्टर
आणि इतर कथा

रवींद्रनाथ टागोर
अनुवाद
मृणालिनी गडकरी

किंमत : १६०/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

माणूस आहे म्हणूनच या जगात भावनांचा सुंदर गोफ विणला जातो,

आणि त्याला साथ असते निसर्गाची.

रवीन्द्रनाथांच्या जीवनात 'माणूस' आणि 'निसर्ग' यांना असाधारण स्थान आहे. त्यांच्या कथेत निसर्ग हा फक्त वर्णनाकरिता येत नाही,

तर भावभावनांच्या खेळात महत्त्वाची भूमिका बजावतो. निसर्गाची बदलणारी रूपं माणसाच्या बदलणाऱ्या भावनांच्या प्रतिमा असतात.

निसर्ग आणि माणूस यांच्या संयोगातून फुललेली विश्वकवीची कथा तो महामानव होता हे नकळत सांगून जाते.

अभिप्राय



डिंभक

डॉ. संजय ढोले

पृष्ठे : १६८

मूल्य : रु. १९५

डॉ. संजय ढोले यांचा 'डिंभक' हा विज्ञानकथांचा संग्रह अलीकडेच प्रकाशित झाला आहे. डॉ. ढोले यांचा हा पाचवा विज्ञानकथासंग्रह. नव्या पिढीचे ते वैशिष्ट्यपूर्ण कथाकार आहेत. 'डिंभक'मध्ये बारा कथा आहेत. प्रत्येक कथा दुसऱ्या कथेपेक्षा निराळी आहे. आशय, विज्ञानसूत्र असो वा व्यक्तिरेखांचं चित्रण असो. या कथा वाचकांच्या मनाचा ठाव घेतात. विज्ञानकथेमध्ये आत्तापर्यंत निर्माण झालेल्या परंपरेला वेगळी दिशा देणारी ही कथा आहे. ढोले यांची पार्श्वभूमी दुर्गम आदिवासी भागातली आहे. पुढं संशोधन आणि अध्यापन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्यानंतरही त्यांना या पार्श्वभूमीचं विस्मरण झालेलं नाही, हे या कथा वाचताना सतत जाणवत राहतं. त्यांचे कथानायक सर्वसामान्य कुटुंबातून आलेले आहेत. त्यांच्या विज्ञानकथांमधून चित्रित झालेल्या प्रश्न आणि समस्यांचा पायाही सामान्य समाजजीवनाचाच आहे. त्यांचे कितीतरी कथानायक प्रतिकूल परिस्थितीशी झगडून विज्ञानाच्या संशोधन क्षेत्रात स्थिर झाल्यावर त्यांची पाळंमुळं विसरत नाहीत, हे ढोले यांच्या कथानायकांचं वेगळेपण आहे.

'डिंभक'मधल्या कथा वाचल्यानंतर त्यातली चार सूत्रं लक्षात येतात. पहिलं सूत्र म्हणजे निसर्गात माणसानं हस्तक्षेप केला, तर निसर्ग माणसाला क्षमा करू शकणार नाही, या वास्तवाची जाणीव जितक्या लवकर मानवी समाजाला होईल तितकं ते त्यांच्या भल्याचं आहे. दुसरं सूत्र म्हणजे इतर क्षेत्रांप्रमाणे विज्ञान-संशोधन क्षेत्रातदेखील नैतिकता हे मूल्य पाळणं गरजेचं नव्हे अटळ आहे. विज्ञान-संशोधनात हे विचारात घेतलं नाही, तर गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतात आणि याबाबतची जबाबदारी वैज्ञानिकांना नाकारता येणार नाही. तिसरं सूत्र म्हणजे विज्ञानाचा समाजासाठी विधायक वापर व्हायला हवा. चौथं सूत्र म्हणजे कोणत्याही क्षेत्रात मानवी संवेदना महत्त्वाची असते. ही संवेदनाच खऱ्या अर्थानं मानवाबद्दल करुणा, प्रेम, सहानुभूती निर्माण करू शकते.

डॉ. संजय ढोले यांच्या कथांमधून प्रकटणारी ही सूत्रं पाहिली, तर त्यांच्या लेखनाची प्रेरणा आणि प्रयोजन लक्षात येतं. केवळ रंजन म्हणून या कथा लिहिल्या गेल्या नाहीत. या कथांमध्ये काही प्रमाणत रहस्यमयता, अद्‌भुतता, उत्कंठा या गोष्टी आढळतात; पण या रहस्यकथा नाहीत. डॉ. ढोले हे चांगल्या रहस्यकथा लिहू शकतात. त्याच्या खुणा या कथालेखनात

आढळतात; मात्र त्यांना विज्ञानकथाच लिहायच्या असल्यामुळे कथानकाची गरज म्हणून रहस्यमयता, अद्‌भुतता या कथांमध्ये आली आहे. विज्ञानातली परिभाषा ही बऱ्याचदा क्लिष्ट आणि बोजड असते. सर्वसामान्य माणसाला त्याचं आकलन होत नाही, याची जाणीव लेखकाला असल्यामुळे त्यांनी विज्ञानकल्पना, गृहितकं, परिभाषा सुबोध पद्धतीनं मांडली आहे. इंग्रजीतल्या अवघड संकल्पना त्यांनी सोप्या मराठीत उलगडून दाखवल्या आहेत. त्यामुळे वाचक अडखळत नाही.

'डिंभक' या कथासंग्रहातून मानवी भावभावनांचा गुंता अधोरेखित झाला आहे. त्याप्रमाणे समकालीन समाजातल्या प्रश्नांचा भविष्यकालीन वेध आहे. 'विळखा' कथेतल्या मीनल आणि मिलिंद या कलावंत दाम्पत्याला अपत्यप्राप्तीचं सुख लवकर प्राप्त होत नाही; परंतु डॉ. थत्ते यांच्यामुळे ते शक्य होतं; पण प्रसूतीकाळात जे नाजूक प्रश्न निर्माण होतात त्याची सोडवणूक डॉ. सुरेश गोसावी कशा पद्धतीनं करतात याचं चित्रण ढोले यांनी केलं आहे. 'द डे आफ्टर' या कथेत अणुबॉम्ब स्फोट झाल्यावर कोणत्या प्रकारचा विध्वंस होतो, त्याचं अंगावर काटे आणणारं, भयचकित करणारं चित्रण वाचायला मिळतं. एखाद्या माथेफिरूनं जाणीवपूर्वक असा स्फोट घडवला तर किती भीषण मानवी संहार होऊ शकतो, याचं वर्णन सुजाण वाचकाला अंतर्मुख करतं. 'अभय' कथेतले प्रा. सोमादित्य बॅनर्जी हे शास्त्रज्ञ मृत माणसांना जिवंत करण्याचा शोध लावतात; पण हा शोध त्यांच्याच अंगलट येतो. त्यांच्या मृत मित्राच्या शरीरावर प्रयोग करून ते त्याला जिवंत करतात आणि मित्राच्या मनातली डॉ. बॅनर्जी यांच्याविषयीची द्वेषभावना तीव्रतेनं उफाळून येते आणि तो डॉ. बॅनर्जींना ठार करतो. विज्ञानशोधामुळे मृत माणसं जिवंत झाली, तर मानवी जीवनव्यवहारात अधिकच गुंता निर्माण होऊ शकतो आणि तो विज्ञानाच्या आवाक्याबाहेर जाऊ शकतो, ही बाब ढोले यांनी फार समर्पकपणे समोर ठेवली आहे.

'सोनियाची खाण'मधले डॉ. शिवराम मानशिंदे सोन्याचा शोध लावून प्रचंड श्रीमंत होतात; पण या शोध प्रक्रियेत त्यांच्या शरीरावर विपरीत परिणाम होतात. 'पिंजक' कथेतले डॉ. हमीद रहेमान हे एखादी व्यक्ती अदृश्य होऊन दहशतवाद्यांना बिनदिक्कत कशी मारू शकते, याचं प्रात्यक्षिक करतात; पण हे तंत्रज्ञान दहशतवाद्यांच्या हाती लागलं, तर ते

देशच उद्ध्वस्त करतील, या जाणिवेनं ते तंत्रज्ञान नाहीसं करून दहशतवाद्यांशी प्रत्यक्ष लढून धारातीर्थी पडतात. या संग्रहातल्या कथा मुळातूनच वाचाव्या अशा आहेत. एका वेगळ्याच शक्याशक्यतांचा वेध लेखकाने रंजकपणे घेतला आहे. वाचक त्यात गुंतून पडतो आणि विचारप्रवृत्तही होतो. विचारांना चालना देणं आणि मनात प्रश्न निर्माण करणं हे जर कथाकाराकडून घडत असेल, तर तो उत्तम कथाकार म्हटला पाहिजे. डॉ. संजय ढोले या निकषाला उतरतात, याबद्दल संदेह नाही.

– डॉ. मनोहर जाधव

दैनिक सकाळ (सप्तरंग), २८-४-२०१९

◆

टी बुक क्लब

या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

चालू बुक क्लबचे सभासदत्व ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

१०० भरून उपलब्ध असलेली कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किमतीत मिळवा.

पोस्टेज खर्च अतिरिक्त

२री आवृत्ती

उपयोजित समीक्षा : लक्षण आणि पडताळणी

डॉ. अरविंद वामन कुळकर्णी

किंमत : १६०/-रु.
पोस्टेज : ५०/-रु.
ई-बुक स्वरूपात उपलब्ध

डॉ. अरविंद वामन कुळकर्णी हे मराठी समीक्षा क्षेत्रातील एक लक्षवेधी नाव.

डॉ. कुळकर्णी मराठी साहित्यक्षेत्रात समीक्षा विचारांचे जाणकार प्राध्यापक आणि समीक्षक म्हणून ओळखले जातात. त्यांनी अनेक वर्षे सैद्धांतिक समीक्षेचे अध्यापन जसे केले तसेच अनेक प्रकारच्या साहित्यकृतींची विविध पद्धतींचा आणि दृष्टिकोनांचा वापर करून प्रत्यक्ष समीक्षाही केली. प्रस्तुत ग्रंथ वाचताना त्याचा प्रत्यय येतो.

साहित्याची समीक्षा करण्याच्या अनेक सैद्धांतिक पद्धती आहेत. तरीही जाणकार समीक्षकांचा स्वतंत्र दृष्टिकोन असू शकतो. त्या त्या विशिष्ट साहित्यकृतीच्या मागणीनुसार मर्मज्ञ समीक्षक तसा दृष्टिकोन निश्चित करतो. हा दृष्टिकोन कधी एक तर कधी एकाहून अधिक समीक्षा पद्धतींचा मेळ घालून निश्चित करावा लागतो. साहित्यकृतीची प्रत्यक्ष समीक्षा करताना मर्मज्ञ समीक्षकच असे करू शकतो. डॉ. कुळकर्णी हे मेळाचे औचित्य उत्तम रीतीने सांभाळताना या ग्रंथात दिसतात.

तरुण पिढीला जाणकार रसिक वाचक, अभ्यासक आणि साहित्याचा प्राध्यापक व्हावयाचे असेल तर तिने हा ग्रंथ जरूर वाचावा अशा योग्यतेचा आहे. कारण साहित्यकृतीचे आकलन आणि आस्वादन किती विविध प्रकारांत अनुभवता येते, याचे अनेक उत्तम नमुने या ग्रंथात पाहायला मिळतात.

- डॉ. आनंद यादव

मेहता पब्लिशिंग हाऊस आणि **जस्ट बुक्स लायब्ररी, कोथरूड** यांच्या संयुक्त विद्यमाने, नुकतंच लहान मुलांसाठी कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. १) या कार्यशाळेत मुलांना कथा सांगताना **श्रद्धा नातू-कुंटे**. २) चित्र काढण्यात रंगून गेलेली मुले.

सुप्रसिद्ध बालसाहित्यिक राजीव तांबे यांना त्यांच्या बालवाङ्मयातील योगदानाबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे **'कै. शांतादेवी शिरोळे आणि बाबूराव शिरोळे' पुरस्कार** आणि **सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. छाया महाजन** यांना त्यांच्या साहित्यातील योगदानाबद्दल **'ज्योत्स्ना देवधर पुरस्कार'** प्रदान करण्यात आला. डावीकडून पहिल्या छायाचित्रात **प्रसिद्ध गुजराती लेखक सीतांशु यशश्चंद्र** यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना **राजीव तांबे** आणि दुसऱ्या छायाचित्रात पुरस्कार स्वीकारताना **डॉ. छाया महाजन**.

Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020
RNI. No. MAHMAR/2000/02739
No. CSO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/06/2019 Posting Date : 11/06/2019

आवर्जून वाचावे



मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,